
# माणूस

२६ मार्च १९७७
७५ पैसे



॥ स्वयमेव मृगेन्द्रता ॥

॥ स्वयमेव मृगेन्द्रता ॥

॥ स्वयमेव मृगेन्द्रता ॥

## साप्ताहिक माणूस

**वर्ष सोळा-अंक त्रेचाळीसावा**

**२६ मार्च १९७७**

**मूल्य पंचाहत्तर पैसे**

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४३४५९


# भारतीय मृगेन्द्र

निबिडतरकांतारजठरात निद्रिस्त असणारा हरी शेवटी जागा झाला, खवळला आणि त्याने चालून आलेल्या मदांध गजालीश्रेष्ठाचे गंडस्थळ फोडून आपला क्रोध शमवला.

सिंह हा स्वातंत्र्याचे, स्वाभिमानाचे, माणसांच्या ठिकाणी असणाऱ्या आत्मसन्मान प्रवृत्तीचे प्रतीक म्हणून समजला जातो.

'मानमहताम् अग्रेसर : केसरी' असे कवींनी त्याचे वर्णन केलेले आहे.

कठिण काळ आला तर हा राजा, हा मानमहतांचा अग्रेसर उपाशी राहणे पसंत करतो, पण गवत खात नाही.

याला बळजबरीने गवत खाऊ घालण्याचा प्रयत्न झाला.त्याची विटंबना केली गेली. त्याचे अंतस्थ राजेपण हिरावून घेतले गेले. त्याचा अहंकार डिवचला गेला संधी मिळताच त्याने मग आपली नखाग्रे बाहेर काढली, गुरुतरशिलांचे भेद केले आणि भ्रमाने उन्मत्त बनलेल्या अनेक गजश्रेष्ठांना त्याने अक्षरशः धुळीत लोळवले.

प्रत्येकाचा स्वाभिमान पायदळी तुडवला गेलेला होता.

राज्यकर्त्यांनी गेल्या दीडदोन वर्षांत सामान्य माणसाची प्रतिष्ठाच नष्ट करून टाकली होती.

मग तो सामान्य माणूस शहरातला कारकून — कलावंत असो, नाहीतर खेड्यातला लहानमोठा शेतकरी असो.

समाजातले सगळेच थर दुखावले गेले होते.

कुणी सक्तीने नसबंदी झाली म्हणून चिडलेले होते.

कुणी विनाचौकशी, विनापराध तुरुंगात डांबले गेल्यामुळे संतप्त होते.

नागरिक स्वातंत्र्याची गळचेपी झाली म्हणून बुद्धिजीवी अस्वस्थ होते.

आर्थिक कोंडी झाली म्हणून श्रमजीवी चिंतेत होते.

कधी नव्हे तो शेतकरी यावेळी जागा झाला होता. त्याच्या घरादारांचे लिलाव झाले होते, त्याच्या मालाला भाव मिळत नव्हता. त्याची तरुण मुले शिकलेली होती. स्वस्थ बसायला तयार नव्हती.

निरनिराळे थर निरनिराळ्या कारणांमुळे असे दुखावले गेलेले होते आणि हा असंतोष विधायक मार्गांनी वेळच्या वेळी प्रकट व्हायला काही साधन उरलेले नव्हते.

राजकीय पक्षांना वाव नव्हता.

वृत्तपत्रे बंधनात अडकलेली होती.

सभांना बंदी होती. मोर्चे निघू शकत नव्हते.

त्यामुळे असंतोष साचत गेला. दबून राहिला आणि वेळ येताच उफाळून वर आला.

असंतोषाच्या लहानलहान लाटांचे एका महाप्रचंड लाटेत रूपांतर झाले आणि नगरांमागून नगरे गिळंकृत करीत शेवटी दिल्लीचे सिंहासनही या लाटेने वाहून नेले.

मानवी संतापाचा एक वडवानल उफाळला होता

हा एक ज्वालामुखीचा उद्रेक होता.

मतभेदांच्या, पक्षोपपक्षांच्या, जातीधर्माच्या, वर्गीय हितसंबंधांच्या तटबंद्या या उद्रेकामुळे केव्हाच कोसळून पडलेल्या होत्या. लहानमोठा हा भेदभाव विरघळला होता. स्वाभिमान आणि स्वातंत्र्य यांच्या घराघरातून तेवणाऱ्या ज्योतींचे मशालीत रूपांतर झाले होते. प्रत्येकाच्या हृदयस्थ नारा-

यणाला प्रेरणा मिळाली होती.

हे सर्व राज्यकर्त्यांना कळलेच नाही. भ्रमात राहिले. नरसिंह प्रकट होतो आहे याकडे त्यांनी दुर्लक्ष केले. आणीबाणी नसती तर वेळेवर लक्ष तरी देण्याची बुद्धी त्यांना झाली असती. पण आणीबाणीमुळे तळागाळात काय काय घडते आहे याचे ज्ञानच राज्यकर्त्यांपर्यंत पोचू शकत नव्हते. वाफ नको तितकी कोंडली गेली होती. तिचे उफाळून वर येणे क्रमप्राप्तच होते. निवडणुका जाहीर झाल्या म्हणून ती मतपेटीद्वारा उफाळली. नाहीतर आणखी वेगळ्या मार्गांनी बाहेर पडली असती. झाले ते उत्तम झाले. मतपेटीद्वारा जगातील एक अभूतपूर्व राज्यक्रांती घडवून दाखवण्याची एक महासंधी येथील जनतेला त्यामुळे प्राप्त झाली. ◻

या लोकशाही राज्यक्रांतीचे सादपडसाद आता, शेजारीपाजारीही उमटल्याशिवाय राहणार नाहीत. लंका, ब्रह्मदेश तसेच पाकिस्तानातील जनताही दडपली गेलेली आहे. तेथील राजवटी अन्यायावर उभ्या आहेत. या सर्व आसपासच्या देशांत असंतोष खदखदतो आहे. परकीय मदत घेऊन आर्थिक अरिष्टे पुढे ढकलण्याची कसरत याही देशांत चालूच आहे आर्थिक स्वयंपूर्णता, लोकशाही स्वातंत्र्याची, जपणूक करून कशी साधावयाची हा पेच या सर्व आशियायी देशांसमोर उभा आहे. भारतीय मृगेन्द्राची ही जाग, ही गर्जना, हा त्याने साधलेला भीमपराक्रम या आसपासच्या देशांतील जनतेलाही स्फूर्ती दिल्याखेरीज राहणार नाही. शेवटी या उपखंडाचे प्रश्न समान आहेत. श्रीमंत बड्या राष्ट्रांची आर्थिक मांडलिकी सर्वांवरच जुलूमजबरदस्तीने, किंवा मदतीच्या नावाखाली लादली जात आहे. हे सारे अर्धविकसित देश अर्धमांडलिक अवस्थेत आहेत व भाकरी व स्वातंत्र्य या दोन्हींचीही त्यांना तितकीच निकड आहे. भारतीय मृगेन्द्राचे हे इतिहासदत्त कार्य आहे की, त्याने आपल्याबरोबरच आसपासच्या या सर्व लहानमोठ्या देशांनाही हे आर्थिक पारतंत्र्य झुगारून देण्याची, एक स्वयंपूर्ण अर्थरचना खडी करण्याची स्फूर्ती द्यावी. प्राचीनकाळी तर सांस्कृतिक दृष्ट्या हा सर्व भूप्रदेश एकात्मच होता. या सर्व भूभागाला त्यावेळी जंबूद्वीप हे समान नामाभिधान लाभलेले होते. 'जंबुद्वीपे भरतखंडे' हा प्राचीनांचा स्वदेश होता. इंग्रजांनी तो लहान केला. फाळणीमुळे तो आणखी लहान झाला. ही फाळणीची साम्राज्यसत्तांनी लादलेली प्रक्रिया आता उलटवण्याची परस्परबंधुभावातून एकत्र येण्याची वेळ जवळ येत चालली आहे. भारतीय मृगेन्द्राची स्वातंत्र्याची, स्वत्वाची घनगर्जना आता चहूदिशांतून घुमली पाहिजे, तिच्यामुळे त्या त्या देशातील भ्रष्ट, हुमकूशाही राजवटीही कोलमडून पडल्या पाहिजेत. हे महत्कार्य आहे आणि हे साधायचे तर, महत्कार्याचे कंकणही हाती बांधायला हवे आहे. हे कंकण न बांधताच इंदिराजी हे साधू पाहत होत्या. म्हणून त्यांना अपयश येत होते. त्यांच्या राजवटीचा आता निरोप घेत असताना भारतीय जनतेने हे कधीही विसरता कामा नये की, मांडलिकत्वाची आत्यंतिक चीड असणारी ही एक प्रखर राष्ट्रवादी व्यक्ती होती. स्वयंपूर्ण, समर्थ आणि बलसंपन्न भारताची उभारणी त्यांनाही अभिप्रेत होती— नव्हे ते त्यांचे एक स्वप्नही होते. पण केवळ राजकीय कसब दाखवून हे स्वप्न सत्यसृष्टीत उतरवण्याचा त्यांचा प्रयत्न होता. त्यासाठी जनमानसात काही खोल नैतिक जाणीवांचा उदय व्हावा लागतो, त्या आधारे काही जनसंघटन सिद्ध व्हावे लागते, याचे त्यांना भानच नव्हते. त्यामुळे बांगला देशच्या युद्धात त्या विजयी होऊ शकल्या. भारताकडे त्यांनी दक्षिण आशियाचे नेतृत्व खेचून आणले. 'भारतीय उपखंड' हा शब्दप्रयोग नव्याने रूढ झाला. हे सर्व त्यांचे कर्तृत्व होते. पण मुख्य आघाडी -आर्थिक होती. तिच्यासाठी काही वैयक्तिक आणि राष्ट्रीय चारित्र्यबळाचे कंकण हाती बांधणे आवश्यक होते. ही व्रतनिष्ठा त्यांच्या स्वभावात नव्हती असत्य आणि अनीती यांचे भय त्यांना नव्हते. आसुरी सत्ताकांक्षा हाच त्यांच्या राजनीतीचा पाया होता. अशी राजनीती काही नेत्रदीपक चमत्कार घडवून आणू शकते, पण नवसमाज निर्मितीची पायाभरणी करू शकत नाही. ज्या धक्कातंत्राने इंदिराजींचा राजकीय प्रवास सुरू होता त्या तंत्राचा हा धक्कादायक शेवट अटळ होता. मुलाने तो शेवट आपल्या अविवेकाने लवकर खेचून आणला, इतकेच. अनुशासनाशिवाय राष्ट्रीय प्रगती अशक्य असते हे खरे. पण अनुशासन केवळ लादलेले असून चालत नाही. जनतेचा

स्वयंस्फूर्त पाठिंबा त्यामागे उभा असावा लागतो. ही जनतेची स्वयंस्फूर्ती इंदिराजींनी मारून टाकली. हळूहळू भ्रष्टता वाढत गेली, त्यांच्या राजवटीचा टोळक्यांच्या कंपूशाहीत अधःपात झाला. विदूषक आणि खुषमस्करे यांच्या गोतावळ्यात त्या पूर्ण अडकल्या. कारण महत्कार्याची ओढ होती, पण व्रतनिष्ठेचे कंकण हाती नव्हते. ते असते तर, हा दुर्दैवी राजकीय अंत, ही पराभवाची शोकांतिका त्यांना सहज टाळता आली असती. २५ जूनपर्यंत तरी जनता त्यांच्यावर प्रेमच करीत होती. या प्रेमाचा इंदिराजींनी इन्कार केला आणि सत्तामदाने त्या अधिकाधिक धुंद आणि उन्मत्त होऊ लागल्या. न्यायअन्यायाची चाड संपली, खऱ्याखोट्याचा विधिनिषेध उरला नाही सत्तेला सेवेची जोड असती तर हे असे आले नसते. कुठे तरी कुणाचे तरी ऐकले गेले असते. ज्या प्राचीन परंपरेचा अभिमान त्यांच्या व्यक्तिमत्वात भिनलेला होता, त्यातील मौलिक भागाचे त्यांना विस्मरण व्हायला नको होते. विनोबांना जेव्हा त्यांनी दूर सारले, जयप्रकाशजींना, संघाला जेव्हा त्यांनी शत्रुस्थानी मानायला सुरुवात केली, साधुत्वाची, शुचित्वाची परंपरा जेव्हा त्यांनी लाथाडली, तेव्हा त्यांच्या राजवटीचे उरलेसुरले नैतिक अधिष्ठान संपुष्टात आले आणि मग केवळ दडपणे थोडी सैल होण्याचा अवकाश पुरला. लोकक्षोभाचा प्रचंड वणवा भडकला आणि त्या, त्यांचा मुलगा, त्यांचे सर्व टोळके, संपूर्ण नेहरू राजवटच या वणव्यात सापडून इतिहासजमा झाली.

'विनाशकाले विपरीत बुद्धी—' दुसरे काय म्हणायचे या अंतपर्वाला ?

मात्र राजवट अशी इतिहासजमा झाली तरी तिचा वारसा डोळसपणे सांभाळावा लागतो. त्यात नवीन भरही घालावी लागते.

समर्थ आणि स्वयंपूर्ण भारताचे स्वप्न इंदिराजींना का पूर्ण करता आले नाही ? त्यांच्या वडिलांनाही लोकशाहीवादी असूनसुद्धा या कामी अपयश का आले, याचा नीट शोध घेतला गेला तरच अशी नवीन भर या ऐतिहासिक वारशात घालता येईल.

येथील जनतेचे सामर्थ्य आपण नीट ओळखले नाही हे एक महत्त्वाचे कारण सांगता येईल.

येथील जनविराट जागृत करण्याची कोणालाच आवश्यकता वाटली नाही.

नेहरूंनी आणि इंदिराजींनी शासनसंस्थेवर केवळ भर दिला. वरवरचा जनस्तुतिवादाचा सोपा मार्ग स्वीकारला.

या जनस्तुतीवादाचे युग संपले तरच नेहरूयुग संपले असे म्हणता येईल.

पण यासाठी जनहितवादाची कास धरायला हवी, अप्रिय पण पथ्यकर धोरणांचा धैर्याने, सातत्याने पाठपुरावा करायला हवा

जनतेला यासाठी शिक्षित आणि संघटित करण्याचे लांब पल्ल्याचे कार्य केल्याशिवाय असे धैर्य केवळ लोकसभेत बहुमत आहे म्हणून एखाद्या राजकीय पक्षाला दाखवता येत नाही, हा आजवरचा अनुभवही ध्यानात धरायला हवा.

यासाठी सत्तेची आणि सेवेची एक क्रांतिकारक एकजूट घडवून आणावी लागेल.

आणि हे घडून आले तरच भारतीय मृगेंद्र त्याचे इतिहासदत्त कार्य तडीस नेऊ शकेल.

आज तो फक्त जागा झाला आहे.

ही त्याची जागा अल्पकालीन न ठरो

—श्री. ग. मा.


ग्रामीण आंदोलनांचा मागोवा घेणारे पुस्तक

# श्री ग्रा मा य न

( दुसरी आवृत्ती : प्रकाशनाच्या वाटेवर )

श्री. ग. माजगावकर

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव । पुणे ३०

मूल्य पंधरा रुपये

# चक्रमचक्री

दीर्घस्मृती विश्वनाथ

## शुचिष्मंत दाभोलकर

दोन महिन्यांच्या निवडणुकांच्या हंगामात शब्दांचा महापूर लोटला आणि लोकशाहीच्या प्रवाहाला पडलेला राज्यकर्त्यांच्या बेलगाम कारभाराचा बांध पायासकट वाहून गेला. आता सत्तेवर कोणीही असले तरी, १८ जानेवारी १९७७ पूर्वीची स्थिती येण्याची शक्यता अजिबात उरली नाही. आणीबाणी लोक विसरून जातील आणि कदाचित् रेट्रॉस्पेक्टिव्ह इफेक्टने आणीबाणी कधी झालीच नव्हती अशी दुरुस्तीही इतिहासात होऊन जाईल !

पण आणीबाणी आणि मुस्कटदाबी हे केवळ राज्यकर्त्यांचेच कर्तृत्व होते असे नाही !

आपल्या प्रत्येकाच्या मनात दुसऱ्याची मुस्कटदाबी करण्याची, दुसऱ्यावर जुलूम जबरदस्ती करण्याची, वेठबिगार लादण्याची आणि आपल्या अहंकाराला बेबंद वाव मिळवून देण्याची इच्छा नुसती खदखदत असते. आणीबाणी काळात सत्तारूढ टोळक्याची ही मग्रुरी क्षीट आणील इतक्या तीव्रतेने जाणवली इतकेच. सरकारने तोंडदेखले का होईना, पण स्वायत्त म्हणून मानलेल्या शिक्षणासारख्या क्षेत्रातसुद्धा आणीबाणीतल्या मुस्कटदाबीचा फायदा घेऊन झोटिंगशहांनी जी अरेरावी गाजविली तिला तोड नाही.

कोण असे हे झोटिंगशहा ?

आपल्या पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. दाभोळकर ! काय बसला ना धक्का ? माझादेखील विश्वास नव्हता बसला. पण परवाच पुण्यात कॉलेज-शिक्षकांची एक सभा त्यांच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला घालणाऱ्या सेवानियमांचा निषेध करण्यासाठी भरली होती. तेथे मी दाभोलकरांच्या आणीबाणीतल्या लीला ऐकल्या.

अहो, पण दाभोळकर म्हणजे केवढी दबदबा असलेली व्यक्ती ! उठताबसता औचित्य, आत्मानुशासन, साधनशुचिता, कर्तव्यनिष्ठा, शिष्टाचार अशा जाडया शब्दांची आचमनं घेणारे हे आचार्य कुळातील बृहस्पती आणि त्यांना तुम्ही झोटिंगशहा म्हणता ? तुमची काही चूक होत असली पाहिजे.

मलादेखील असंच वाटलं. पण जेव्हा सगळी माहिती कळली तेव्हा आपली काहीही चूक होत नाही अशी खात्री पटली. कुलगुरू दाभोलकर हे थोर सत्वशील आणि शुद्ध आचरणाचे आहेत असा त्यांचा लौकिक आहे. प्रत्येक प्रश्नाचा निर्णय आपल्या सदसद्विवेकाच्या संवेदनाक्षम ताजव्यात घालून ते करतात असेही ऐकले आहे. भ्रष्ट कारभाराची त्यांना येणारी चीड प्रायोयवेशनासारखा आत्मक्लेशाचा मार्ग पत्करून त्यांनी व्यक्त केली होती. पण अशा थोर मनुष्यात एक दोष सहजच उद्‌भवतो. आपण समाजप्रबोधक असल्यावर इतरेजन अज्ञानी असणार, अशी धारणा होते; स्वतः आत्मानुशासनशील आहोत तेव्हा इतर उच्छृंखल असावेत अशी शंका येते; स्वतः कामसू आणि निरलस असल्याने इतर कामचुकार आणि आळशी आहेत अशी भावना होते; स्वतः सदा उत्साही असल्यावर सामान्य माणसांची बॅटरी दर सहामाहीला डाऊन होते असे वाटू लागते. इतकेच नव्हे तर ती बॅटरी रीचार्ज करणारा भक्कम दाबाचा विद्युत्प्रवाह आपण आहोत अशी भ्रांत समजूत होते; आपण चोकस विचार करणारे आहोत तेव्हा इतरांजवळ मांडण्याजोगे स्वतंत्र विचार नाहीतच असे बिनहरकत मानता येते; आपण निर्भीड आणि निस्पृह असल्याने इतर लाचार आणि लाळघोटे आहेत असा उपसिद्धान्त येतो; सारांश एक प्रकारचा शुचितागंड निर्माण होतो आणि त्यांतून लोकशाही संकेतांचा भंग करणारे वर्तन घडू लागते.

पण तुमच्याजवळ याचा काही पुरावा आहे का ?

पुरावा तो आणखी कोणता हवा ? महाराष्ट्रातील कुलगुरूंच्या समितीने हे सेवा-नियम तयार केले; त्यावर दाभोळकर नक्कीच होते. हे नियम थक्क करणारे आहेत. त्यातल्या इंग्रजीच्या चुका आपण सोडून देऊ; पण शिक्षकांच्या विचारस्वातंत्र्यावर घाला घालणाऱ्या नियमांचा निर्वाह कसा करावयाचा ? याबाबत दाभोळकर गुरूजींच्या समितीने केलेला नियम असा : "शिक्षकाला शैक्षणिक विचारस्वातंत्र्य आहे. परंतु कोणताही पक्ष, विचारसरणी अगर तत्त्वप्रणाली यांच्या विरुद्ध असणारे एकांगी विचार मांडण्यासाठी त्याने वर्ग, चर्चासत्र अगर विचारगोष्टी यांच्या व्यासपीठाचा उपयोग करू नये." आता बोला तसेच हा नियम पाहा, "एखाद्या शिक्षकाविरुद्ध फौजदारी गुन्हयासंबंधाने कारवाई सुरू होताच त्याला निलंबित करावे" म्हणजे चौकशीपूर्वीच फाशी ! आहे की नाही बाईंची विद्यापीठीय आवृत्ती !

पण दाभोळकरांना हे नियम कदाचित इतर कुलगुरूंच्या दडपणामुळे मान्य करावे लागले असतील.

जे इतरांच्या दडपणाला बळी पडतात त्यांनी आत्मानुशासनाच्या गप्पा कशासाठी माराव्यात ! बरं, जिथे दाभोळकरांवर कोणाचे दडपण येण्याचा संभव नसावा अशा बाबतीत तरी दाभोळकर कसे वागले ? निदान् तिथे तरी त्यांनी काही विवेक वापरायला हवा होता की नाही ? काही शिष्टाचार पाळायला हवे होते की नाही ? दाभोळकरांच्या अरेरावीची हवी तितकी उदाहरणे देता येतील.

१९७५ च्या सप्टेंबरात सरकारने कॉलेज आणि युनिव्हर्सिटयांतील शिक्षकांना नवीन वेतनश्रेणी लागू करणारा हुकूम काढला. त्या हुकूमासोबत एक करारपत्र जोडले होते आणि प्रत्येक शिक्षकाचे मालकांना ते करारपत्र सही करून दिले की त्याने नवीन वेतनश्रेणीसोबत असलेल्या शर्ती मान्य केल्या असे मानून त्याला नवी वेतनश्रेणी मिळणार होती. या शर्ती इतक्या जुलमी आणि अपमानकारक होत्या की, कोणीही त्या ठोकरून लावल्या असत्या. पण ती आणीबाणीची मध्यरात्र होती. तेव्हा 'अशुभस्य कालहरणं' या विचाराने शिक्षक संघटनांची खटपट, कराराची शेवटची तारीख जी १ डिसेंबर ती पुढे ढकलून घ्यावी अशी होती. अशा वेळी दाभोळकरांनी काय करावे ?

काय केले दाभोलकरांनी? त्यांनीही सरकारला मुदतवाढीची मागणी केली असेल?

छ: ! शिक्षकांचा पाणउतारा करण्याची अशी संधी दाभोलकर थोडीच सोडतील! त्यांना वाटले की, ही मास्तरे नव्या वेतनश्रेणीसाठी जिभा बाहेर काढून लाळ गाळत उभी आहेत; त्यांना इतका तरी अवकाश कशासाठी द्यायचा? त्यांनी हुकूम काढला की, १ डिसेंबर वगैरे काही नाही; ३१ ऑक्टोबरच्या आत करार पुरा करा, नाही तर नवी वेतनश्रेणी मिळणार नाही.

पण सरकारी हुकमात १ डिसेंबर ही तारीख असताना हा आगाऊपणा दाभोलकरांनी कशासाठी केला?

त्यात तर दाभोलकरांच्या कुरठ्या मनाचे सगळे गुल्म साखळलेले आहे. आधीच्या मार्चच्या परीक्षांवर शिक्षकांनी बहिष्कार घातल्यामुळे सरकारला नवी वेतनश्रेणी द्यावी लागली होती. वास्तविक त्यात दाभोलकरांना वैयक्तिक नामुष्की वाटण्याचे काहीच कारण नव्हते. पण तेव्हापासून परीक्षांचे काम शिक्षकांकडून विनामेहनताना—म्हणजेच वेठबिगारीने उरकून घ्यावे, असा दाभोलकरांचा अट्टाहास होता आणि नेहमी हीच अट सरकारी हुकमाने शिक्षकांवर लादली होती. ३१ ऑक्टोबरच्या आत करारावर सह्या झाल्या असत्या तर, नोव्हेंबरच्या परीक्षांत ही वेठ दाभोलकर शिक्षकांवर लादू शकले असते. म्हणून ही घिसाडघाई. तसाच प्रकार गेल्या वर्षी झाला.

हे काय नवीन?

गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात—किंवा ऑगस्ट असेल—बाबूराव कुलकर्णी यांच्या सहीचे एक पत्रक आले.

म्हणजे परीक्षेतल्या गैरव्यवहाराचा आरोप ज्यांच्यावर आहेत तेच ना?

हो तेच; आणि ज्यांच्यावर विद्यार्थ्यांचा राग झाला असता— 'अहो, माणूस चिडतो; तुम्ही नाही का रागावत,' असे म्हणून दाभोलकरांनी विद्यार्थ्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला होता, तेच ते.

बरं, काय होते त्या पत्रकात?

त्या पत्रकात म्हटले होते की, परीक्षेचे काम सक्तीने करावे, असे ठरविण्यात आले आहे. कोणी ठरवले, केव्हा ठरवले, ठरवणाऱ्यांना तसे ठरवायचा अधिकार काय; याचा काही खुलासा नाही. तेव्हा शिक्षकसंघटनांचे नेते दाभोलकरांना भेटले आणि म्हणाले की, नवीन वेतनश्रेणीचे सारेच प्रकरण कोर्टात असल्याने अशी सक्ती करता येणार नाही. त्या वेळी आपले निरिच्छ कुलगुरू म्हणाले, 'अहो, पण आम्ही कामाचा मोबदला देणार आहो, मग सक्तीत बिघडले कोठे?'

यात दाभोलकरांचे काय चुकले?

चांगलेच चुकले. सध्या शिक्षकांना परीक्षेचे काम नाकारण्याचे स्वातंत्र्य आहे. दाभोलकरांच्या विचारात ते पारच गाभटले. पण आपल्या कुलगुरूंना त्याचे काय महत्त्व! त्यांच्या लेखी सारे शिक्षक परीक्षेचे काम केव्हा मिळतेय आणि पैसे सुटतायत केव्हा यासाठी वखवखलेले आहेत. त्यांच्या स्वातंत्र्याची, स्वाभिमानाची बूज दाभोलकर थोडीच राखणार! म्हणूनच मी म्हणतो की, शिक्षकांच्या सेवानियमात ज्या अपमानकारक अटी आहेत त्या घालण्यात दाभोलकरांचा वाटा जरूर आहे; त्या पापांची जिम्मेदारी त्यांनी उचलली पाहिजे.

बोलण्याच्या ओघात दाभोलकरांनी नवीन वेतनश्रेणीचा करार पुरा करण्याची जी घाई केली त्यातून निष्पन्न काय झाले ते सांगायचे राहिलेच.

हो; राहूनच गेले ते. दाभोलकरांची दादागिरी थांबेना तेव्हा अनुशासनशंकरांना तार करून दाद मागावी लागली. काय दैवदुर्विलास पाहा, आत्मानुशासनशील दाभोलकरांच्या अन्यायी वर्तनाची दाद हुकूमशाही कारभाराचा गड्डा असे जे मुख्यमंत्री त्यांच्याकडे मागावी लागावी! पण दाभोलकर असे निगरगट्ट की, त्याविषयी दिलगिरीचा, आत्मसमर्थनाचा किंवा खुलाशाचा यत्किंचित शब्द कधी त्यांनी काढला नाही. आणि संघटना हायकोर्टाकडे दाद लावण्यासाठी गेल्या अर्थात सरकारने अखेर काहीच केले नाही.

एकूण दाभोलकरांनी चांगलीच डाळ नासली असे तुमचे म्हणणे दिसते.

माझेच असे म्हणणे आहे असे नाही; किंबहुना, माझा या सगळ्यांशी फारसा संबंधही नाही. पण शिक्षकसंघटनांच्या ज्या कार्यकर्त्यांशी माझे बोलणे झाले ते सर्व या गोष्टींविषयी इतक्या चिरडीने आणि अभिनिवेशाने बोलत होते की, त्यांचा थोडा गुण मला चिकटला असावा. माझा हेतू निराळाच आहे. आपण नेहमी लोकशाही, स्वातंत्र्य, व्यक्तिप्रतिष्ठा यांविषयी बोलत असतो. पण या गोष्टी नांदण्यासाठी प्रत्येकाने स्वार्थ, अहंकार आणि पूर्वग्रह यांना मर्यादेत ठेवावे लागते हे विसरतो. हुकुमशाही केवळ शासकीयच असते असे नाही. शुचिष्मंत अहंकारी व्यक्ती देखील अधिकार गाजवू पाहते आणि इतरांची अवहेलना करते, इतकेच मला दाखवायचे होते. दाभोलकरांवर टीका हा काही माझा मुख्य उद्देश नाही.

स्वायत्त आणि स्वतंत्र विद्यापीठे ही स्वतंत्र न्यायसंस्थेसारखीच लोकशाहीच्या नांदवणुकीस आवश्यक आहेत, असे दाभोलकरांचे परममित्र अ. भि. शहा नेहमी म्हणतात. पण दाभोलकरांचा बेत विद्यापीठाचे रूपांतर 'सरकारी हमामखान्या'त करण्याचा असावा, असे त्यांच्या वर्तनावरून स्पष्ट दिसते. पण विद्यापीठ म्हणजे काही केवळ कुलगुरू नव्हेत. शिक्षणसंस्थांचे चालक, प्राध्यापक वगैरे मंडळी तरी व्यक्तिस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य ही मूल्ये मानणारी आहेत की नाही?

त्याही बाबतीत हाकाहाकच आहे, असे शिक्षकसंघटनांच्या सांगण्यावरून वाटते. अधिकाराचा गुणच असा आहे की, अधिक अधिकाराची वासना तो निर्माण करतो. इतकेच नव्हे तर, एका क्षेत्रातील अधिकार दुसऱ्या क्षेत्रात धकविण्यास प्रवृत्त करतो. आणीबाणीचा व्यावहारिक अर्थ असा आहे, की ज्याच्या हाती जो अधिकार असतो तो अधिकार अधिक निरंकुश होतो. शिक्षणक्षेत्रात गेल्या दीड-दोन वर्षांत हेच अनुभवाला आले. विद्यापीठातील अधिकारी वर्ग, विभागप्रमुख, महाविद्यालयांचे मालक आणि प्राचार्य, ज्याला जिथे संधी मिळाली तिथे त्याने हात मारून घेतला.

काही उदाहरणे तर द्याल?

हवी तितकी? प्रयोग-निर्देशक आणि पाठशिक्षक यांची पदोन्नती-म्हणजे पूर्ण शिक्षकाचा दर्जा त्यांना देणे— विद्यापीठाने आणीबाणीपूर्वी मान्य केली होती. पण कित्येक महाविद्यालयांनी अजून ती अंमलात आणली नाही. शिक्षक संघटनांचे सभासद होण्याला

प्राचार्य हरकत घेतात. एक प्राचार्य तर शिक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची वस्त्रे फेडीन अशी धमकी अधिक अर्वाच्य शब्दात देत असतात. हा सर्व राग का, तर सर्व शिक्षकांना महाविद्यालयाच्या कारभारात वाटा मिळावा अशी मागणी संघटनांनी केली म्हणून !

पण आपल्याकडची कॉलेजेस शिक्षकांनीच चालवलेली आहेत ना ?

नाही. आजीव सेवकांची पूर्वीची कल्पना आता जवळ जवळ संपली आहे. काही खुशामतखोर शिक्षकांची टोळकी म्हणजे हल्लीचे आजीव सेवक. इतर शिक्षकांना ते हीन लेखतातच, पण त्यांची पिळवणूक करण्यासही ते कमी करीत नाहीत. पुण्यात एक कॉलेज आहे. त्या कॉलेजला शिक्षकांना पगार देता येईना, तेव्हा त्यांनी काय करावे ?

समजावून सांगितले की, ह्या ह्या कारणामुळे परिस्थिती अडचणीची झाली आहे, म्हणून पगार देता येत नाही.

आः, सेवक-शिक्षकांना इतके विश्वासात घेतील तर ते मालक-शिक्षक या पदवीला लायक कसे होतील ? त्यांनी शिक्षकांची सभा घेऊन सांगितले की, आम्हाला ओव्हरड्राफ्ट काढून पगार द्यावा लागतोय, तर त्या ओव्हरड्राफ्टचे व्याज तुम्ही द्या, नाहीतर सरकारकडून पगारासाठी पैसे मिळतील तोपर्यंत थांबा. बहुतेक शिक्षक बिचारे व्याज द्यायला तयार झाले. पण प्रकरण इतक्यावर थांबलं नाही. ज्या बँकेमार्फत शिक्षकांना पगार वाटला जातो, त्या बँकेत प्रत्येक शिक्षकाच्या नावावर किती शिल्लक आहे, ही माहिती प्राचार्यांनी काढली.

प्राचार्यांचे बँकेशी लागेबांधे असतील.

असलेच पाहिजेत, नाहीतर अशी बेकायदेशीर गोष्ट कशी होईल ? मग प्रत्येकाला बोलावून धाकदपडशा दाखवायला सुरुवात. तुझ्या नावावर खात्यात इतके पैसे आहेत, इतकी संस्थेकडे ठेव, वगैरे. गावगुंडांनी चालवलेला गणेशोत्सव आणि या मालक-शिक्षकांनी चालवलेली कॉलेजेस यात काही फरक नाही उरला.

मुळात चिपळूणकर-टिळक-आगरकर यांनी आजीव सेवक पद्धती सुरू केली ती अशासाठी, की, शिक्षणसंस्था स्वतः शिक्षकांनी चालवल्या पाहिजेत. शिक्षणविषयक निर्णय दूरवर कोठेतरी होतील आणि ओझ्याच्या गाढवाप्रमाणे शिक्षक हुकूम वाहतील, हा प्रकार संपला पाहिजे. हा उद्देश जाऊन या शिक्षणसंस्था मालक-शिक्षकांच्या जहागिऱ्या बनलेल्या दिसतात.

अधिकार मिळाला की, तो वाढला पाहिजे आणि एकवटला पाहिजे, अशी प्रत्येक माणसाची इच्छा असते. जेव्हा सामाजिक व्यवहार मोकळा असतो तेव्हा अधिकारी व्यक्तींची महत्त्वाकांक्षा मर्यादित राहते. व्यवहारावर बंधने आली की, महत्त्वाकांक्षा मोकाट सुटतात. आणीबाणीच्या अंमलाचा काळ हा अशा प्रकारचा होता. 'आम्हास आम्ही पुनः पाहावे काढून चष्मा डोळ्यांवरचा' अशी संधी आपल्याला तेव्हा मिळाली. आपल्याला अधिकारी व्यक्तींच्या पिसाट वृत्तींचे हे दर्शन अतिशय उद्वेगजनक होते. □




लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी १९४८-४९

**लेखक : पु. ल. इनामदार**

**मूल्य : वीस रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०**


पाश्चात्य लेखकांच्या प्रभावळीतील एक तेज:पुंज लेखिका म्हणजे लिलियन हेलमन. ' द लिटल फॉक्सेस ', ' वॉच ऑन द ऱ्हाईन ', ' द चिल्ड्रेन्स अवर ' ' ऑटम गार्डन ', ' टॉईज इन द ॲटिक ' आदी तिच्या नाटकांनी साहित्यक्षेत्रात तिला अनन्यसाधारण स्थान मिळवून दिलं. ' ॲन अनफिनिश्ड वुमन ' या तिच्या आत्मचरित्रात्मक पुस्तकाला राष्ट्रीय पारितोषिक मिळालं. ' पेंटिमेन्टो ' हे तिचं दुसरं आत्मचरित्रात्मक पुस्तकही अतिशय गाजलं. परंतु एवढ्यासाठीच लिलियन हेलमन प्रसिद्ध नाही. तिच्या मनाचा कणा भुसभुशीत नाही. तो पोलादी कांबीसारखा कणखर आहे. हे तिनं मॅकार्थीच्या काळच्या युगात दाखवून दिलं. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात अमेरिकेतील अनेक विचार-वंतांनी रशियाला पाठिंबा दिला होता. परंतु शीतयुद्ध सुरू झालं आणि कम्युनिस्ट-धार्जिण्यांविरुद्ध प्रचंड मोहीमच निघाली. या वावटळीत हेलमन सापडली. ' हाऊस कमिटी ऑन अन-अमेरिकन ॲक्टिव्हिटिज ' ने हेलमनवर समन्स बजावलं. कम्युनिस्टांच्या एका बैठकीला हजर राहिली एवढाच काय तो तिचा दोष होता. हेलमन डगमगली नाही. ती संकटाला धीरोदात्तपणे सामोरी गेली. एक रोखठोक पत्र तिनं या कमिटीला पाठवलं. इतरांची नावे सांगायला तिने स्पष्ट नकार दिला. कमिटी तिला शिक्षा करू शकली नाही. परंतु नंतरची वर्षं तिला फार हालात काढावी लागली. सर्व जग तिला पाठमोरं झालं. पण तरीही ' दुर्गा 'वतार असलेली ही मनस्वी लेखिका ताठ मानेनं राहिली. हेलमननं त्या काळच्या युगातील कटू आठवणी सांगणारं ' स्काऊन्ड्रल टाइम ' हे पुस्तक गतवर्षी लिहिलं. विचारस्वातंत्र्याच्या सध्याच्या झगड्याला या पुस्तकाचं महत्त्व अमोल आहे. अमेरिकेत सर्वोत्कृष्ट ठरलेल्या या पुस्तकाचा हा परिचय. वास्तविक मागील जन-विराट अंकामध्ये ( दोन ) हा प्रसिद्ध व्हायचा. पण काही तांत्रिक अडचणींमुळे ते जमू शकले नव्हते. एकाच अंकात हा सर्व परिचय देऊन हा त्यावेळी झालेला उशीर शक्यतो भरून काढण्याचा प्रयत्न केला आहे.

हेलमनला ज्या काळातून जावं लागलं त्याची पार्श्वभूमी लक्षात यावी म्हणून या पुस्त-काला असलेला गॅरी विल्स यांच्या प्रस्तावनेचा सारांशही आरंभी दिला आहे.

## गॅरी विल्सच्या प्रस्तावनेतून

अमेरिकनवादाचं जतन करण्यासाठी नेमण्यात आलेल्या ' हाऊस कमिटी ऑन अन-अमेरिकन ॲक्टिव्हिटीज 'नं १९५२ साली लिलियन हेलमन या लेखिकेला समितीसमोर साक्ष देण्याचं फर्मान काढलं. जोसेफ मॅकार्थी तेव्हा आपल्या सत्तास्थानावर होता, सिनेटवर पुन्हा निवडून गेला होता. त्याच्या सिनेट समितीपुढं लिलियन हेलमनला साक्ष द्यावी लागली नाही. तिला साक्ष द्यावी लागली ती आरंभी उल्लेखिलेल्या समितीपुढं.

' कम्युनिस्ट या शब्दाची देखील या समितीला ॲलर्जी असावी, विचारवंतांना झोडपण्याच्या भरात टोकाला जाऊन अगदी फालतू आक्षेप उपस्थित करण्यात ही समिती पटाईत होती. १९४४ साली तयार करण्यात आलेल्या एका चित्रपटामुळं या समितीचे सभासद अस्वस्थ झाले. या चित्रपटाबाबत मते व्यक्त करण्यासाठी समितीने तज्ज्ञांना पाचारण केलं. त्यात ॲन रॅन्ड (' ॲटलास श्रग्ड ' व ' फाऊंटनहेड 'ची लेखिका) ही कादंबरीकार होती. तिनं या चित्र-पटातली चूक तात्काळ दाखविली. या चित्रपटात रशियन्स हसताना दाखवले होते हे तिला म्हणे आक्षेपार्ह वाटलं ! कम्युनिस्ट लोक प्रचारासाठी आपल्या चित्रपटातून रशियन्स हसताना दाखवतात. तेव्हा जर रशियन प्रचाराकरिता रशियन्स हसताना दाखवतात हे गृहीत धरले तर, या अमेरिकन चित्रपटात रशियन्स हसताना दाखवले याचा अर्थ तो रशियन प्रचाराचाच भाग होतो ! असं ती म्हणाली. अशा प्रकारचं अजब तर्कशास्त्र लढवण्यासाठी ॲन रॅन्ड प्रसिद्ध आहे. त्यावेळी समितीला साहाय्य करणाऱ्यांत वकील रिचर्ड निक्सन (तेच ते वॉटरगेटफेम !) होते. ते ॲन रॅन्डचे शिष्य. त्यामुळं त्यांनी या हसण्याविषयीच्या हास्यास्पद तर्कशास्त्राबद्दल रॅन्डना काहीही विचारलं नाही. जॉन मॅकडॉवेल यांना मात्र काही शंका आल्या. त्यांनी विचारलं-



### लोकशाही राजवटीतही लेखनस्वातंत्र्यासाठी झगडण्याची तयारी ठेवावी लागते ....

# बदमाष काळ I SCOUNDREL TIME

## लेखिका : लिलियन हेलमन

पुस्तक परिचय : अशोक जैन

मॅकडॉवेल : आता रशियात कोणीच हसत नाही का ?

रॅन्ड : शब्दशः म्हणत असाल तर मी म्हणेन 'नाही !'

मॅकडॉवेल : ते स्मितच करत नाहीत ?

रॅन्ड : अगदी आपल्यासारखं नाही. खाजगीत किंवा योगायोगानं ते हसतात. सामाजिक बाबतीत तर नाहीच हसत ते. आपल्या पद्धतीला आपली मान्यता आहे, हे काही ते हसून सांगत नाहीत.

या चित्रपटाचं नाव होतं 'साँग ऑफ रशिया.' पटकथा लेखिका रॅन्डनं हसावं पण योगायोगानं, 'सोशली' नव्हे, अशा सूचना पटकथेत दिल्या होत्या की काय न कळे. रॉबर्ट टेलर या चित्रपटातला हिरो. त्यालाही समितीने आपल्या न्यायासनापुढं खेचलं–

समितीचे वकील रॉबर्ट स्ट्रीपलिंग : ज्या चित्रपटात कम्युनिस्ट प्रचार आहे अशा चित्रपटात एक नट म्हणून तुम्ही सहभागी झाला होता काय ?

रॉबर्ट टेलर : तुम्ही 'साँग ऑफ रशिया' बद्दल विचारताय असं मी समजून चालतो. तेव्हा हा चित्रपट तयार करण्यात आला तेव्हाच मी त्याला आक्षेप घेतला होता. माझ्या बुद्धीला त्यावेळी असं वाटलं की, यात कम्युनिस्ट प्रचार आहे...असा चित्रपट तयार करायला नको होता. आज असा चित्रपट निर्मिला जाणार नाही असं मला वाटतं.

आता कम्युनिस्ट प्रचार होता हे ठाऊक होतं तर टेलरनं त्यात कामच का केलं ? सरकारच्या युद्ध–माहितीखात्यातील चित्रपट प्रचारप्रमुखानंच टेलरला त्या चित्रपटात भूमिका करण्याचा आदेश दिला होता. हिटलरच्या विरुद्ध लढणाऱ्यांत ते आपले दोस्त आहेत म्हणून रशियनांना हसताना दाखवलं होतं. त्यावेळी सरकारला ते मान्यही होतं. पण आता तीन वर्षांनंतर एकाएकी सरकारचा दृष्टिकोन बदलत होता. त्यामुळं रॉबर्ट टेलरला आपला जीव बचावण्यासाठी सारखी मतं बदलावी लागत होती. त्याला विचारण्यात आलं–

स्ट्रिपलिंग : चित्रपट हे मनोरंजनाचे माध्यम आहे, प्रचाराचे नव्हे हे तुम्हाला मान्य आहे का ?

टेलर : हो. अगदी ठामपणं मान्य आहे. चित्रपट उद्योगाचा उद्देशच मनोरंजन करणे हा असतो. त्याहून अधिक काही नाही किंवा कमीही काही नाही.

स्ट्रिपलिंग : चित्रपट उद्योग राजकीय चित्रपट न बनवता केवळ मनोरंजनात्मक चित्रपट बनवील तर ते या उद्योगाच्या दृष्टीनं अधिक हितकारक नाही का ठरणार ?

टेलर : माझं पण असंच खात्रीपूर्वक मत आहे. कम्युनिस्ट जर या उद्योगात काम करत नसतील तर त्यांनी त्यात लुडबूड करायचं काही एक कारण नाही.

परंतु मग टेलरमहाशयांना आणखी एक कोलांटी उडी मारावी लागली. राजकीय चित्रपट बनवू नये असं म्हणणाऱ्या टेलरना कम्युनिस्टविरोधी प्रचार चित्रपट बनवीत, असं सांगावं लागलं. कारण ज्या समितीपुढं त्यांची साक्ष चालू होती त्या समितीच्या अध्यक्षानं आपलं मत बदललं. टेलरला विचारलं गेलं—

जे. पार्नेल थॉमस : चित्रपट उद्योगानं कम्युनिस्टविरोधी, कम्युनिझमबद्दल वस्तुस्थिती दाखवणारे चित्रपट बनवावेत असं तुम्हाला वाटतं का ?

टेलर : जेव्हा तसा काळ येईल—आणि ती वेळ आता दूर राहिलेली नाही—तेव्हा असे चित्रपट बनवणं आवश्यक असेल. चित्रपट उद्योग कम्युनिस्टविरोधी चित्रपट बनवील आणि त्यांनी तसे बनवावेत असं मला वाटतं.

हॉवर्ड दा सिल्व्हा, कॅरेन मोर्ले, लेस्टर कोल ही मंडळी कम्युनिस्ट असावी असं आपल्या कानावर आल्याचंही टेलरनं सांगितलं. त्यामुळं या माणसांची नावं काळ्या यादीत गेली.

हॅरी ट्रुमन यांनी १९४७ साली नवा 'एकनिष्ठता कार्यक्रम' हाती घेतला. सर्व सरकारी कर्मचाऱ्यांची तपासणी, चौकशी करून ते एकनिष्ठ आहेत की नाही, याला संमती देण्यात आली. केवळ कम्युनिस्ट पक्षाचा सभासद आहे म्हणून खटले भरले जाऊ लागले. ॲटर्नी जनरलनं गेरहार्ट एसलरला अटक करून एलिस बेटावर स्थानबद्ध करून ठेवलं. अॅप्रोपिएशन्स कमिटीनं दहा सरकारी कर्मचाऱ्यांवर उघड उघड हल्ला चढवला. सेक्रेटरी जॉर्ज मार्शलनं या कर्मचाऱ्यांना काढून टाकलं. कम्युनिस्ट, फॅसिस्ट, एकसत्तावादी व दडपशाही मताच्या असलेल्या संघटनांची एक यादी बनविण्यात आली. कोठल्याही बेकायदेशीर कृत्याचा आरोप न करता, कसलाही पुरावा सादर न करता केवळ यातील एका संघटनेशी संबंध आहे म्हणून त्या व्यक्तीला उत्तर देण्याचीही संधी न देता, तो अप्रामाणिक असल्याचं शिक्कामोर्तब केलं आहे. हा जाच वाढतच गेला. यांपैकी कुठल्याही संघटनेला पैसे दिले असतील किंवा त्याच्या बैठकीला कोणी हजर राहिले असेल तर, त्याचा काळ्या यादीत समावेश केला जाऊ लागला. अशा यादीतील नागरिकांना सरकारी नोकरी तर सोडाच, खाजगी कंपन्यातही नोकरी मिळणे मुश्किल झाले. सरकारने या काळ्या यादीतील नागरिकांवर सर्वसाधारण संदिग्ध आरोप ठेवला. न्यायालयात हा आरोप टिकू शकला नसता.

मॅकार्थीचं काळंकुट्ट युग हे १९५० साली त्यानं जेव्हा प्रथम आरोप केला तेव्हा सुरू झालं नाही. ते सुरू झालं १९४७ सालीच ट्रुमन, ॲटर्नी जनरल टॉम क्लार्क व जे. एडगर हुव्हर या तिघांनी या काळ्याकुट्ट युगाचा आरंभ केला. हाऊस अन–अमेरिकन ॲक्टिव्हिटीज कमिटीला या लोकांनी हत्यारं दिली. म्हणजे साक्षीदारांवर वापरता येईल अशी ती काळी यादी पुरवली. जोपर्यंत कुठलाही नागरिक आपला प्रामाणिकपणा सिद्ध करत नाही, तोवर तो अप्रामाणिक मानला जाऊ लागला. आणि असे प्रामाणिकत्व सिद्ध न करणाऱ्यांना नोकऱ्या नाकारण्यात आल्या. प्रत्येकानं आपलं प्रत्येक पाऊल काळजीपूर्वक उचलायला हवं. आपण कोणाला भेटतो, कुठे जातो हे नियंत्रित करायला हवं. चुकून एखाद्या बैठकीला हजर राहिला, एखादा संघटनेच्या मदतीसाठी चेक दिला की, मग तुमची मान अडकली. काळ्या यादीत बसण्याचा मान तुम्हाला मिळे व मग पोटापाण्याची पंचाईत. ॲटर्नी जनरलनं केलेली ही यादी हे मॅकार्थीझमचं 'मूळ पाप.'

ही कुऱ्हाड घातली गेली हॉलिवूडवर. देशाला ध्येयात्मक संरक्षण द्यायचे असेल तर, हॉलिवूड राजकीयदृष्ट्या सेन्सॉर करायला हवे, असे ठरविले गेले. युद्धकाळात ज्या हॉलिवूडने फॅसिझमविरोधी चित्रपट निर्मून सरकारची सेवा केली, तेच हॉलिवूड १९४७ साली कम्युनिझमविरोधी म्हणजेच रशियाविरोधी चित्रपट बनवायला तयार झाले. लष्करी धोक्यापेक्षा रशियाचा धोका अमेरिकन ध्येयवादाला आहे असे मानले गेले.

अमेरिकेनं पहिलं महायुद्ध सुरू केलं ते कार्ल मकला स्थानबद्ध करून आणि दुसरं महायुद्ध सुरू केलं ते निसेइला तुरुंगात टाकून. १९४७ साली जेरहार्ट ईस्लर या जर्मन कम्युनिस्ट पाहुण्याला एलिस बेटावर स्थानबद्ध करून अमेरिकेनं तिसरं महायुद्ध सुरू केलं असं जेम्स बर्नहॅम म्हणतो. पूर्वी फॅसिझमचा प्रखर विरोध झाला, आता त्याची जागा कम्युनिझमनं घेतली. कम्युनिझमला शत्रू मानलं गेलं आणि त्याच्याविरुद्ध प्रचाराची, कारवाईची तोफ डागली गेली. रिचर्ड निक्सन हॉलिवूडला रशियाविरोधी चित्रपट तयार करण्यास प्रोत्साहन देऊ लागले. अमेरिकेत राहतो व अमेरिकन नागरिकत्व आहे म्हणजे एखादी व्यक्ती अमेरिकन झाली असं नाही तर ती विचारानंही अमेरिकनच असली पाहिजे असं म्हटलं गेलं. अमेरिकन वाद अस्तित्वात असल्याचं सांगितलं जाऊ लागलं. त्यानुसार ज्याचे योग्य विचार नाहीत तो अमेरिकेत 'अन–अमेरिकन' मानला जाऊ लागला. ही चाचणी ध्येयात्मक होती. त्यामुळे अन–अमेरिकन ॲक्टिव्हिटीज कमिटीसारखी कमिटी अस्तित्वात आली. राजकीयदृष्ट्या इतर देशांत असं होत नाही. अन–ब्रिटिश ॲक्टिव्हिटिज असं मानलं जात नाही. अमेरिका हा असा पहिलाच देश होता की त्यात, हे असं अन–अमेरिकन लेबलं लावायची मोहीम निघाली.

'अन–अमेरिकन' हा शब्दप्रयोग प्रथम वापरला तो १९३४ साली सॅम्युयल डिकस्टेन या उदारमतवाद्यानं. 'जर्मन–अमेरिकन बन्ड'मधील जर्मनीशी सहानुभूती असणाऱ्यांची चौकशी करण्यासाठी अशी समिती असावी असं त्यानं सुचवलं होतं. १९३८ साली ही समिती अस्तित्वात आली तेव्हा जहाल, समाजवादी व फॅसिस्ट यांच्याविरुद्ध चौकशी करणे हे तिचं काम ठरलं. अमेरिकेत दोन प्रकारचे नागरिक आहेत असा भेद केला गेला. एक म्हणजे एकनिष्ठ

प्रामाणिक अमेरिकन्स आणि दुसरे ज्यांनी कसल्याही कायद्याचा भंग केलेला नाही, परंतु जे अमेरिकनवादात कमी पडतात असे 'अन–अमेरिकन्स!' या अन–अमेरिकन्सचा छळ होई, त्यांना सरकारी नोकरीतून काढून टाकलं जाई, त्यांच्यावर पाळत ठेवली जाई.

लिलियन हेलमन ही या काळातीलच नव्हे तर, अमेरिकेच्या इतिहासातील एक थोर नाटककार आहे. हेन्री वॅलेस १९४८ साली निवडणुकीस उभा असताना त्याच्या प्रचारमोहिमेत हेलमननं काम केलं होतं. तसंच डॅशियल हॅमेट याच्याबरोबर ती वर्षानुवर्ष राहत होती. हॅमेट हा कम्युनिस्ट होता. वॅलेसच्या प्रचारमोहिमेत काम केल्याबद्दल हेलमनचं नाव अनेक काळ्या यादीत गेलंच. पण कम्युनिस्टविरोधकांचा ससेमिरा तिच्या मागे लागला तो १९४९ साली वॉल्डार्फ–अॅस्टोरिया हॉटेलात झालेल्या जागतिक शांततेसाठी सांस्कृतिक व विज्ञान परिषदेत तिनं पुढाकार घेतला तेव्हा.

या परिषदेमुळं सरकारचं परराष्ट्र खातं गडबडून गेलं. या परिषदेत येणाऱ्या कोणाला व्हिसा दिला जाईल व कोणाला नाही हे जाहीर केलं गेलं. रशिया मुक्तपणे प्रवेश देण्याच्या बाबतीत अगदी वाईट आहे, तेव्हा आम्ही कोठले कलावंत व विचारवंत यांना अमेरिकेत प्रवेश द्यायचं नाकारलं याविषयीची सव्वीस पानी श्वेतपत्रिकाच सरकारनं प्रसृत केली. परिषदेत सरकारी हस्तक घुसवण्यात आले. सिडने हूकनं 'अमेरिकन्स फॉर इंटलेक्च्युअल फ्रीडम' या संघटनेच्या नावाखाली प्रति परिषद भरवली गेली. मेरी मॅकार्थी व ड्वाईट मॅकडोनाल्ड यांनी मूळ परिषदेला हजर राहून तेथे गडबड केली. नॉर्मन कुझिन्सनं परिषदेच्या उद्घाटनला हजर राहण्यास नकार दिला होता. परंतु तेथे जाऊन परिषदेच्या आयोजकांवर हल्ला चढव असं परराष्ट्रखात्यानं सांगताच नॉर्मन परिषदेला हजर राहिला.

अमेरिकन सरकारनंच लिलियन हेलमनला दुसऱ्या महायुद्धाच्या काळात रशियाला भेट द्यायला सांगितलं होतं. परंतु आता युद्धानंतर सरकारी धोरण बदललं होतं. १९४९ साली कम्युनिस्ट द्वेष आणखीच वाढला. माओनं चीनवर मिळवलेलं प्रभुत्व, रशियानं केलेला अणुस्फोट व जून १९५० मध्ये झालेलं कोरियन युद्ध यामुळं सरकार रशियावर चिडलं. कट्टर कम्युनिस्ट–द्वेष्टे बनलं. १९५० मध्ये मॅकार्थीनं प्रथम आरोप केले नि अॅल्जर हिसला अटक झाली. मॅकार्थीझमच्या आक्रमणाची तयारी झाली. १९५१ मध्ये रोझेनबर्गना फाशीची शिक्षा झाली आणि मग कमिटीनं आपला रोख हॉलिवूडकडे वळवला. नागरी हक्क समितीच्या निधीला कोणी कोणी पैसे दिले हे सांगण्यास डॅशियल हॅमेटनं नकार दिला तेव्हा कमिटीची बेअदबी केली म्हणून त्याला तुरुंगात पाठवण्यात आलं. लिलियन हेलमनवर हे संकट कोसळणार हे स्पष्ट झालं. परंतु हॅमेटच्या तुरुंगवासानंतर एक वर्षानं हे संकट आलं.

१९४७ पेक्षा १९५२ चा एकूण मूड गंभीर होता. १९४७ साली या 'अन–अमेरिकन' समितीला लोक हसत, समितीचं वातावरणही सर्कशीसारखं असे. पण १९५२ साली गोष्ट वेगळी होती. समितीनं अनेकांना तुरुंगात पाठवलं होतं. समितीनं टेरर निर्माण केलं होतं. नोकरी, प्रतिष्ठा, अॅकॅडमी अॅवॉर्डस वाचवण्यासाठी बडे बडे लोक स्वतःची सदसद्विवेकबुद्धी विकत होते. लॅरी पावर्स, विख्यात चित्रपट दिग्दर्शक व कादंबरीकार एलिया कझान (अमेरिका, अमेरिका, अरेंजमेंट फेम), जोस फेरर यांनी सहकाऱ्यांची, कम्युनिस्टांची नावे जाहीर केली. कझाननं तर न्यूयॉर्क टाइम्समध्ये मोठ्या जाहिरातीच दिल्या!

अशा वेळी लिलियन हेलमन ही दीपस्तंभासारखी, खंबीर उभी राहिली. विचारस्वातंत्र्याचा उद्घोष तिनं केला. विरोधी परिस्थितीला तिचं हे एकाकी सामोरं जाणं किती महत्त्वाचं होतं, हे लक्षात घेण्यासाठी ही सारी पार्श्वभूमी लक्षात घेणं आवश्यक आहे.

गॅरी विल्सनं हे सारं आपल्या सदतीस पानांच्या प्रस्तावनेत सविस्तरपणे दिलंय. आणि मग सुरू होते ती लिलियन हेलमनच्या या काळाकुट्ट काळातील आठवणींची कहाणी.

---

## ती म्हणते :

---

यापूर्वी दोनदा मी या मॅकार्थी काळाबद्दल लिहायचा प्रयत्न केला. परंतु मी जे लिहिलं ते मलाच रुचलं नाही. या दुःखद, वेदनामय, 'कॉमिक' काळाविषयी मी लिहिलं नाही, याची कारणं साधी होती. त्यात काही गूढ नव्हतं. कारण त्या काळाची कटू चव मला घेरून होती, ती स्पष्ट करणं कठीण होतं. परंतु आपण त्याला सामोरं गेलं तर इतकं अवघड वाटायचं नाही, आपण लिहू शकू असं वाटलं. सिनेटर मॅकार्थी व मॅककॅरन, निक्सन, वॉल्टर आणि वूर या साऱ्यांनी मला शासन केलं. त्यांनी गरज वाटली तेव्हा भूतकाळ उकरून काढला आणि गरज नसतानाही बदनाम केलं.

हाऊस अन–अमेरिकन अॅक्टिव्हिटीज कमिटीनं मला सुनावणीला बोलावलं. त्यावेळी आलेल्या अनुभवानं मला शॉकच बसला, चीड आली. माझ्या अवतीभवतीची माणसं, सुशिक्षित, विचारवंत जे सांगतात, त्यावर विश्वास व्यक्त करतात त्याच्याशी ते प्रामाणिक असतात, त्याला धरून राहतात असा माझा समज होता. परंतु मॅकार्थी आणि त्याची टोळी जेव्हा आपलं अधिराज्य गाजवू लागली तेव्हा मात्र त्यांच्याविरुद्ध उभे राहण्यास फारच थोडे लोक पुढे आले. तेव्हा त्यावेळी आणि आताही मला असं वाटतं की, ज्यावर माझा विश्वास होता त्यानंच माझा विश्वासघात केला. विचारवंत कशासाठीही लढतील हे समजण्यात माझी चूक झाली.

डॅशियल हॅमेट हा माझ्या जीवनाचा फार मोठा भाग होता. १९३०–४० या काळात अनेक लोक जहाल राजकीय तोडगे हवेत, अशा मताचे झाले. डॅशियलही त्यात सामील झाला, १९३७ किंवा १९३८ मध्ये डॅशियल कम्युनिस्ट पक्षात गेला. मी कधी कम्युनिस्ट पक्षाची सदस्य झाले नाही.

मात्र हॅमेटबरोबर तीन–चार वेळा त्यांच्या बैठकीस गेले होते, त्यापैकी दोन बैठका हॉलिवूडमधील एका घाणेरड्या स्पॅनिश घरात व एक किंवा दोन न्यूयॉर्कमधील एका फ्लॅटमध्ये झाल्या. मी या बैठकीतून लौकर उठून गेल्यानं या बैठका कुणाकडे झाल्या, कोण हजर होतं हे मला आठवत नाही. हॉलिवूडमध्ये झालेल्या बैठकीस

सात किंवा आठजण हजर होते. यांपैकी तिघांना मी काहीशी ओळखत होते. या बैठकीचा जो कोणी अध्यक्ष किंवा नेता होता त्याला बुटाच्या नाडया बांधायची व सोडण्याची संवय होती. तसंच पिवळ्या पॅडचे कागद काढून ते फाडून तो ते जमिनीवर फेकत होता. त्यामुळं चर्चेपेक्षा त्याच्या या लकबीकडेच माझं लक्ष गेलं. दुसरा एकजण सारखं 'पक्षाचा तोंडावळा' अशा शब्दप्रयोग करत होता. त्याच्या या शब्दप्रयोगानं माझं त्याच्याकडे लक्ष वेधलं गेलं. त्याला काय म्हणायचं हे जाणून घ्यायची माझी इच्छा होती. दोन स्त्रिया–त्यांतली एक तरुण होती– जोरजोरानं एकमेकींशी बोलत होत्या. त्यांतली मध्यमवयीन बाई एका अत्याधुनिक वस्त्रभांडाराची मालक आहे हे मला नंतर समजलं. अशा स्त्रीनं जहालवाद्यांच्या गटात सामील व्हावं यानं मी प्रभावित झाले. कारण अशा गटाशी तिचे संबंध आहेत अशी कुणकुण लागली असती तर, तिला आपल्या व्यवसायावर पाणी सोडावं लागलं असतं.

ती कोठल्याच राजकीय पक्षात बसू शकत नाही याची मला जाणीव झाली होती. मात्र जहालवाद्यांची मनं ते देशातील–परदेशातील असोत, मी प्रशंसक बनले होते. मला ते निष्ठावान व गंभीर विचार करणारे वाटत. डॅशियल हॅमेट अगदी कट्टर जहालवादी बनला व मी बनले नाही हे खरे आहे! तुरुंगाविषयीची हॅमेटची प्रतिक्रिया विचित्र आणि चिडखोरीची होती. माझ्यापुढं जेव्हा तुरुंगवासाचं संकट उभं राहिलं तेव्हा त्याच्या या भावनांचा माझ्यावर चांगला परिणाम झाला नाही. कारण तो ज्या गोष्टी सहन करू शकतो त्या गोष्टी मी सहन करू शकत नाही, हे मला उमजलं होतं. माझ्याविषयी त्याला भीती वाटायला लागली ती फेब्रुवारी १९५२ पासून! ◻

ईस्ट ८२ व्या रस्त्यावर एका नव्या जॉर्जियन घरात मी राहायची. माझ्या फ्लॅटवर एक भाडेकरू राहत असे. अशा प्रकारच्या घरात तळमजल्यावर घंटा असते. भेटायला येणाऱ्यानं घंटेचं बटन दाबायचं व मग एका उपकरणात बोलायचं अशी व्यवस्था असते. मला या व्यवस्थेचा कंटाळा आला होता. त्या दिवशी लिफ्टमधून एक निग्रो मालकाकडं आला. तो जास्तच सभ्य दिसत होता. त्यानं मला विचारलं, तुम्हीच लिलियन हेलमन का? मी होकार दिला नि त्याला विचारलं, 'तुम्ही कोण?' त्यानं मला एक पाकीट दिलं. हाऊस अन-अमेरिकन ॲक्टिव्हिटीज कमिटीनं माझ्यावर समन्स बजावलं होतं व, ते द्यायला तो आला होता. मी पाकीट फोडलं व समन्स वाचलं, समन्स बजावण्यासाठी काळ्या माणसाला पाठवायची कल्पना 'स्मार्ट' आहे नाही? असं सांगून मी दार खाडकन बंद केलं.

ते समन्स हातात घेऊन मी घरात तासभर बसून राहिले. कोणाशीही बोलायची माझी इच्छा नव्हती. मग मी डुलकी काढली व नंतर डॅशियल हॅमेटला फोन केला. कटानोहून पुढची आगगाडी पकडून मी येतो तोवर काही करू नकोस, असं त्यानं सांगितलं. परंतु मघाची ती शांतता निघून गेली होती.

मी तात्काळ स्टॅन्ले आयझॅक्सकडे गेले. तो मॅनहॅटन बरोचा अध्यक्ष होता. हे प्रकरण आपण हाताळावं असं त्याला वाटेना. दोघं मिळून कोणीतरी योग्य माणूस शोधू या, असं तो म्हणाला. परंतु दोघं मिळून हे काम करणं जमेना. पुढील काही दिवसांत स्टॅन्लेनं अनेक सूचना केल्या. परंतु मला त्यांतली एकही पटली नाही. नंतर मी अबे फोर्टासला फोन केला. मी होऊन त्याला फोन कसा केला हे आता आठवत नाही. मी त्याला कधी भेटले नव्हते, परंतु मी त्याच्याबद्दल व त्याच्या अर्नोल्ड, फोर्टास व पोर्टर या वकिलांच्या कंपनीबद्दल ऐकलं होतं. दुसऱ्या दिवशी मी न्यूयॉर्कला येतोय तेव्हा भेटेन, असं त्यानं मला सांगितलं.

त्याला मी फोन कसा केला हे आठवत नसलं तरी त्याच्याशी झालेली भेट मात्र मला आठवते आहे. उंच खिडक्यांबाहेर हवामान खोडकर होतं आणि माझ्यासमोर एका न शोभणाऱ्या खुर्चीत तो बसला होता. मी नर्व्हस होते. मी त्याला समन्सबद्दल सांगितलं. त्यानं माझ्या भूतकाळाविषयी काही प्रश्न विचारले. ते काही तसे महत्त्वाचे नव्हते. त्याचं म्हणणं असं पडलं की, या कमिटीपुढे मी स्वतःबद्दल–मग ते परिचित असोत वा अपरिचित–काहीही सांगू नये. त्यासाठी पाचव्या घटनादुरुस्तीचा आधार मी घ्यायचा नाही. परंतु कमिटीनं माझ्यावर विश्वास ठेवला नसता. पण मी फोर्टासशी सहमत झाले. त्याचं म्हणणं होतं की, मी त्याच्या सूचनेवर विचार करावा. मी त्याला सांगितलं, तशी काही गरज नाही. परंतु तरी त्याचा तसा आग्रह होता. निघताना मात्र त्यानं मला सांगितलं की, 'माझी कंपनी तुझी केस घेऊ शकत नाही. कारण ओवेन लॅटिमोरच्या प्रकरणात माझी कंपनी बाजू मांडते आहे. लॅटिमोरमुळं तुझ्या केसमध्ये बाधा येईल किंवा तुझ्यामुळं त्याच्या केसमध्ये बाधा येईल.' त्याला एक चांगला तरुण वकील ठाऊक होता. पुढील खेपेस त्याच्याबद्दल बोलू असं फोर्टासनं जाताना सांगितलं.

माझा स्वभाव तसा चिडखोर आहे. सामान वेळेवर आलं नाही किंवा फोन जास्त वेळ वाजत राहिला तरी मला चीड येते. माझा स्वतःवर ताबा राहत नाही. परंतु जेव्हा खरं संकट उभं राहतं तेव्हा माझ्यातला नर्व्हसपणा मागे पडतो नि त्याची जागा शांतता घेते. संकटाची चाहूल लागली की, त्याचा माझ्यावर आरंभी परिणाम होतो, याविषयी मला खात्री नाही. संकट आलं की त्याला सामोरं जायचं ही वृत्ती याला कारणीभूत असावी. ◻

फोर्टासला भेटून आल्यावर दुसऱ्या दिवशी मी काय करायचं ठरवलं आहे हे हॅमेटला सांगितलं. डॅश आपला संताप क्वचितच प्रकट करी. त्याचा राग व्यक्त करण्याची पद्धत म्हणजे तो माझ्याकडं रोखून पाही. बराच वेळ त्याचं हे रोखून पाहणं चाले. जणू या चक्रम बाईशी जमवून कसं घ्यायचं, असा विचार तो करीत असावा असं वाटावं. तेव्हा अशा त्याच्या रोखून पाहण्याची मला अनेक वेळा सवय होती. परंतु या खेपेस मात्र त्याचं रोखून पाहणं इतकं लांबलं की, मी अस्वस्थ झाले. मी तेथून बाहेर पडले. थोड्या वेळानं मी भटकून आले. जेवायला काय करायचं, एवढंच आम्ही बोललो. राग गेल्यावर तो आपल्या कामात व्यग्र राही. तो विषय सोडून देई. परंतु या खेपेस तसं झालं नाही. जेवताना मध्येच त्यानं प्लेट बाजूला सरकवली व तो म्हणाला, 'ते तुला नेहमीपेक्षा अधिक काळ तुरुंगात पाठवतील. फोर्टास काय म्हणतो याला मी काडीचीही किंमत देत

नाही. तुझ्या उच्चभ्रू नीतिनियमांची ते बिलकुल पर्वा करणार नाहीत. तुला काही पटवून द्यायचं म्हणजे मगजमारीच आहे. पण लक्षात ठेव, तुरुंगात उंदरांचा सुळसुळाट असतो. काही माणसं केवळ त्यांना आवडतं म्हणून तुझा छळ करतील. रक्षक बेफिकिरीनं वागतील, तोंडात घरवणार नाही असं अन्न देतील आणि असलं अन्न जर तू खाल्लं नाहीस तर एकाकी तुला कोठडीत टाकतील.'

माझ्या डायरीवर मी नजर टाकली तेव्हा त्या सबंध आठवड्यात हॅमेटनं मला पुन्हा पुन्हा हेच ऐकवलं हे लक्षात आलं. मग मी त्याला आणखी एक वाईट बातमी सांगितली. अंतर्गत महसूल खातं आता आपल्याला आणखी काही उत्पन्न मिळवू देणार नाही. काही वर्षांनंतर माझ्याकडं दिडकी उरायची नाही. तेव्हा आपल्याला शेत विकावं लागेल.

तो प्रसन्नतेनं म्हणाला, 'ठीक आहे. दुसरं शेत घेईस्तोवर तू जिवंत राहशील.' (पण मी नंतर दुसरं शेत घेतलं नाही. आता वयामुळं शेतावर मी काम करू शकेन असं वाटत नाही)

नंतर मी फोर्टासला फोन केला. त्यानं दिलेला सल्ला मान्य आहे, असं मी त्याला सांगितलं. त्याच्या भागीदाराला मात्र ही कल्पना पसंत नव्हती. मी कमिटीपुढे असे विचार मांडणे याचा अर्थ स्वतःच्या पायांनी तुरुंगाच्या वाटेकडं जाणं होय, असं त्याचं मत होतं. मी वॉशिंग्टनला भेटायला येते असं फोर्टासला सांगितलं.

त्यानं जोसेफ रौहशी दुसऱ्या दिवशी मुलाखत ठरवली होती. मी रात्री आगगाडीनं निघाले. रात्री निघायची ही कल्पना तितकीशी बरी नव्हती. माझ्या डोळ्याला डोळा लागला नाही. माझ्या डोक्यात हाऊस कमिटीबाबत तरी विचार असायला हवे होते किंवा रौहशी होणाऱ्या भेटीची मी विवंचना करायला हवी होती. परंतु याऐवजी माझ्या डोक्यात आमच्या शेतीबद्दल विचार घोळत होते. घरकाम करणारी किटी, शेतकरी बेटी व गस बेन्सन यांना कुठल्या तोंडानं दुसरीकडं नोकऱ्या शोधा म्हणून सांगायचं, याची मला चिंता होती. हे तिघे माझे मित्र होते. आठ–नऊ महिन्यांपूर्वी डॅश तुरुंगात असताना या तिघांच्या जिव्हाळ्याचा मला प्रत्यय आला होता.

मला रौह आवडला. आमच्या पहिल्या भेटी चांगल्याच झाल्या. तिसऱ्या खेपेला आम्ही भेटलो तेव्हा जोनं माझ्यासंबंधी तपास करून बरीच माहिती मिळवल्याचं माझ्या ध्यानी आलं. कम्युनिस्ट पक्षानं कधी 'डेली वर्कर' म्हणून, तर कधी दुसऱ्या प्रकाशनातून माझ्यावर टीका केली आहे, याकडे त्यानं माझं लक्ष वेधलं. उदाहरणार्थ, माझ्या 'वॉच ऑन द ऱ्हाईन' या नाटकावर युद्धपिपासू म्हणून टीका करण्यात आली होती. तसंच १९४८ साली टिटोचं रशियाशी फाटलं तेव्हा मी बेलग्रेडला जाऊन टिटोची मुलाखत घेऊन लेखमाला लिहिली. येथील कम्युनिस्टांना हे आवडलं नव्हतं. माझ्या गतकाळात मी किती स्वतंत्र होते, हे सिद्ध करण्यासाठी कम्युनिस्टांनी केलेल्या या टीकेचा पुरावा कमिटीपुढे व वृत्तपत्रांत द्यावा असं रौहचं मत होतं. मी सांगितलं, 'या गोष्टींचा माझ्या बचावासाठी मी वापर करणार नाही. जेव्हा कम्युनिस्टांचा छळ होतो आहे तेव्हा माझ्यावर त्यांनी केलेल्या हल्ल्याचा वापर मी करणे म्हणजे मी त्यांच्यांबरच हल्ला करणे असे होईल. त्याचा अर्थ मी शत्रूचा डाव खेळते आहे, असा होईल. तेव्हा हा पुरावा मी नाही सादर करणार.' मी त्याला हे स्पष्ट शब्दात सांगितलं त्यामुळं यावरची चर्चा बंद होईल असं मला वाटलं होतं, परंतु परत परत जो हा विषय उकरून काढीत होता. शेवटी यावर आमची तणातणी झालीच. 'तू फुकट वेळ घालवतो आहेस. याबाबत माझं मत बदलायचं नाही.' असं मी त्याला बजावलं.

रौहनं कमिटीपुढे साक्ष देण्याची मुदत वाढवून घेतली. दरम्यान मी माझं शेत विकायला काढलं. त्यामुळं मला व हॅमेटला अतीव दुःख झालं. पण एकदा शेत विकायचा निर्णय घेतल्यावर आम्ही त्याबद्दल काही बोललो नाही. घरी जाऊन कोठल्या कोठल्या वस्तू विकायच्या व कोठल्या मागे ठेवायच्या याची यादी मी करीत बसले. डॅश भविष्यकाळासंबंधी योजना आखीत बसायचा. भविष्यकाळ म्हणजे मी कारावासातून बाहेर आल्यानंतरचा काळ असं तो गृहीत धरायचा. तीन महिने बोटीनं सफरीला जायचं अशा योजना तो आखीत बसे.

नाट्यक्षेत्रात मी व क्लिफर्ड ओडेट्सनं जवळजवळ एकाच वेळी प्रवेश केला. १९३५ ते १९५२ या काळात आम्ही चार-पाच वेळा भेटलो असू, परंतु तो हॉलिवूडला आल्यावर मी त्याला कधीही भेटले नव्हते. मार्चच्या पहिल्या आठवड्यात त्यानं मला फोन केला. तो न्यूयॉर्कला आला होता व जेवायला यायचं त्यानं मला निमंत्रण दिलं. यापूर्वी त्यानं कधी मला बोलावलेलं नसल्यानं मला विचित्रच वाटलं. जेवायला जायची माझी इच्छा नव्हती. परंतु त्यानं फारच आग्रह केला तेव्हा मी कबूल झाले. ती संध्याकाळ विक्षिप्तच गेली. त्याविषयी १९५२ च्या माझ्या डायरीत मार्चमधील त्या दिवशी भली मोठी नोंद मी केली. ती अशी—

'आम्ही बारेट्टात भेटलो. त्यानं मला जेवायला का बोलावलं हे कळायला वेळ लागला नाही. क्लिफर्डनं विचारलं, 'हाऊस कमिटीनं बोलावलं की, काय करायचं हे ठरवलं आहेस का तू?'

कमिटीनं मला समन्स पाठवलं देखील हे मला त्याला सांगायचं नव्हतं, तेव्हा मी म्हणाले, 'मला वाटतं काय सांगायचं हे मी ठरवलंय. पण बऱ्याचदा तुम्ही ठरवता एक परंतु प्रत्यक्षात त्याचं पालन होतं न होतं...'

क्लिफर्ड काहीतरी म्हणाला, परंतु मला ते ऐकू आलं नाही. कारण शेजारच्या टेबलावरचे दोघेजण बडबडत होते. त्या दोघांच्या बोलण्याचं मला हसू आलं. पण त्यामुळं क्लिफर्ड चिडला असावा. कारण चढ्या सुरात त्यानं मला परत विचारलं, 'मी जे सांगितलं ते तू ऐकलं नाहीस.'

'नाही. सॉरी.'

'मी असं म्हणालो की, असा विचार करणं धोक्याचं आहे. तेथे

**'या गोष्टींचा माझ्या बचावासाठी मी वापर करणार नाही.'**

चेहऱ्यावर काय सांगायचं हे ठामपणं ठरवायला हवं..'

आता त्याला काय उत्तर द्यावं असा प्रश्न मला पडला. इतक्यात वेटर भोजनाचे पदार्थ घेऊन आला. तोंडावर बोट ठेवून क्लिफर्ड मला गप्प राहण्याची सूचना केली. वेटर जाईपर्यंत तो शीळ घालीत बसला.

'तुझ्या म्हणण्याचा अर्थ काय ?'

'कशाबद्दल ?' मला ज्या पद्धतीनं आमचं दोघाचं संभाषण चाललं होतं ते आवडत नव्हतं.

'कमिटीनं बोलावलं तर काय करायचं हे ठाऊक नाही याबद्दल.'

'मी असं म्हणालेले नाही. माझं म्हणणं इतकंच की, आपण काय करणार आहोत हे आपल्याला ठाऊक असलं तरी दबावाखाली आपण कसे वागू हे सांगता येत नाही.'

मग आम्ही ओडेरसच्या कलावस्तू संग्रहाबद्दल काही वेळ बोललो. मग एकाएकी त्यानं मला हादरवूनच टाकलं. जोरजोरानं मूठ टेबलावर आपटीत तो त्वेशानं ओरडला, 'मी या साऱ्या कमिटीवाल्यापुढे काय करीन हे सांगू शकतो. खरा जहाल माणूस कसा असतो हे मी त्यांना दाखवीन आणि जा बसा ××× असं सांगीन.' त्यानं टेबलावर मूठ एवढ्या जोरानं आपटली की, त्यामुळे ग्लासातली दारू बाहेर उडाली. त्याच्या त्या त्वेशानं मी प्रभावित झाले की, त्याच्या ओरडण्यानं आजूबाजूचे लोक आमच्याकडे पाहू लागले म्हणून प्रभावित झाले, हे मला सांगता येत नाही.

त्या दिवशी माझ्या डायरीत या पलीकडं काही नोंद नाही. परंतु या घटनेचा शेवट काहीसा गूढ व खेदजनक आहे. कमिटीपुढे माझी साक्ष झाली त्याच्या आदल्या दिवशी क्लिफर्ड ओडेरसची साक्ष झाली. त्यानं आपल्या जुन्या निष्ठांबद्दल क्षमायाचना केली नि आपले अनेक जुने मित्र कम्युनिस्ट असल्याचं कमिटीत सांगितलं. त्याच्या या वागण्यामुळे बारेट्टामध्ये जेवायच्या वेळी त्यानं जे सांगितलं होतं त्याचा अर्थ मला उमजेना. पण मग लक्षात आलं की, हॉलिवूडमधील आपल्या करियरला तिलांजली द्यायला लागू नये म्हणून त्यानं आपलं मत बदललं असावं. पोहण्याचा तलाव, टेनिस कोर्ट, चित्रांचा संग्रह आदि गोष्टींचं अनेकांना महत्त्व वाटे व त्या गमावू नयेत म्हणून हॉलिवूडमध्ये बरेचजण बदलले.

ओडेरसच्या भेटीनंतर काही आठवड्यांनी एलिया कझान मला भेटला. कझानला सारे 'गॅडगे' म्हणतात. 'कमिटीपुढे मी सरकारच्या बाजूनं साक्ष दिली नाही तर, हॉलिवूडमध्ये मला चित्रपट काढता येणार नाही.' असं स्पायरोल स्कोअरासनं आपल्याला बजावल्याचं कझाननं मला सांगितलं.

चित्रपट-उद्योगातील बड्याबड्यांची ही तारांबळ कझान मला १९५२ मध्ये भेटण्यापूर्वीच उडालेली होती. १९४७ साली वॉल्डॉर्फ अॅस्टोरिया हॉटेलात झालेल्या परिषदेच्या आधीपासून ह्या घबराटीस सुरुवात झाली होती. वॉल्डॉर्फ-अॅस्टोरिया हॉटेलातील परिषदेतच हॉलिवूड स्टुडिओतील प्रत्येकाकडून निवेदन लिहून घेण्यात आले. प्रत्येकाने या पत्रात आपण कम्युनिस्ट नाही हे शपथेवर जाहीर करायचं. जहालांशी आपला संबंध नाही आणि पूर्वी कोठल्या संघटनेला पैसे दिले असतील तर त्याबद्दल माफी मानायची, अशी चूक परत व्हायची ना ही असेही लिहून द्यायचे. मलाही अशा एका पत्रावर सही करायला सांगण्यात आलं होतं. या 'प्रसिद्ध' (!) पत्राचा नमुना मिळवायचा मी आता प्रयत्न केला. चौदा जणांना मी भेटले. असं पत्र लिहून घेतल्याचा कोणी इन्कार केला नाही. परंतु पत्राचा एकही नमुना मिळाला नाही.

हॉलिवूडमधील कम्युनिस्टांनी एकही कम्युनिस्ट चित्रपट बनवलेला नाही, हे चित्रपट-निर्मात्यांना ठाऊक होतं. परंतु त्यांच्यावर टीका करायला ते पुढे सरसावले. हॉलिवूडमधील जहालवादाचा धिःकार करणारी हजारो पत्रे हॉलिवूडला येत. ही पत्रे बनावट आहेत, किंवा मागणीनुसार लिहिलेली आहेत, हे स्टुडिओवाल्यांना ठाऊक होते. परंतु तरीही त्यांनी हा जनतेचा आवाज मानला. कोलंबिया पिक्चर्सच्या हॅरी कोहननं एवढे दिग्दर्शक, नट, लेखक उत्स्फूर्तपणे सरकारला सहकार्य करत आहेत म्हणून आनंद व्यक्त केला. त्याचं म्हणणं खरंच होतं. मित्रत्वाचा साक्षात्कार होण्यासाठी अनेक लोक उत्सुक होते. आपल्या सहकाऱ्यांविरुद्ध साक्षी द्यायला तयार होते.

१९४७ साली 'काळी यादी' अगदी कठोरपणे अंमलात आणली होती असे दिसत नाही. कारण कोलंबियाच्या हॅरी कोहननं मला हवी होती अशी एक ऑफर दिली. मला जेव्हा वाटेल, योग्य कथा सापडतील तेव्हा चार चित्रपटांच्या कथा मी लिहायच्या व या चित्रपटाचं निर्मिते व्हायचं. अंतिम संकलनावर माझं नियंत्रण राहणार होतं. (त्या काळात हे स्वातंत्र्य कोणी ऐकलं नव्हतं आणि सध्यादेखील हे क्वचित दिलं जातं.) ही ऑफर चांगली होती. कोणाचाही हस्तक्षेप न होता काम करायला मिळणार होत. मला दहा लक्ष डॉलर्स मिळणार होते. मला नाटकं वा अन्य काही लिहिण्याचीही पूर्ण मुभा होती. हॅरी कोहन व माझा वकील एकच होता. चार्ल्स श्वार्त्झ हे त्याचं नाव. दोघांचाही वकील एक असला तरी, त्यात काही बिघडत नव्हतं. चार्ली हा प्रामाणिक माणूस होता. ज्या दिवशी करार तयार झाला तेव्हा चार्लीनं मला बोलावलं. 'हॅरीकडे जाऊन करारावर सही कर, यावेळी करारात एखादी नवी गोष्ट असली तर, उगाच त्याबद्दल अकांडतांडव न करता सही कर. यापुढे प्रत्येकाला अशा गोष्टीला मान्यता द्यावी लागेल.' असं मला चार्लीनं सांगितलं.

करारातलं हे नवं कलम बहुतेक पैशाबद्दल असणार असा निष्कर्ष मी काढला व त्याचा फारसा विचार केला नाही.

वॉल्डॉर्फ टॉवर्समधील हॅरीच्या फ्लॅटवर मी गेले तेव्हा त्याच्या सेक्रेटरीनं मला सांगितलं की, खाली एका मिटींगमध्ये तो आहे, काही मिनिटात तो येईलच. कसली मीटींग होती हे मला ठाऊक नव्हतं. परंतु चित्रपटधंद्यातल्या माणसाकडं तुम्ही गेला की, ते कुठल्याशा मीटिंगहून परतायची वाट पाहावी लागते. हॅरी अर्ध्या तासानं आला. प्रेमभरानं त्यानं माझं स्वागत केलं नि तो लागलीच फोन करायला गेला. मी करार वाचू लागले. या करारातील एक परिच्छेद वाचला आणि माझा विश्वासच बसेना. मी परत एकदा तो परिच्छेद वाचला. पुन्हा वाचला. मी त्या खोलीत येरझाऱ्या घालू लागले तेव्हा हॅरी आणखी कोणाला तरी फोन करत होता. पण तो मला निरखीत होता. मला टाळण्यासाठी तो फोनवर जास्त वेळ

पान २३ वर

दि. २० मार्च : महाड क्रांती सुवर्ण महोत्सवानिमित्त लेख

# महाडचे चवदार तळे

प्रा. झुंबरलाल कांबळे

महाड आणि चवदार तळे यांचे नाव आजकाल सारखे गाजत आहे. महाराष्ट्रातील विचारवंत खडबडून जागे झाले आहेत. १९ व २० मार्च ( १९२७ ) या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इथेच सत्याग्रह केला. आपल्या असंख्य अनुयायांसह चवदार तळ्याचे पाणी प्राशन केले. तोच चवदार तळ्याचा सत्याग्रह. सामाजिक प्रबोधनाच्या इतिहासातील एक ताम्रपट. १९ मार्च १९७७ रोजी या घटनेस पन्नास वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने या क्रांतिकार्याचा सुवर्ण महोत्सव इथे भव्य प्रमाणात लवकरच साजरा होणार आहे.

या क्रांतीचा सुवर्ण महोत्सव साजरा करावा ही कल्पनाच मुळी स्फूर्तिप्रद आहे. ही मूळ कल्पना घनःशाम तळवटकर यांची. गेल्या तीन-चार वर्षांपासून त्यांनी उरी बाळगलेली. ज्या ज्या वेळी ते महाडला येत, त्या त्या वेळी झपाटल्यासारखी ही कल्पना कार्यकर्त्यांपुढे मांडीत. ह्या वर्षी ती कल्पना प्रत्यक्षात उतरणार आहे. त्यासाठी 'महाड–क्रांती-सुवर्ण महोत्सव समिती' स्थापन झाली आहे.

२५ डिसेंबर १९२७ साली चवदार तळ्याच्या सत्याग्रहासाठी इथे दुसरी परिषद भरली होती. याच प्रसंगी मनुस्मृतीचे दहन केले होते.

ती परिषद ज्या जागेवर भरली होती ती जागा स्मारकासाठी म्हणून मुंबईच्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीने विकत घेतली आहे. त्या जागेवर बाबासाहेबांचा पुतळा उभारणे, जिथे मनुस्मृतीचे दहन केले तिथे क्रांतिस्तंभ उभारणे, ग्रंथ आणि स्मरणिका प्रकाशित करणे अशी सुमारे दोन लक्ष रुपये खर्चाची योजना समितीने आखली आहे, कार्याला सुरुवातही झाली आहे.

महाडच्या चवदार तळ्यामुळे हे सारेकाही घडले आहे, घडत आहे. कसे आहे ते महाड ? कसे आहे ते भाग्यवान चवदार तळे ? अस्पृश्यांच्या मुक्तीगाथेची गंगोत्री आहे तरी कशी ?

महाड हे गावच मोठे नमुनेदार आहे. सावित्री आणि गांधारीच्या संगमावर वसलेले. चहूबाजूंनी पर्वताच्या रांगा. मध्ये महाड. गांधारीच्या काठी गांधारपाले. एक लहान खेडे. तिथे बौद्ध लेणी. अजूनही चांगल्या अवस्थेत असलेली. इ. स. च्या दुसऱ्या शतकात एका बौद्ध राजाने कोरून घेतलेली. विष्णुपुलिम त्याचे नाव. महाडचाच हाही एक भाग.

महाडची प्राचीन आणि आधुनिक वसाहत तळ्याच्याकाठी झालेली आहे. त्यामुळे त्यास तळ्यांचा गाव असेही म्हणता येईल. हाबसतळे, चवदारतळे, चांभारतळे, केतकीतळे, कोटेश्वरी तळे, वीरेश्वर तळे, काकरतळे, रुमाली तळे या आठ तळ्यांच्या काठावर विविध जाती-धर्मांच्या लोकांनी वसाहती केल्या आहेत. या तळ्यांचा उपयोग पाणी पिण्यासाठी करण्यात येई. सध्या बहुसंख्य तळी बुजली आहेत. चवदारतळे आणि वीरेश्वर तळे ही दोनच तळी चांगल्या अवस्थेत आहेत.

बाबासाहेब महाडला आले. त्यांनी आपला मोर्चा चवदार तळ्याकडे वळविला. १९ मार्चला जी पहिली परिषद इथे झाली ती वीरेश्वर थिएटरमध्ये. झापांचे हे तात्पुरते थिएटर माधव थरवळ यांनी गाडीतळावर उभारिले होते. तिथून हाकेच्या अंतरावर वीरेश्वर आणि वीरेश्वरतळे आहे. असे असूनही त्यांनी चवदारतळेच का निवडले ? याचे इतिहासात नमूद झालेले कारण असे : येथील नगरपालिकेने हा सार्वजनिक पाणवठा आहे, तो सर्व जातीधर्मांच्या लोकांना खुला केला आहे असा ठराव केला होता.

दुसरे असे की, चवदारतळे येथील ज्ञात-अज्ञात तळ्यांचा राजा आहे. ते महाडचे हृदय आहे. त्याच्या अवती-भोवती ब्राह्मण समाजाची वस्ती आहे. काठाकाठावर डोलणारे वृक्ष, त्यातून डोकावणारी मंदिरे, टुमदार माड्या, आणि निळे-निळे पाणी, चौकोनी आकाराने हे पवित्र कुंड चारी बाजूंनी बांधून काढलेले आहे. घडीव घाट, घडीव दगडी पायऱ्या. पाण्याकडे उतरत जाणाऱ्या. अशी त्याची रचना आहे. घाट सध्या काही ठिकाणी ढासळला आहे. काठावरची गर्द झाडी रस्तारुंदीमुळे कमी झाली आहे. थंडगार पाण्याने भरलेल्या या जलाशयाचे क्षेत्रफळ चार एकर एवढे आहे. त्याच्याशी महाडकर आबालवृद्ध पुरुष-स्त्रियांचे अतूट नाते जोडलेले आहे.

इतर वेळी इथे पोहण्याची सक्त मनाई असते. पण गोकुळाष्टमीला पोहण्यासाठी ते सर्वांना दोन दिवस खुले असते. त्या दिवशी सकाळपासून संध्याकाळपर्यंत येथील गोविंदावाले खालूबाजाच्या तालावर नाचत असतात. दहिहंड्या फोडीत फिरत असतात. वरून पाऊस कोसळत असतो. त्यांचा उत्साह वाढतच असतो. खालूबाजावाले एकाच स्वरात 'गोविंदा आला रे – आ ऽ ऽ' चे स्वर आळवीत असतात.

ढोलकीवाले त्याला जबरदस्त साथ देत असतात. ढोलकी पावसाने भिजू नये म्हणून तिच्यावर कुणी तरी छत्री धरलेली असते. ढोलकीवाले बहुधा कातकरी असतात. कुणीतरी हुशार 'गोविंदा' ढोलकीवाल्यांच्या गळ्यात फुलांचा हार मुद्दाम घालीत असतो. ते प्राणपणाने ढोलकी वाजवीत असतात. 'गोविंदा'वाले त्यांच्याभोवती जोशात नाचत असतात. पाऊस कोसळतच असतो. दहिहंडीवाले त्यांच्या अंगावर हळदीच्या पाण्याचा वर्षाव करीत असतात. बाजारपेठेत ठिकठिकाणी उंचच उंच दहिहंड्या लटकत असतात. त्या

फोडण्याच्या स्पर्धा सकाळपासून संध्याकाळपर्यंत चालू असतात. 'गोविंदा'वाले एकावर एक उभे राहतात. टॉवर तयार करीत असतात. त्यांच्यावर एखादा 'कृष्ण' असतो. त्याच्या हातात लाकडी गदा असते. तिच्या साहाय्याने तो दहीहंडी फोडीत असतो. खेळून दमल्यावर अशा 'गोविंदा'ना पोहता यावे म्हणून त्या दिवशी चवदार तळे खुले असते. याचा फायदा घेऊन सर्वजण मनसोक्त पोहत असतात. तरुण–तरुणी, म्हातारे, पोरे–पोरी. संपूर्ण तळे भरलेले असते. काहींच्या कमरेला हवाबंद डबे असतात. काही टयूबवर स्वार झालेले असतात. पट्टीचे पोहणारे आधाराशिवाय सूर मारीत असतात. एक घाट तरुणी आणि स्त्रियांसाठी राखीव असतो. तिथून त्या तळयात उतरतात. तळयाच्या मध्यभागी एक खांब रोवलेला असतो. काही तरुण पोहत जातात. त्यावर चढतात. वरून पाण्यात उड्या मारीत असतात. काहीजण काठावरील कठड्यावरून उड्या घेत असतात. तळयाच्या चोहोबाजूंनी गर्दी करून महाडकर हा सोहळा डोळे भरून पाहत असतात. तळयात एक छोटीशी होडी फिरत असते. वरून पाऊस कोसळत असतो. पोहणारांचा उत्साह वाढवीत असतो. बघणारे लोक छत्र्या उघडतात. पोहणारांना उत्तेजन देत असतात. दिवसभर हा असा सोहळा चाललेला असतो. प्रत्येक महाडकर चवदार तळयाशी समरस झालेला असतो.

डॉ. बाबासाहेबांनी आपला मोर्चा याच तळयाकडे वळविला. त्याचे हेही कारण नसेल कशावरून? मी नवीनच महाडला आलो तेव्हा वर्षभर याच तळयाच्या काठी मुक्काम होता. एका माडीत कॉलेजचे वसतिगृह होते. तिथे राहिलो होतो. त्यामुळे उन्हाळयात, पावसाळयात, हिवाळयात त्याच्या विविध रूपांचे दर्शन मला जवळून घेता आले. सतत कोसळणाऱ्या पावसात ते तुडुंब भरलेले असते. रात्र–रात्र पाऊस कोसळत असतो. तेव्हा त्याचे रूप वेगळाच आनंद देत असते. काठावरच्या टयूबलाईटचे पांढरेशुभ्र भिजकट–ओलसर प्रतिबिंब पाण्यात पडलेले असते. त्यांचा आणि पावसाच्या धारांचा पाठशिवणीचा खेळ चाललेला असतो. प्रत्येक थेंबागणिक त्याची असंख्य रूपे दृश्यमान होत असतात, हिंदकळत असतात.

हिवाळयात पहाटे पाच वाजता उठून तडक मी गॅलरीत येई. त्या वेळी त्याचे स्वरूप कुणालाही मोह घालण्यास समर्थ भासे. दाट धुक्यांचे ढग दाटलेले असतात. टयूबलाईट त्यात दटलेली असते. पौर्णिमेचा चंद्रच जणू! विरळ ढगाआड दडत असलेला. त्याच्याखाली ते अदृश्य झालेले असते. त्यातून त्याचे अस्पष्ट दर्शन होत असते.

महाडला उन्हाळा तीव्रतेने जाणवत असतो. अशा वेळी निळया पाण्याची पातळी बरीच खाली गेलेली असते. सूर्य भर मध्यान्हीवर आलेला असतो. अंगाची काहिली करीत असतो. पण चवदार तळयाच्या काठी हा दाह जाणवत नसतो. वाऱ्याच्या प्रत्येक झुळुकीबरोबर आल्हाददायक गारवा जाणवत असतो. इथले सुखासीन लोक निद्रासुखाचा आनंद उपभोगीत असतात.

हे तळे कुणी व कधी बांधले त्याचा इतिहास अज्ञातात गडप झाला आहे. पूर्वी याच्या काठी कागद तयार करणारांची वस्ती होती असे म्हणतात. महाबळेश्वराच्या डोंगरातून सावित्री उगम पावते. ती महाडजवळून वाहत जाते. पूर्वी तिचे पात्र या तळयाच्या मार्गाने वाहत असावे. नंतर तिने आपला मार्ग बदलला असावा, असा एक तर्क या संदर्भात करण्यात येतो.

या तळयाच्या तळाला जिवंत पाण्याचे झरे आहेत. त्यात चौदा विहिरी आहेत असे म्हणतात. '१९४० साली झालेल्या अवर्षणामुळे हे तळे आटले. त्यातल्या दोन विहिरी पुन्हा बांधण्यात आल्या.' अशा अर्थाची नोंद नगरपालिकेच्या दप्तरात सापडते. त्याच्या नावाची व्युत्पत्ती काहीजण पुढीलप्रमाणे सुचवितात.

१ : पाणी चवदार लागते म्हणून चवदार तळे.

२ : चौदा + दारे → चौदा + दार → चौदादार → चौदार→ चवदार : चौदा दारावाटे पाणी वर येते म्हणून चवदार तळे.

३ : चौदा → आड (विहिरी) → चौदाड → चौदार → चवदार.

२० मार्च १९२७ रोजी डॉ. बाबासाहेबांनी या तळयाच्या पाण्याला प्रथम स्पर्श केला. नंतर त्यांच्या असंख्य अनुयायांनी भराभरा तळयात उतरून पाणी पिण्याचा हक्क बजावला.

'महाराजांनी तळे बाटवले आता ते वीरेश्वराच्या मंदिरात प्रवेश करणार आहेत.' अशी दवंडी एका गुरवाने महाडात पिटली. बाळकृष्ण गुरव हे त्याचे नाव. त्यामुळे सत्याग्रहींना बाजारपेठेत मारझोड झाली. मारामारी शांत झाल्यावर बाबासाहेब मुंबईला निघून गेले. महाराजांनी तळे बाटवले आता पाणी भरायचे कुठे? असा प्रश्न येथील रहिवाशांपुढे पडला. ऐपतवाल्या लोकांनी निव्वळ याच कारणामुळे स्वतःच्या घरामागे नवीन विहिरी खोदल्या. सर्वांनाच ते शक्य नव्हते. लवकरच तळे शुद्धीकरणाचा कार्यक्रम झाला. तळे शुद्ध करून घेतले. डॉ. बाबासाहेबांना हे कळले तेव्हा त्यांना भयंकर संताप आला. 'गोमुत्राने आणि गाईच्या शेणाने तळे शुद्ध होते व माणसाच्या स्पर्शाने बाटते म्हणजे काय? आपण पुन्हा एकदा सत्याग्रह केला पाहिजे.' अशी त्यांनी आपल्या अनुयायांना हाक दिली. २५ डिसेंबर १९२७ साली पुन्हा एकदा चवदार तळयाकडे आपला मोर्चा त्यांनी वळविला. यावेळी येथील लोकांनी वेगळीच युक्ती केली. हे तळे खाजगी आहे. ते चौधरी नावाच्या माणसाने बांधले आहे. म्हणून त्याचे नाव चौधरी तळे आहे. असा दावा महाड कोर्टात लावला. पण हा दावा शेवटी खोटा ठरला.

या खोटया दाव्याप्रमाणेच एक खोटे निवेदन वर्तमानपत्रातून काही दिवसांपूर्वी प्रकाशित झाले आहे. 'चवदार तळे बुजविण्यात येणार आहे. ते बुजवू नये...' वगैरे. तशा प्रकारची कोणतीच योजना टाऊनप्लॅनमध्ये नाही किंवा नगरपालिकेच्या विचाराधीनसुद्धा नाही. उलट महाडच्या प्रत्येक नागरिकाला या तळयाचा अभिमान आहे. एक ऐतिहासिक स्मृती म्हणून ते सदैव जतन केले जाईल. त्याबद्दल येथील सर्व जातींचे नागरिक दक्ष आहेत. □

# सोलकढी

## □ दत्ता सरफांजवळचे बोचके

गेल्या काही वर्षात मराठी साप्ताहिकांना बरे दिवस आले आहेत. ललित वाङमयातल्या अधांतरीच्या प्रतिसृष्टीपेक्षा अवतीभवतीच्या सळसळत्या साक्षात् सृष्टीबद्दल वाचकांना अधिक आपलेपणा वाटू लागला आहे. त्या सृष्टीची ओळख, सवयलेल्या दैनंदिन टीकाटिप्पणीपलीकडे जाऊन करून दिली जावी, अशी अपेक्षा वाचक करू लागले. त्यामुळे साप्ताहिकांची गरज निर्माण झाली. दैनिकांच्या साप्ताहिक आवृत्त्या ही गरज भागवायला पुरेशा नव्हत्या. म्हणून साप्ताहिके निघत राहिली. 'साप्ताहिक मनोहर' हे त्यांपैकी एक ठळक साप्ताहिक.

पाच वर्षांपूर्वी ते मासिक होते. 'किर्लोस्कर' आणि 'स्त्री' यांचे ते धाकटे भावंड. किर्लोस्करी (कार) खानदानीत मोठ्या लाडात वाढलेले. त्या पाठबळानिशी ते मराठी साप्ताहिकांच्या गराड्यात उतरले आणि पाहता पाहता आपल्या भपकाव्याने चांगलेच लोकप्रिय झाले. नेत्रखेचक चित्रे, कडकभडक सदरे, चंदेरी पड्यामागच्या चटक चंदेरी कहाण्या, जिल्ह्यांची बातमीपत्रे, राजसामाजिक समस्यांच्या अनुराधाने दिलेले स्फोटक वृत्तान्त, वाचकांच्या मतप्रदर्शनाला भरपूर वाव, संपादकीय आवाहन या आणि अशा विविध माध्यमांतून 'साप्ताहिक मनोहर'ने महाराष्ट्रातल्या सर्व पातळ्यांवरच्या तारुण्याशी च्यूइंगमचिकट सलगी साधली आणि 'मनोहर'चा खप जीवनोपयोगी वस्तूंच्या भावपातळीपेक्षाही वेगाने वाढू लागला. 'सोबत' आणि 'माणूस' ही बरी स्थिरावलेली (आणि काहीजणांच्या मते दर्जावलेलीसुद्धा) साप्ताहिके पोटापुरता खप कसाबसा सांभाळून होती. त्यांना आणि त्यांच्यासारख्या लांबोडक्या चेहऱ्याच्या इतर काहीजणांना 'साप्ताहिक मनोहर'ची चालचलणूक शुचिर्भूत नाही असे वाटून ते काळजीने व्याकुळ झाले.

असे व्याकुळ होणे आम्हाला कधी साधलेच नाही. त्यामुळे आम्ही 'मनोहर'चे पदसिद्ध संपादक मुकुंदराव किर्लोस्कर आणि कार्यसिद्ध संपादक दत्ता सराफ यांच्या कौतुकाची खिरापत सर्वत्र वाटत सुटलो. दत्ता सराफांना आम्ही तसे नावाने ओळखत होतो (ते आम्हाला टोपणनावाने ओळखत होते); पण या 'साप्ताहिक मनोहर'मुळे करणीने ओळखू लागलो. 'मनोहर'चा खप पहिल्या काही महिन्यांत, अर्ध्या पाऊण लाखावर गेल्याचे ऐकले होते. तो यथाकाल खाली येईलच, असा शुभबोल शहाणी माणसे बोलत होती. खरे म्हणजे तो खाली येईल, असे 'मनोहर'वाल्यांनासुद्धा ठाऊक असले पाहिजे; तेवढे समजण्याइतपत अनुभव त्यांच्याजवळ असायला हरकत नाही, अशी माझी समजूत होती. पण माझ्या समजुतीची दखल घ्यायला शहाणी माणसे तयार नव्हती.

खप खरोखरच खाली आला तेव्हां त्यांचे समाधान झाले. इकडे, चढलेला खप आणि तो चढवणारे संपादक दत्ता सराफ एवढेच आमच्या स्मृतीत साचून राहिले. तरीसुद्धा सवंग करमणुकीचे तुणतुणे मी वाजवायला हवे होते; पण तेवढे भान मला राहिले नाही. उलट, सगळ्या मराठी साप्ताहिकांनी अशी सवंग (पण मनोहर) करमणूक करायचा वसा का घेऊ नये, असा प्रश्न आमच्या मनात येऊन गेला. असो.

साप्ताहिकाच्या यशापयशाच्या श्रेयाचे बोचके त्याच्या संपादकाने सांभाळायचे असते, अशी एक ग्रीक उक्ती आहे. 'साप्ताहिक मनोहर'चे गेली चार वर्षे संपादन करताकरता दत्ता सराफांजवळ जे बोचके जमा झाले ते किती जड वा हलके आहे याचा हिशेब ज्याचा त्याने करावा. हे बोचके उचलून दत्ता सराफ आता 'गोमंतक' दैनिकाच्या आडोशाला गेले आहेत.

दत्ता सरफांना आमच्या हार्दिक शुभेच्छा.

'साप्ताहिक मनोहर'चे दत्ता सराफ दुसरे असे जे श्री. भा. महाबळ त्यांनाही आमच्या हार्दिक शुभेच्छा.

—अनंतराव



डोले पीक सर्वदूरऽऽ..
सुख समृद्धी भरपूर..

अैका हो अैका . . . ऽऽऽ . . .
पिकं भरघोस होणार . . .
अन् डोलू लागणार . . .
व्हय, व्हय - आणि आपणही नाचणार
पण कवा ?
पिकांना लागणारी खते भरपूर
प्रमाणात मिळतील तवा.

खते - मग ती जमिनीतून देण्याची असोत
अथवा पिकावर फवारण्याची असोत - भरपूर
प्रमाणात द्या. त्या साठी जर आर्थिक
सहाय्याची जरुरी असेल तर आमच्या
जवळच्या शाखेस भेट द्या.



बँक ऑफ महाराष्ट्र
११७७, बुधवार पेठ, पुणे ४११००२.

जेथे अर्थसहाय्याची खरी जरूरी। तेथे 'बँक ऑफ महाराष्ट्र' लावी हजेरी।

PRAJAKTA

# खेड्यातील वैद्यकीय व्यवसाय

## एक हाताबाहेर गेलेले दुखणे

डॉ. सुरेश बेरी

लक्षणे तर अगदी स्पष्ट दिसत होती. महिनाभर रोज बारीक ताप, उजव्या मांडीच्या सांध्यात हालचाल करताना तीव्र वेदना, कमालीचा अशक्तपणा आणि चालताना लंगडणे. सांध्याचा क्षय या माझ्या प्राथमिक तपासणीनंतर केलेल्या निदानाबद्दल मला बिलकुल शंका वाटत नव्हती. रुग्ण व्यक्ती वीस वर्षांची विवाहित स्त्री. मावळच्या डोंगरमाथ्यावर राहणाऱ्या गवळी धनगर कुटुंबातील होती. आतापर्यंत दोन डॉक्टरांकडे जाऊन आलेली होती. काही फरक पडला नाही म्हणून माझ्याकडे आली होती. अर्थात माझ्याकडे येऊनही तिच्या प्रकृतीला आराम वाटणार नाही, याबद्दल माझी खात्री होती. कारण असे रुग्ण फक्त एकदाच येतात. एका वेळच्या औषध–इंजेक्शनने त्यांना आराम वाटला नाही तर, पुन्हा त्या डॉक्टरकडे ते जात नाहीत. पुन्हा नवीन डॉक्टर, पुन्हा तसेच एक दिवसाचे औषध आणि असे कुठपर्यंत तर तो पेशंट मरेपर्यंत.

असे पेशंट पाहून मी खरोखरी हताश होत असे. पेशंटचे रोगनिदान आपण व्यवस्थित करू शकतो. त्याला औषधोपचार कसा करायचा याचीही आपल्याला व्यवस्थित माहिती आहे. बरे, पेशंटकडून आपण अवाच्या सवा पैसेही उकळीत नाही. तरीदेखील पेशंट आपल्याकडून दुसरीकडे जातो याची मला खरोखरी चुटपूट लागून राहायची. पण थोड्याच दिवसांत हे लक्षात आले की, खेडेगावातून हा प्रकार सार्वत्रिक आहे.

याची कारणे आहेत तीन. एक म्हणजे अज्ञान, दुसरे दारिद्र्य आणि तिसरे म्हणजे डॉक्टर्स. हो डॉक्टर्ससुद्धा याला जबाबदार आहेत. कसे ते ओघाने सांगेनच.

अज्ञानाबाबत लिहायचे म्हटले तर, जितके लिहावे तितके थोडेच होईल. आपल्या ग्रामीण भागातील ८४ टक्के जनता निरक्षर आहे आणि जे साक्षर आहेत त्यांचे आधुनिक विज्ञानाचे ज्ञान अगदी नगण्य आहे. मावळसारख्या मागासलेल्या भागात तर, निरक्षरांचे प्रमाण सुमारे ९५ टक्क्यांहून अधिक असावे. किरकोळ आजारासाठी ही मंडळी डॉक्टरकडे जातच नाहीत. गंभीर आजार असेल तर प्रथम देवदेव करायचा आणि नंतरच डॉक्टरकडे जायचे. डॉक्टरकडे एक–दोन दिवस औषध घ्यायचे. दीर्घ मुदतीचा औषधोपचार करण्यासाठी पैसा नसतोच. खेड्यात असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र या सरकारने केलेल्या सोयीचा त्याला फारसा काहीच फायदा होत नाही. कारण या सरकारी दवाखान्यात कित्येक वेळा साधे बँडेज अगर कापूससुद्धा नसतो. डॉक्टर स्वतःची औषधे देऊन तथ्येतीत सरकारी दवाखान्यात खाजगी व्यवसाय करीत असतो.

कोणताही रोग कसा होतो याचे अजिबात ज्ञान नसलेल्या भोळ्या खेडुताला अनेकजण अनेक प्रकारे लुटत असतात. प्रथम खेड्यातला भगत आणि नंतर डॉक्टर.

आता हे डॉक्टर्स खेडेगावात कशी प्रॅक्टिस करतात याचे काही नमुने खरोखर चीड आणणारे आहेत. अर्थात सर्वच डॉक्टर्स असे करतात असे नाही. पण पेशंटसना फसवणाऱ्या डॉक्टर्सची संख्या ग्रामीण भागात बरीच मोठी आहे. डॉक्टर्सचे प्रकार दोन आहेत. एक प्रशिक्षित डॉक्टर व दुसरे भोंदू डॉक्टर (Quacks). या भोंदू डॉक्टर्सनी खेड्यात खरोखरी फार गोंधळ माजवला आहे. त्यामुळे बऱ्याच प्रशिक्षित परंतु प्रामाणिक डॉक्टरांची खेडेगावात सुरुवातीला फार चमत्कारिक अवस्था होते. हे भोंदू डॉक्टर म्हणजे कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण न घेतलेले आणि केवळ सरकारी नियमानुसार आर. एम. पी. (रजिस्टर मेडिकल प्रॅक्टिशनर)चा शिक्का लावलेले असतात. खरे तर यांचे ज्ञान कंपौंडरच्या तोडीचेच असते. पण हे लोक मात्र डॉक्टर म्हणून मिरवत असतात.

या मंडळींचा इंजेक्शनवर भयंकर भर. आलेल्या प्रत्येक पेशंटला इंजेक्शन दिल्याशिवाय परत पाठवायचेच नाही, असा जणू नियमच. या मंडळींनी खेडेगावातल्या बिचाऱ्या पेशंटस्ना इंजेक्शनचे एवढे वेड लावलेले असते की, काही विचारू नका. माझ्याकडे येणारा प्रत्येक पेशंट जेव्हा इंजेक्शनची मागणी करू लागला तेव्हा सुरुवातीला मी तर भांबावूनच गेलो. तुम्हाला इंजेक्शनची जरुरी नाही. मी तुम्हाला नुसत्या गोळ्यांनी बरे करतो, असे जेव्हा मी त्यांना परोपरीने सांगू लागलो तेव्हा मला असे आढळून आले की, ते पेशंट माझ्याकडे येईनासे झाले आणि त्यांच्या पूर्वीच्याच सुईवाल्या तथाकथित डॉक्टरकडे जाऊ लागले. शेवटी नाईलाजाने मलाही औषधशास्त्राचे सर्व नियम बाजूला ठेवून सुईवाला डॉक्टर बनावे लागले.

माझ्या माहितीतील एक कंपौंडर आहे. तो पुण्यातील एका फॅक्टरीमधील दवाखान्यात महिना ३०० रु. पगारावर कंपौंडर म्हणून काम करतो. आठवड्याच्या सुटीमध्ये हा गृहस्थ हातात एक बॅग घेतो आणि मावळ तालुक्यातल्या डोंगराळ भागातल्या गावामध्ये जाऊन चक्क डॉक्टरचा व्यवसाय करतो. तुम्हाला आश्चर्य वाटेल, हा गृहस्थ एका फेरीमध्ये चक्क १५० ते २०० रु. ची कमाई घेऊन परत येतो. त्याला एवढी कमाई कशी काय होते, म्हणून मी एकदा सहज विचारले

तेव्हा तो मोठ्या फुशारकीने म्हणाला,

"मी प्रत्येक पेशंटला दोन इंजेक्शन्स् देतो. एक पेनिसिलिन किंवा टेरामायसिनचे इंजेक्शन दंडामध्ये आणि दुसरे ग्लुकोजचे शिरेमध्ये (Intravenous) प्रत्येक पेशंटचे बिल होते १५ रु. असे दहा ते पंधरा पेशंट मी एका दिवसात पाहतो. दुसरा कोणीच डॉक्टर त्या डोंगराळ मुलखात फिरकत नसल्यामुळे मी सांगेन ती पूर्वदिशा" आणि तो मोठ्याने हसून विजयी मुद्रेने माझ्याकडे पाहू लागला. मला ओशाळल्यागत झाले आणि त्या भयानक डॉक्टरची अक्षरशः किळस येऊ लागली. वास्तविक ग्लुकोजच्या इंजेक्शनची सर्वसामान्य आजार झालेल्या पेशंटला काहीही गरज नसते. पण एका इंजेक्शनमागे ६–७ रु. मिळतात. ग्लुकोजपासून शरीराला अपाय काहीच नसतो. पेशंटलाही तात्पुरते जरा बरे वाटते. त्यामुळे पेशंटही खूष आणि पैसे मिळाल्यामुळे डॉक्टरही खूष. वारंवार शिरेतील इंजेक्शन्स् दिल्यामुळे पेशंटच्या रक्तात वर्ष–सहा महिन्यांनंतर गाठ तयार होण्याची शक्यता असते. या गाठीमुळे हात सुजणे, दुखणे वगैरे तक्रारी सुरू होतात. अर्थात या तक्रारींचा वर्षपूर्वी दिलेल्या इंजेक्शनशी संबंध आहे, अशी शंका पेशंटला येण्याची सुतराम शक्यता नसते. त्यामुळे आपण दिलेल्या औषधांमुळे झालेल्या दुष्परिणामांची जबाबदारी डॉक्टर सहज झटकू शकतो. गंमतीची गोष्ट म्हणजे या डॉक्टरच्या घरी कोणी आजारी पडले तर औषधासाठी तो त्यांना माझ्याकडेच घेऊन येतो.

मावळातील आणखी एका आर. एम. पी. डॉक्टरची कथा. पेशंटस्ना भुलविण्याची एक नवीनच पद्धत त्याने शोधून काढली आहे. कोणताही पेशंट आला की, त्याच्यासमोर तो इंजेक्शनच्या तीन निरनिराळ्या रंगाच्या बाटल्या ठेवतो आणि सांगतो की, इंजेक्शनची किंमत १० रु. याने एक दिवसात आराम वाटेल. दुसऱ्या इंजेक्शनची किंमत ५ रु. त्याने बरे व्हायला ३–४ दिवस लागतील. अशी इंजेक्शनची प्रतवारी करून दवाखान्याला त्याने किराणामालाच्या दुकानाचे स्वरूप दिले आहे. अडाणी पेशंटस्ना यातील काहीच कळत नसल्यामुळे ते बिचारे खिशातल्या पैशांकडे बघून इंजेक्शनची मागणी करतात. गरजू आणि अडाणी रुग्णांची लूट करण्याचा त्यांचा हा मार्ग बघून त्यांच्या या लोभी वृत्तीची खरी चीड येते. या डॉक्टरची रोजची कमाई १०० ते १५० रु. आहे. लुटीचे प्रमाण यावरून लक्षात येईल.

स्वतःच्या स्वार्थासाठी डॉक्टरकीच्या व्यवसायाची बदनामी डॉक्टर म्हणवणाऱ्या माणसाने किती करावी, यालाही काही मर्यादा आहे. आधुनिक विज्ञानाच्या पायावर उभ्या असलेल्या वैद्यकीय शास्त्राने आज बरीच मजल गाठली आहे. माणसामधल्या अंधश्रद्धा, देवभोळेपणा, रोग बरा करण्यासाठी अमानवी (मांत्रिक वगैरे) उपायांवर अवलंबून राहण्याची प्रवृत्ती यांवर बरीच मात केली आहे. असाध्य वाटणारे रोग आज मानवाच्या बरेच आटोक्यात आले आहेत. पण आधुनिक विज्ञानाच्या कमाईवर पद्धतशीरपणे पाणी ओतण्याचे काम एक आर. एम्. पी. डॉक्टर करीत आहे, हे तुम्हाला सांगितले तर आश्चर्य वाटल्यावाचून राहणार नाही.

आजही खेड्यापाड्यांतून भुताखेतांवर विश्वास फार आहे. देवाच्या कोपामुळे रोग होतात, ही समजूत फार मोठ्या प्रमाणावर मूळ धरून आहे. माणूस आजारी पडला की, बऱ्याच वेळेला तो मांत्रिकाच्या सांगण्यावरून देवाचा कोप शांत करण्याचा प्रयत्न करतो. ते केल्यानंतरही आजार बरा होत नाही असे दिसल्यानंतर तो डॉक्टरकडे धाव घेतो. अशा वेळेस लोकांच्या मनातील अंधश्रद्धा काढून टाकून योग्य औषधोपचारांचे महत्त्व त्यांना पटवून देणे आणि अधिक विनाशापासून वाचवणे हे डॉक्टरचे काम आहे. बऱ्याच वेळेला पेशंट प्रथम डॉक्टरकडे येतो आणि डॉक्टरच्या औषधांमुळे बरे वाटत नाही, असे दिसल्यावर मांत्रिकाकडे वळतो. दोन्ही ठिकाणी त्याला मांत्रिकाच्या तडाख्यातून वाचवणे हे आधुनिक विज्ञानावर विश्वास ठेवणाऱ्या डॉक्टरचे काम आहे.

तर एक आर. एम. पी. डॉक्टर डॉक्टरकीबरोबर चक्क मांत्रिकाचेही काम करतो. काही आजार भुताखेताची बाधा झाल्यामुळे होतात, अशी लोकांची भावना असते. तिचा हा बरोबर फायदा उठवतो. हा एका जागी दवाखाना घालून बसत नाही. तर आपली बॅग घेऊन गावोगाव फिरतो. एका गावी दिवसभर मुक्काम. एखाद्या गावात गेल्यावर तो त्याच्या ठरलेल्या ठिकाणी उतरतो. डॉक्टर गावात आला आहे, अशी बातमी थोड्याच वेळात गावभर होते. हा फिरतो ती गावे डोंगराळ मुलखातील असल्यामुळे अतिशय छोटी छोटी असतात. साधारण ४००–५०० वस्ती असलेल्या गावात डॉक्टर आल्याची बातमी झट्दिशी पसरते. मग एकेक पेशंट डॉक्टरकडे येऊ लागतो. त्यातल्या बऱ्याच जणांना तो औषध, इंजेक्शन्स् देतो. डॉक्टरला बाहेरचे पण कळते (बाहेरचे म्हणजे भूतबाधेचे) अशी ख्याती सगळीकडे पसरलेली असल्यामुळे अनेक डॉक्टरांचे औषध घेऊन कंटाळलेली जुनाट रोगाची माणसे आणि काही मानसिक रुग्ण बाहेरच्या उपचारांसाठी येतात.

बहुधा पेशंटचे नातेवाईकच डॉक्टरला सांगतात की, 'अनेक डॉक्टरांचे औषध घेतले, पण गुण काही आला नाही. तेव्हा जरा काही बाहेरचे असले तर बघा.' अर्थात डॉक्टरसाहेब याचीच वाट बघत असतात. (नाही तरी रोगाचे निदान वगैरे समजतंय कुणाच्या लेकाला) आता डॉक्टरसाहेब उत्साहाने कामाला लागतात. गुलाल, बुक्का, उदबत्त्या, सुपाऱ्या, लिंबे, निरनिराळ्या मण्यांच्या माळा डॉक्टरांच्या बॅगेतून बाहेर पडतात. निरनिराळे हातवारे करून गंभीर चेहऱ्याने डॉक्टर काही तरी पुटपुटत असतात. अशा वेळी त्यांचा बिचारा स्टेथॅस्कोप बॅगेत कुठे तरी कोपऱ्यात जाऊन पडलेला असतो. त्यांचे भाविक पेशंट काळजीयुक्त नजरेने डॉक्टरांच्या त्या अवताराकडे बघत असतात. उदबत्ती पेटवली जाते. कापलेल्या लिंबाने पेशंटला ओवाळले जाते आणि मग थोड्या वेळाने रोगाचे निदान सांगितले जाते. रोगनिदान–कुठल्या तरी देवाचा कोप. उपाय–एक कोंबडी, नारळ, सुपाऱ्या, सव्वा रुपयापासून एकवीस रुपयांपर्यंत (अर्थात पेशंटच्या सांपत्तिक स्थितीचा अंदाज घेऊन) दक्षिणा, चारमिनारचे पाकीट आणि कधी कधी बाटली. (हे अर्थात डॉक्टरसाहेबांच्या त्या दिवशीच्या मूडवर अवलंबून असते) मग हे सेशन संपल्यानंतर दुसरे खास सेशन सुरू होते. अर्थात या सेशनला गावा-

तल्या टोळभैरवांची उपस्थिती आवश्यक असते. तर असे हे डॉक्टर! यांना कोणत्या तोंडाने डॉक्टर म्हणायचे ते ठरविले पाहिजे.

आणखी एकच उदाहरण देऊन ह्या भोंदू डॉक्टरांच्या सुरस व चमत्कारिक कथा संपवतो. एका खेडुताला एक कुत्रे चावले. तो सरकारी दवाखान्यात गेला. तेथे डॉक्टरने पुण्याच्या ससून हॉस्पिटलमध्ये जाऊन तीन इंजेक्शन्स घ्यायला सांगितली. पुणे तेथून ३० मैल दूर. त्यामुळे तो पुण्याला न जाता त्याच गावातल्या दुसऱ्या एका डॉक्टरकडे गेला. कुत्रे चावल्यानंतर घ्यावयाची इंजेक्शन्स् (Anti Rabies Vaccine) सहसा डॉक्टर आपल्याकडे ठेवत नाहीत. कारण ती ठेवण्यासाठी रेफ्रिजिरेटरची आवश्यकता असते. मोठ्या हॉस्पिटलमध्ये ती उपलब्ध असतात. सदर डॉक्टरकडे रेफ्रिजिरेटर नाही. त्यामुळे ती इंजेक्शन्स् असण्याचा प्रश्नच उपस्थित होत नव्हता. तरीही तो डॉक्टर त्या पेशंटला म्हणाला, ' अरे कशाला जातोस ससूनला एवढ्या लांब. मी देतो तुला इंजेक्शन्स्.' आणि त्या डॉक्टरने त्याला तीन कुठली तरी इंजेक्शन्स् दिली. भरपूर पैसे उकळले. पुढे त्या पेशंटला कुत्रे चावण्यामुळे होणारा 'हायड्रोफोबिया' हा रोग झाला. त्यानंतर त्याला ससून हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. परंतु पेशंट लवकरच दगावला. असा हा उलट्या काळजाचा डॉक्टर. तरीही त्याचा दवाखाना व्यवस्थित चालू आहे. मृताचे नातेवाईक फक्त नशिबाचा खेळ म्हणून स्वस्थ बसले.

तर अशी ही खेड्यातील परिस्थिती. भोंदू डॉक्टरांना पैसे मिळविण्यासाठी वेगवेळ्या युक्त्या कराव्या लागतात. क्वालिफाईड डॉक्टर्सच्या युक्त्या वेगळ्या असतात. एकंदरीत काय पेशंटला फसविणे आणि या ना त्या कारणाने त्यांच्याकडून पैसे उकळणे हा इतर सर्व धंद्यांप्रमाणे वैद्यकीय व्यवसायाचा एक अविभाज्य भाग बनला आहे. मोठा डॉक्टर मोठ्या प्रमाणात फसवतो. छोटा डॉक्टर छोट्या प्रमाणात. पूर्वी डॉ. अनिल अवचट यांनी याविषयी एक लेख (डॉक्टर जगवतात की नागवतात ?) लिहून बरेचसे सत्यकथन केले होते, तेव्हा केवढा गदरोळ उठला होता. डॉ. अवचटांचे रजिस्ट्रेशन काढून घेण्यापर्यंत मजल गेली होती. म्हणजे ही फसवणूक करणे हे डॉक्टर मंडळींच्या इतके पचनी पडले आहे की, आपल्या हातून काहीतरी अप्रामाणिकपणा होतोच ही जाणीवसुद्धा नष्ट झालीय. अप्रामाणिकपणा हाच एक रूढ मार्ग होऊन बसला आहे. जे खेड्यात तेच शहरात. फक्त फरक एवढाच की, शहरातील सर्व प्रकार जरा पॉलिश्ड असतात.

सर्वसामान्य माणसाला रोग पूर्ण बरा होईपर्यंत खाजगी डॉक्टरकडून औषध घेणे परवडत नाही. सुरुवातीचे औषध घेऊन आजार थोडाफार आटोक्यात आल्यावर पैशाभावी पेशंट औषध बंद करतात. मग काहीवेळेला आजार जुनाट (क्रॉनिक) अवस्थेत प्रवेश करतो. मग पुन्हा आजार बळावतो तेव्हा पुन्हा औषध. हे असे पेशंटच्या मृत्यूपर्यंत चालू राहते. या दुष्टचक्रामध्ये पेशंटचे पैसेही अधिक जातात व शरीराची हानिही अधिक प्रमाणात होते. खाजगी व्यवसायात लोकशिक्षण प्रतिबंधक उपाय वगैरे काहीच बसत नसल्यामुळे फक्त रोग झाल्यानंतरच डॉक्टरचा व पेशंटचा संबंध येतो. शिवाय या गोष्टी अशा आहेत की, एकेकट्या डॉक्टरला त्या शक्य नाहीत. त्याला सामाजिक संस्था, डॉक्टर, सरकार या सर्वांचेच सहकार्य आवश्यक आहे. परंतु आपल्याकडे या सर्वांचाच आनंद आहे.

इतरांप्रमाणेच आपल्या देशातील डॉक्टर मंडळींनाही सामाजिक जाणीव एकंदरीत कमीच. तसे त्यांच्यातील बरेचजण कुठेना कुठे समाजसेवेच्या पाट्या टाकीत असतात. ऑनररी ही विभूती मागे लावून त्यायोगेसुद्धा आपला खाजगी व्यवसाय अधिक कसा तेजीत येईल याच खटपटीत ते असतात. कधी दुष्काळ, साथीचा रोग, महापूर अशासारख्या नैसर्गिक आपत्तीत आपली हजेरी लावून येतात. पण या सगळ्यांत एक विलक्षण अलिप्तपणा आणि समाजावर उपकार केल्याची एक भावना असते.

खाजगी व्यवसाय हे अशा रीतीने एक दुष्टचक्र बनले आहे. सरकारची याबाबत काही जबाबदारी आहे अशी जाणीव सत्तास्पर्धेत गुंतलेल्या आमच्या राज्यकर्त्यांना दुर्दैवाने अजूनही झालेली नाही. लोकांमधला असंतोष शमविण्यासाठी दोनचार योजना त्यांच्या तोंडावर फेकायच्या पण मूलभूत सुधारणा मात्र बिलकूल करायच्या नाहीत. हे सरकारी धोरण आहे. किंबहुना तशी जाणीवच सरकारच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांमध्ये दिसत नाही. खेड्यातील कोट्यवधि जनता आज आरोग्याच्या साध्या प्राथमिक सोयीवाचून तळमळत आहे. कागदावरच्या सर्व योजना व्यवस्थित राबवल्या तरीसुद्धा त्या खूपच अपुऱ्या पडतील अशी अवस्था आहे. आणि राबवल्या गेलेल्या योजनांची परिस्थिती तर फारच शोचनीय आहे. कित्येक सरकारी दवाखान्यांमध्ये आज कापूस व बँडेजसुद्धा नाही. आरोग्य सेवांमध्ये कुटुंब-नियोजन हा सरकारचा एकमेव कार्यक्रम होऊन बसला आहे. आरोग्य योजनांमधील सर्व स्टाफ त्या कामाला जुंपला आहे.

अर्थात् खाजगी व्यवसायाच्या या दुष्टचक्राबाबत मी सर्वस्वी दोष डॉक्टरांना देत नाही. आजच्या सामाजिक परिस्थितीचा तो एक अपरिहार्य परिपाक आहे. ती एक सार्वत्रिक प्रवृत्ती होऊन बसली आहे. त्यामुळे कमी पैशात पेशंटला बरे करण्याचा विचार डॉक्टर सहसा करीत नाही. अधिकाधिक पैसे मिळवणे आणि पैशाच्या प्रभुत्वासाठी चाललेल्या जीवघेण्या स्पर्धेत टिकून राहणे हे आजचे प्रत्येकाचे ध्येय आहे. जी तक्रार डॉक्टरांबाबत आहे तीच वकील, इंजिनिअर, व्यापारी, शिक्षक या सर्वांच्या बाबतीत आहे. अशा परिस्थितीत नवीन जाणीवा निर्माण करून ही समाजव्यवस्था बदलणाऱ्यांच्या पुढे एक मोठे आव्हान उभे राहिले आहे. या आव्हानाला सामोरे जाणाऱ्यांना यथाशक्ती मदत करण्याची जाणीव जरी प्रत्येकाने ठेवली तरी खूपसे काम होईल.

शेवटी आपण या निर्णयाप्रत येतो की, आरोग्याच्या बाबतीत खाजगी व्यवसायाद्वारे पूर्ण रोगनिर्मूलन अशक्य आहे. त्यामुळे संपूर्ण आरोग्यव्यवस्था सरकारनेच ताब्यात घेऊन खाजगी वैद्यकीय व्यवसाय पूर्णपणे बंद केला पाहिजे. आजही आपल्या देशात अनेक रुग्णालये, दवाखाने सरकारी आहेतच. वैद्यकीय महाविद्यालये बहुतेक सरकारीच आहेत आणि त्यांचा कारभार बराचसा चांगला चालला आहे. अनेक खाजगी व्यवसाय करणारे डॉक्टरसुद्धा सरकारी योजनांवर (इ. एस्. आय. एस्., केंद्र सरकार, आयुर्विमा) अवलंबून असतात. म्हणजे खाजगी व्यवसाय हा सुद्धा पूर्णपणे खाजगी नाहीच. परंतु सरकारी कामाबरोबर खाजगी व्यवसाय हाही चालू असल्यामुळे सरकारी कामाला खाजगी कामाशी जुंपले जाते. खाजगी व्यवसाय कसा वाढेल, याचीच फक्त काळजी डॉक्टर करतो. सरकारी कामाच्या साहाय्याने. कधीकधी सरकारी कामाकडे दुर्लक्ष करून आपला खाजगी व्यवसाय वाढविण्यात तो सतत मग्न असतो.

यासाठी खाजगी व्यवसाय पूर्णपणे बंद केला पाहिजे. इंग्लंडसारख्या समाजवादी नसलेल्या देशात सुद्धा वैद्यकीय व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण झालेले आहे. इतर बाबतीत इंग्लंडचा आदर्श आपल्या डोळ्यासमोर ठेवण्यात भूषण मानणाऱ्या आपल्याकडील आंग्लविद्याभूषित बुद्धिमंतांनी या गोष्टीकडे मात्र सोयीस्करपणे दुर्लक्ष केले आहे. इंडियन मेडिकल असोशिएशननेसुद्धा वैद्यकीय व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण करावे असा एक ठराव कागदोपत्री करण्यापलीकडे या विषयात अजून रस घेतलेला नाही. सरकारने तर अजून विचार करण्याचे मनावरच घेतले नाही.

शहरात आरोग्यव्यवस्था करणे त्यामानाने सोपे आहे. परंतु खेड्यातील काम बरेच अवघड आहे. प्रत्येक गावापर्यंत (अगदी डोंगराळ मुलाखातील सुद्धा) आरोग्यव्यवस्था पोचवणे, हे महत्त्वाचे आहे. कोणालाही पैशाअभावी औषध मिळाले नाही आणि औषधाअभावी मृत्यू आला, ही गोष्ट या देशात घडता कामा नये, ही सरकारने आपली जबाबदारी मानली पाहिजे.

हा अत्यंत अवघड प्रश्न चीनने फार यशस्वीरीत्या सोडवला आहे. त्यांच्या अनवाणी डॉक्टर (Bare foot Doctor) या योजनेची प्रशंसा सर्व जगाने आणि विशेषतः आपल्या येथील कित्येक मंत्र्यांनी देखील केली आहे. चीनमधील कुटुंबनियोजन कार्याची सुद्धा जागतिक लोकसंख्याविषयक परिषदेने खूपच स्तुती केली होती. चीनमधील आरोग्य-योजना अभ्यासणे आपल्याला निश्चितपणे लाभदायक ठरेल. कारण चीनही आपल्यासारखा मागासलेला, खंडप्राय विस्ताराचा आणि भरपूर लोकसंख्या असलेला देश आहे.

तेथील अनवाणी डॉक्टर्स समाजाच्या सर्व थरांतून आलेले आईत. शेतमजूर, कामगार, शिक्षक वगैरेसारख्या थरांतून त्यांची निवड केली जाते. शालेय शिक्षण त्यांनी संपादन केलेले असते. अशा लोकांना वैद्यकीय शास्त्राबाबत अल्पमुदतीचे खास शिक्षण दिले जाते. त्यामध्ये प्रथमोपचार, रोगांचे प्राथमिक निदान आणि त्यावरील उपचार, रोगप्रतिबंधक उपाय, कुटुंबनियोजन, अक्युपंक्चर वगैरे विषयांचा त्यांच्या शिक्षणात अंतर्भाव असतो. प्रशिक्षित डॉक्टर (कॉलेजमध्ये पदवी घेतलेला) आणि खेडोपाड्यांतील सर्वसामान्य जनता यांमधील एक दुवा म्हणून ते काम करतात. प्रत्येक खेड्यात असा एक अनवाणी डॉक्टर असतो. यामध्ये अनेक महिला पण आहेत. हे डॉक्टर्स प्रत्यक्ष उत्पादनाच्या कामातसुद्धा सहभागी असतात. शारीरिक श्रम आणि मानसिक श्रम यांची पूर्णपणे फारकत अशा रीतीने टाळलेली आहे.

काही खेड्यांचा समूह मिळून एखादे आरोग्य केंद्र असते. तेथे प्रशिक्षित डॉक्टर असतो. त्या ठिकाणी बाळंतपणासकट अनेक सोयी असतात. छोटेसे कॉटेज हॉस्पिटलही असते. अशा काही केंद्रांच्यावर एक मोठे केंद्र. त्या ठिकाणी तज्ज्ञ डॉक्टर, ऑपरेशन थिएटर, एक्स-रे वगैरे अद्ययावत सोयी. अशी एक खालपासून वरपर्यंत आरोग्यसेवेची तेथे तयार झाली आहे. खाजगी व्यवसाय पूर्णपणे बंद असूनही अतिशय कार्यक्षमतेने ही योजना कार्यान्वित होत आहे. (तिच्या कार्यक्षमतेचा निर्वाळा हा माझा नसून जागतिक तज्ज्ञांचा आहे.)

खेड्यातील पेशंट प्रथम अनवाणी डॉक्टर बघतो. आजार मामुली असेल तर तो स्वतः औषध देतो. आजार त्याला न समजणारा असेल किंवा प्रशिक्षित डॉक्टरकडून उपचार करण्याची जरूरी असेल तर, त्याला आरोग्य केंद्रात पाठवले जाते. तेथून पुढे त्याला जरूर असतील ते सर्व उपचार उपलब्ध होऊ शकतात. चीनने आधुनिक वैद्यकशास्त्राबरोबरच त्यांची प्राचीन औषधपद्धती आणि अक्युपंक्चरचे तंत्र यांचाही विकास घडवून आणला आहे. त्यांचाही वापर ते करतात.

हा अनवाणी डॉक्टर प्रशिक्षित डॉक्टरांच्या मदतीने लोकशिक्षणाचे कार्यही करतो. केवळ रोग झाल्यानंतर उपचार करायचे ही पद्धत सोडून देऊन रोगप्रतिबंधक उपाय योजणे यावरही भर दिला जातो. निरनिराळ्या रोगांविषयी आणि कुटुंब नियोजनाबाबत सर्व प्रकारची शास्त्रीय माहिती लोकांना दिली जाते. शस्त्रक्रिया (आणि तीही सक्तीने) हा कुटुंब नियोजनाच्या बाबतीतला एकमेव उपाय आहे असे तेथे समजले जात नाही. त्याशिवाय संततिप्रतिबंधक गोळ्या आणि इतर साधने वापरण्याबाबत जनतेला प्रवृत्त केले जाते. आज चीनच्या खेड्यापाड्यात लाखो स्त्रिया संततिप्रतिबंधक गोळ्यांचा वापर या अनवाणी डॉक्टरांच्या देखरेखीखाली करीत आहेत. या अनवाणी डॉक्टरांच्या कामावर लोकांच्या निरनिराळ्या संघटनांची सक्त नजर असते. त्यामुळे कामचुकारपणाला वाव नाही. जागृत लोकमत, प्रभावी लोकशिक्षण, उपलब्ध असलेल्या सर्व साधनांचा उपयोग, ग्रामीण लोकशक्ती या सर्वांचा योग्य तो उपयोग करून खाजगी व्यवसायाचा पूर्ण अभाव असतानासुद्धा चीनने आपला आरोग्याचा प्रश्न यशस्वीरीत्या सोडवला आहे.

चीनच्या या प्रयोगातून आपल्याला बरेच शिकण्यासारखे आहे केवळ अंधानुकरण करायचे म्हणून नव्हे तर, प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने अशा प्रकारची योजना आपण आखणे जरूर आहे. आपल्याकडे यापूर्वीच व्हॅक्सिनेटर (प्रतिबंधक लस टोचणारा), मलेरिया टेक्नीशियन, लेप्रसी (महारोग) टेक्नीशियन वगैरेसाठी वेगवेगळे लोक सरकारने नेमलेले आहेतच. त्याऐवजी एकाच माणसाला हे सगळे शिक्षण + रोगासंबंधी प्राथमिक ज्ञान + कुटुंबनियोजन वगैरेसंबंधी ज्ञान देणारे शिक्षणक्रम तयार करावेत. या शिक्षणक्रमासाठी शक्यतो खेड्यातल्या युवकयुवतींचीच निवड करावी. उमेदवाराची सामाजिक जाणीव प्रथम तपासून बघावी. नेहमीप्रमाणे फक्त वशिला ही गुणवत्ता मानू नये. त्याचप्रमाणे आरोग्य केंद्रात काम करणाऱ्या डॉक्टरांनाही सामाजिक जाणीव देण्याचा प्रयत्न करावा. मुख्य म्हणजे त्यांच्यातील नोकरशाही प्रवृत्ती नष्ट करण्यासाठी त्यांच्यावर जनमताचा प्रभाव टाकणाऱ्या लोकांच्या संघटना कार्यान्वित कराव्यात. लोकशिक्षणाद्वारे लोकांमध्ये वैद्यकीय शास्त्राबाबत असलेले गैरसमज दूर करून अंधश्रद्धा व देवभोळेपणा नष्ट करावा.

आर. एम. पी. डॉक्टर हे संस्थान नष्ट करावे. सर्वांना खास शिक्षण देऊन अनवाणी डॉक्टर किंवा प्रशिक्षित डॉक्टरच्या कामात मदत करणारे दुय्यम (असिस्टंट) डॉक्टर बनवावे. म्हणजे या क्षेत्रातील सर्व गैरव्यवहार नष्ट होण्यास फार मोठी मदत होईल. वैद्यकीय क्षेत्रातील बजबजपुरी नष्ट करण्यासाठी सरकार, डॉक्टर्स आणि सामाजिक कार्यकर्ते यांनी पुढाकार घेण्याची वेळ आली आहे. नाहीतर या देशातील गरीब आणि अडाणी जनता अशीच वर्षानुवर्षे फसवली आणि नागवली जाईल. ही जनता जोपर्यंत शांत आहे तोपर्यंत डॉक्टरांनी मनमानेल तसा धंदा करावा. खोऱ्याने पैसा ओढावा आणि समाजात प्रथितयश डॉक्टर म्हणून मिरवावे. □

## पुस्तके

# Scholar Extra-ordinary

**The Life of Professor the Rt. Hon. Hriedrich Max Muller P. C.**

By–Nirad C. Chaudhari Oxford University Press,
Pages 393, Rs. 85/—.

थोड्या दिवसांपूर्वी महाराष्ट्र टाईम्समध्ये 'काही नामांकित व्यक्तींनी' १९७६मध्ये वाचलेली पुस्तके, असे एक सदर आले होते. पु. ल. देशपांडे यांचा 'एक गाव एक पाणवठा' या बाबा आढावांच्या पुस्तकाबद्दलचा लेख आवडला. आणखी एक लेख आवडला तो श्री. यशवंतराव चव्हाणांचा. श्री. चव्हाणांच्या लेखातली दोन-तीन पुस्तकांची नांवे आठवतात. एक श्री. चौधरींचे वरील पुस्तक होते व दुसरे Body-gaurd of Lies हे ९०० पानी पुस्तक होते. आणखी एक बेस्टसेलर 'Roots' (हेलीचे) होते. ती एका निग्रोची कहाणी आहे. श्री. चव्हाण हे एकाच वेळेला वेगवेगळ्या विषयांवर ३–४ पुस्तके वाचतात असे त्यांनी लिहिले होते. त्यांनी महाराष्ट्र टाईम्समध्ये लिहिलेल्या लेखाच्या आधीही श्री. चव्हाण हे एक बहुश्रुत आहेत असे ऐकले होते. वास्तविक राजकारण म्हणजे एक धकाधकीचे आयुष्य. एवढ्या भरगच्च कार्यक्रमात ते पुस्तकासाठी वेळ काढतात, हे खरोखरच कौतुकास्पद आहे.

वास्तविक पाहता महाराष्ट्र टाईम्समधले हे सदर थोडे लेख सोडले तर, फारच मिळमिळीत वाटले. कितीतरी लोकांनी त्याहीपेक्षा कितीतरी चांगली पुस्तके १९७६ मध्ये वाचली असतील.

श्री. निराद चौधरी हे Indian असूनही anti-Indian आहेत हे त्यांचे वैशिष्ट्य त्यांनी जे आत्मचरित्र लिहिले ते त्यांनी ब्रिटिश राज्याला अशा शब्दांत अर्पण केले, 'To the memory of the British Empire in India......All that was good and living within us was made, shaped and quickened by the same British Rule!' या अर्पणापायी श्री. चौधरींची AIR मधील नोकरी सुटली व काही इतर नियतकालिकांनीसुद्धा त्यांचे लिखाण घेण्याबद्दल नकार दिला. कारण त्यांचे लिखाण छापले असते तर त्यांना सरकारी जाहिराती मिळाल्या नसत्या.

एकदा श्री. टी. टी. कृष्णम्माचारींनी श्री. निराद चौधरी यांना पूर्व पाकिस्तानातून येणाऱ्या निर्वासितांवर पुस्तिका लिहिण्यास सांगितले व चौधरींना पाहिजे तेवढा मोबदला देण्यास ते तयार झाले. पण पैशाची चणचण असूनसुद्धा श्री. चौधरी यांनी ही सूचना धुडकावून लावली व म्हटले, 'भारतीय सरकारने माझ्यावरची बंदी उठवली असेल, परंतु मी भारतीय सरकारवरची बंदी उठवली नाही!'

श्री. चौधरी यांना साहित्य अॅकॅडमीचे रु. ५००० चे पारितोषिक मिळाले होते. ते त्यांनी पुढे स्वीकारले की नाही ते कळले नाही. (एकदा जी. ए. कुलकर्णींनीसुद्धा ५००० रु. चे साहित्य अॅकॅडमीचे पारितोषिक काही कारणांमुळे परत केले होते.)

श्री. निराद चौधरींना मॅक्समुल्लरचे चरित्र लिहायला ४ वर्षे लागली.

बऱ्याच लोकांची कल्पना अशी आहे की, मॅक्समुल्लर हा जर्मनीत जन्माला आला म्हणून तो जर्मन भाषेत पुस्तके लिहित होता. खरे म्हणजे तो इंग्लंडमध्येच राहत असे आणि बहुतांशी इंग्रजीमध्येच लिहीत असे.

मॅक्समुल्लरनी हितोपदेश, मेघदूत, उपनिषदे, धम्मपाडा, ऋग्वेद, संस्कृत व्याकरण, जर्मन क्लासिक्स, कँटचे भाषांतर, Indian–What Can It Teach Us? ह्या व इतर अनेक विषयांवर पुस्तके लिहिली आहेत.

मॅक्समुल्लरला श्रीमंत व ढोंगी समाजात मिसळायला आवडत नसे. चार्लस डिकन्सला लोक Vulgar म्हणत असत, त्यावर मुल्लर म्हणाले, 'त्यालाही ढोंगी, श्रीमंत समाज आवडत नसे. Vulgar जर कोणी असेल तर तो डिकन्स नाही पण हा पॉलिश्ड समाज.'

मॅक्समुल्लरची पहिली मुलगी १८७६ मध्ये व दुसरी १८८६ मध्ये गेली. या दिवंगत मुलींविषयी त्याने आपले विचार ४८६ पानांच्या डायरीत लिहून ठेवले होते. त्याचा हा ग्रंथ वाचला की, आपले हृदय शतशः

☆ ☆

दुसऱ्या आवृत्तीच्या वाटेवर असलेली

राजहंस प्रकाशने

□ सांगत्ये ऐका
हंसा वाडकर
(तिसरी आवृत्ती)

□ टॉलस्टॉय एक माणूस
सुमती देवस्थळे

□ श्रीग्रामायन
श्री. ग. माजगावकर

□ शतपावली
रवींद्र पिंगे

□ पुरंदऱ्यांची दौलत

□ पुरंदऱ्यांची नौबत
ब. मो. पुरंदरे

☆ ☆

विदीर्ण होते.

मॅक्समुल्लर त्याच्या मुलाला नेहमी म्हणत असे, 'कोणत्याही कामात किंवा कोणत्याही व्यक्तीबद्दल उत्कट भावना (Passion) ठेवा. Passion हेच खरे जीवनाचे मर्म आहे.'

श्री. चौधरी यांना 'हिंदू', 'भारतीय संस्कृती', 'भारतीय नारी' असे शब्द ऐकू आले तर ते एकदम बिथरतात! या मॅक्समुल्लरच्या चरित्रातसुद्धा त्यांनी 'Hindu Wife' उकरून काढली आहे! त्यांचे पान नं. २६९ वरील वाक्य बघा— ...in the manner of the normal Hindu wife who believes that in married life money or gold, Silk and Fine Cotton ard the outward signs of an inward grace.'

एकदा का त्यांचे Hinduism, Hindu culture वरील गदारोळ सुरू झाले की, ते काय काय सांगतील त्याचा नेम नाही. भारतीय संस्कृतीविषयी त्यांचा एवढा intense prejudice पाहिला की, त्यामागे नक्कीच काही वैयक्तिक कारणे असतील असे वाटते. त्यांनी एकदा स्वतःला psychoanalyse जरूर करून बघावे.

मॅक्समुल्लरनां भारताविषयी जेवढा जिव्हाळा वाटे तेवढाच तिरस्कार श्री. चौधरी यांना भारताविषयी आहे! हा एक विरोधाभासच म्हणावा लागेल.

माणूस हा ऐहिक सुखाच्या मागे लागून सुखी होत नसतो. फ्रॉईडला एकदा 'कोणत्या गोष्टी माणसाला सुख देतात?' असा कुणी तरी प्रश्न विचारला असता, त्याने लगेच उत्तर दिले, 'काम आणि प्रेम.' (म्हणजे प्रेमाचे काम नव्हे पण "Love and work"!) मॅक्समुल्लरसुद्धा एक वेळ इतके सुखी होते की, ते उद्गारले, 'या घटकेला मी इतका सुखी आणि समाधानी आहे की, मला अगदी हालचाल न करता स्वस्थ बसून राहावेसे वाटते. जर मी थोडासा जरी हलला तरी मला भीती वाटते की, काहीतरी हलून खाली पडेल.' ("I should like to sit quiet, to rest and be thankful, not to move lest something should move and fall.")

ऋग्वेदावर पुस्तकं लिहायला मॅक्समुल्लरना ५ वर्षे अव्याहत खपावे लागले. जेव्हा जेव्हा अवधी मिळे तेव्हा तेव्हा ते, वेदांचा प्रचार करीत असत व ते नेहमी सांगत असत- की, 'वेदांमध्येच खरा हिंदुधर्म सापडेल.'

श्री. निराद चौधरी हे उत्कृष्ट इंग्रजी लिहितात. या पुस्तकातही त्यांच्या भाषाशैलीवर कुठे बोट ठेवता येणार नाही. पण मॅक्समुल्लरच्याच शब्दात सांगायचे झाले तर, श्री. चौधरीच्या लिखाणात कुठे Passion सापडत नाही. पुस्तकांबद्दल एकदा एक वाक्य वाचले होते ते मला बऱ्याच वेळा आठवते.

मला वाटते ते गोल्डस्मिथने "व्हीकर ऑफ वेकफिल्ड'च्या प्रस्तावनेत लिहिले हे ते वाक्य असे आहे,' '[A book may be amusing with numerous errors, or it may be very dull without a single absurdity.' आणि निराद चौधरींचे हे पुस्तक निश्चितच perfect but dull या सदरात मोडण्यासारखे आहे.

— जे. एन्. पोंडा
फिनिक्स लायब्ररी


**नवीन दाखल झालेली काही पुस्तके**

| | | |
|---|---|---|
| 1. | **The Great Railway Bazaar** – ( Bestseller Travel By Train through Asia )—Paul Theroux. | Rs. 18·90 |
| 2. | **The Secret Power of Pyramids**–( How Microwaves affect contents in a Pyramids )–Bill Schul and Pettit Ed. | Rs. 12·80 |
| 3. | **Scholar Extraordinary : The life of Professor the Rt. Hon. Hriedrich Max Muller P. C.** – ( Biography )– Nirad C. Chaudhari. | Rs. 85/— |
| 4. | **Valley of Associations** – ( Bestseller – Thriller ) – Jan Mac Alister | Rs. 9·60 |
| 5. | **The Dreadful Lemon Sky** – ( Bestseller – Thriller ) – John D. Mac Donald. | Rs. 14·55 |
| १. | **माझ्या जीवनाची सरगम**–( आत्मचरित्र )–सी. रामचंद्र | रु. १८·५० |
| २. | **अरेबियन नाईटस्**–भाग ४ था–अनुवाद : गौरी देशपांडे | रु. ५०/– |
| ३. | **फ्रीडम ॲट मिडनाईट**–लॅरी कॉलिन्स, डॉमिनिक लापिए | रु. २५/– |
| ४. | **देव देते पण कर्म नेते**–( आत्मचरित्र )–शंकरराव देव | रु. २५/– |

- पुस्तकांना सहज प्लॅस्टिक कव्हर घालता येईल असे उत्कृष्ट प्लॅस्टिक व डिंक पुरवितो.
- आपणास पाहिजे असलेली पुस्तके आम्ही परगावीही पुरवू. ( V. P. नाही. )
- नॉन मेंबर्सना डेली बेसिसवर पुस्तके वाचावयास मिळतील.

**दि फिनिक्स लायब्ररी**
७२७ सदाशिव पेठ, पोस्टासमोर, पुणे ३०.

# बदमाष काळ : पृष्ठ १२ वरून

काढत होता. फोनवर बोलत असतानाच त्यानं मला खुणावलं. करारावर पेननं सही कर असं हावभाव करून सांगितलं व तो परत फोनवर बोलण्यात गढला. शेवटी त्याचं फोनवरचं बोलणं संपलं तेव्हा मी विचारलं, 'हॅरी, करार ठीक आहे, पण एक नवीनच कलम त्यात कसलं घुसडलीय ?" त्यानं हॉलिवूडमधील स्टुडिओ मालकांच्या बैठकीत काय ठरलं ते मला सांगितलं. आपल्या राजकीय दृष्टिकोनाचा स्टुडिओला त्रास होता कामा नये–म्हणजेच स्टुडिओ सोंगेल त्याबाहेर राजकीय दृष्टिकोन असता कामा नये अशा प्रकारची अट प्रत्येकावर लादली जाणार होती. माझ्या करारातील नवं कलम त्यासंबंधीच होते. मी असल्या करारावर सही करायला नकार दिला.

नंतर नऊ–दहा वर्षांनी मला हॅरी विमानात भेटला. त्याच्याबरोबर ६–७ जण होते. त्याला चिकन सँडविचेस खूप आवडत. ४०–५० सँडविचेस त्यानं बरोबर आणले होते. त्यानं मला जेवायला बोलावलं. त्यानंतर परत मी त्याला भेटले नाही. तो कधी मरण पावला हे मला आठवत नाही, पण त्याच्या दफनविधीच्या वेळी झालेली गर्दी पाहून एकानं आश्चर्य व्यक्त केलं. तेव्हा जॉर्ज जॅसेल म्हणाला, "त्यात काय ? तुम्ही त्यांना काय पाहिजे ते दिलंत की तुमची थिएटर्स भरतात असं आपण म्हणतो ना, तीच गोष्ट या बाबतीत आहे !"

(हॉलिवूडमधील घबराटीचं वर्णन करताना विख्यात नट चार्ल्स लॉटन याचा एक प्रसंग हेलमननं दिला आहे. पूर्व जर्मनीनं त्याला तार करून ब्रेख्टच्या स्मृत्यर्थ होणाऱ्या प्रार्थनेला हजर राहायचं आमंत्रण दिलं तेव्हा लॉटननं स्वतः जे–एडगर हूव्हरना फोन केला. मला हे बोलावणं आलंय, पण त्यात माझा काही दोष नाही. तेव्हा माझ्याविरुद्ध याचा वापर केला जाऊ नये अशी विनंती त्यानं हूव्हरना केली.)

रौहनं मला २६ मार्च १९५२ ला एक पत्र पाठवलं. त्यात त्यानं म्हटलं होतं, 'आज सकाळी मी हाऊस कमिटी ऑन अन–अमेरिकन ॲक्टिव्हिटीजचे प्रमुख काऊन्सल टॅव्हेनर यांना भेटलो. कमिटीला काय हवं आहे हे विचारता ते म्हणाले, कु. हेलमन या कम्युनिस्ट पक्षाच्या सभासद आहेत असं शपथपूर्वक साक्षीदारांनी सांगितलं आहे व कमिटीला याची चौकशी करायची आहे. मी म्हटलं, हेलमन या कम्युनिस्ट पक्षाच्या सभासद होत्या की नाही हे मी सांगू शकत नाही. मात्र सर्व संघटनांतील आपल्या कार्याबद्दल हेलमन कमिटीला माहिती देतील, एवढं मी सांगू शकतो. हे ऐकताच त्यांना आनंद झाला. मग यात असलेला कायदेशीर पेचप्रसंग मी त्यांना सांगितला. हेलमननं स्वतःबद्दलच्या प्रश्नांना उत्तरे दिली तर इतरांबद्दलच्या प्रश्नांना उत्तरे द्यायला तिच्यावर सक्ती करता येईल, हे हेलमनला मान्य होणार नाही. यावर त्यांनी केवळ सहानुभूती दाखवली. टॅव्हेनरनं सांगितलं की, 'बड शुलबर्गनंही आधी कोणाचीही नावं सांगायला नकार दिला, पण नंतर त्याचं मन वळवण्यात आलं. हेलमनचंही असं मन वळवता येईल. खाजगी चर्चेत हेलमन माहिती देईल का असंही त्यानं विचारलं. याचा अर्थ कमिटीपुढील सुनावणीच्या आधी हेलमनशी बोलायची आपली इच्छा त्यानं सूचित केली. हेलमन ही तिच्या गटाशी असलेले संबंध जाहीर करायला तयार नाही. तिला दुसऱ्यांची नावे सांगावीच लागतील, असं मला शेवटी सांगण्यात आलं."

या बैठकीबद्दल जोनं मला कधी काही सांगितल्याचं स्मरत नाही. आमच्या दोघात खूप चांगले संबंध होते व आहेत. असं असलं तरी; माझ्या स्वभावातला काही भाग त्याला समजला नाही. मी स्वतःला काबूत ठेवते तेव्हा काहीशी विशिष्ट पद्धतीने वागते. त्यामुळे बुचकळ्यात पडणारा रौह काही पहिला इसम नव्हता. पण मी आधीच लिहिलंय त्याप्रमाणं कम्युनिस्टांनी पूर्वी माझ्यावर केलेल्या हल्ल्याचा माझ्या बचावासाठी मला वापर करायचा नव्हता. जे लोक अडचणीत आहेत त्यांच्यावर हल्ला करणं हे माझ्या नीतीत बसत नाही. ज्या बऱ्याचशा कम्युनिस्टांना मी भेटले त्यांपैकी बहुतेक हे जग अधिक चांगलं व्हावं म्हणून झटणारे होते. त्यांतले काही मूर्खही होते. पण याचा अर्थ ज्यांना आपलं करिअर वर्तमानपत्रांतील मोठमोठ्या मथळ्यांनी उंचावते असं वाटतं, अशा लोकांच्या हवाली त्यांना शासन मिळावं म्हणून देणं असा होत नाही.

एप्रिल १९५२ मध्ये प्लेझंटव्हिले येथील मी शेत विक्रीस काढलं. त्यामुळं मला एवढा धक्का बसला की, कमिटीपुढे साक्ष देण्याआधीचा तो काळ मला फारसा आठवत नाही. माझ्या डायरीत त्याविषयी फारशा नोंदीही नाहीत. एवढंच आठवतं की, मी कमिटीला जे पत्र पाठवायचं त्याचा मसुदा रौहनं मला पाठवला. मला तो फार आवडला नाही, कारण तो मी लिहिलाय्, असं वाटत नव्हतं. मग मी एक मसुदा लिहिला, तो रौहनं परत लिहिला. मी त्यावर परत संस्कार केले, त्यानंही फेरफार केले आणि अखेर अंतिम मसुदा तयार झाला तो असा–

१९ मे १९५२

सन्माननीय जॉन एस. वूड
अध्यक्ष
हाऊस कमिटी ऑन अन–अमेरिकन ॲक्टिव्हिटीज
रूम २२६, ओल्ड हाऊस ऑफिस बिल्डिंग,
वॉशिंग्टन २५ डी. सी.

प्रिय श्रीयुत वूड,

२१ मे १९५२ रोजी तुमच्या कमिटीपुढं मी हजर राहावं, असं माझ्यावर समन्स बजावण्यात आल्याचं तुम्हाला ठाऊक आहेच.

माझ्याविषयीच्या सर्व प्रश्नांना उत्तरे देण्यास मी तयार आहे. तुमच्या कमिटीपासून मला काही लपवायचं नाही आणि शरम वाटावी असं माझ्या आयुष्यात काहीही घडलेलं नाही. माझी राज-

कीय मते, संबंध याविषयीच्या कोठल्याही प्रश्नांना उत्तर न देण्याचा अधिकार घटनेतील पाचव्या दुरुस्तीने मला आहे, हे वकिलांनी माझ्या लक्षात आणून दिले आहे. परंतु हा अधिकार मी वापरू इच्छित नाही. सर्व प्रकारचे वैयक्तिक धोके पत्करून मी माझी मते, माझ्या हालचाली याबद्दल सरकारी अधिकाऱ्यांच्या सर्व प्रश्नांना उत्तरे द्यायला तयार आहे.

परंतु मी माझ्याबद्दलच्या प्रश्नांना जर उत्तरे दिली तर इतर व्यक्तींबद्दलच्या प्रश्नांनाही मी उत्तरे दिली पाहिजेत. तसं करायला मी नकार दिला तर बेअदबीचा माझ्यावर आरोप येईल, असे माझे वकील सांगतात. मी स्वतःबद्दलच्या प्रश्नांना उत्तरे दिली, याचा अर्थ पाचव्या घटनादुरुस्तीने दिलेला अधिकार बाजूला ठेवला. मग इतरांबद्दल प्रश्न विचारायला मला कायद्याने भाग पाडतील, असेही वकील म्हणाले. हे सामान्य माणसाला समजणं कठीण आहे. पण एक तत्त्व मला समजतं व ते म्हणजे माझ्याशी पूर्वी संबंधित असलेल्यांनी निष्पापपणे जे सांगितलं असेल त्याबद्दल त्यांना आता गोत्यात आणायचं, हे माझ्याकडून आता किंवा भविष्यात केव्हाही होणार नाही. कोठल्याही प्रकारची अप्रामाणिकता व विध्वंसक वृत्ती मला आवडत नाही. अशा वृत्तीचे कुठे दर्शन घडले तर, योग्य अधिकाऱ्यांच्या कानी त्या घालण्याचे मी माझे कर्तव्य समजते. पण केवळ स्वतःची कातडी बचावण्यासाठी अनेक वर्षांपूर्वी जे माझे निष्पाप सहकारी होते, त्यांना दुखावणे हे मी माणुसकीला काळिमा फासणारे, अशोभनीय मानते. चालू वर्षाच्या चौकटीत बसेल अशा रीतीनं मी माझ्या सदसद्विवेकबुद्धीत काटछाट करणार नाही.

मी जुन्या वळणाची अमेरिकन परंपरेत वाढलेली स्त्री आहे. सत्य बोलावं, खोट्या साक्षी देऊ नये, शेजाऱ्याला दुखवू नये, देशाशी एकनिष्ठ राहावे इत्यादी मूल्ये आम्ही शिकलो आहोत. या ध्येयांचा मी नेहमीच आदर केलेला आहे. तेव्हा ही अमेरिकन परंपरा मला तुम्ही मोडायला लावू नका. तुमच्यासमोर उभं राहून निवेदन करण्याची माझी इच्छा आहे.

इतर लोकांची नावे विचारणार नाही, ही अट मान्य केली तर, पाचव्या घटनादुरुस्तीतील अधिकार बाजूला सारून मी स्वतः-विषयीच्या प्रश्नांना उत्तरे देईन. परंतु याला जर तुमची तयारी नसेल तर, मग मात्र पाचव्या घटनादुरुस्तीचं संरक्षण मला मिळावं, असं साक्षीच्या वेळी सांगणं मला भाग पडेल.

या पत्राचं उत्तर दिलंत तर आभारी राहीन.

आपली विश्वासू,
लिलियन हेलमन.

माझ्या या १९ मे च्या पत्राला २० मे ला नकाराचं उत्तर आलं. मला जे करायचं नव्हतं ते मी आता करू शकत होते. पाचव्या घटना दुरुस्तीचा आधार मी घेणार होते. सांस्कृतिक प्रतिनिधी म्हणून रशियानं १९४४ साली मला आमंत्रण दिलं होतं. या रशियाभेटी-विषयी मला सर्वांत जास्त प्रश्न विचारले जातील अशी अपेक्षा होती. २१ मे १९५२ ला सकाळी ११ वाजता माझी सुनावणी व्हायची होती. आता एकच दिवस राहिला होता. मी टॅक्सीनं थोडी भटकले. ड्रेस, नवी महागडी हॅट खरेदी केली. हॉटेलवर पोचले तेव्हा टॅक्सी-ड्रायव्हरचा निरोप घेतला. उद्या सकाळी आठ वाजता त्याला यायला सांगितलं. त्याची पत्नी कॅन्सरनं आजारी होती म्हणून मी त्याला शंभर डॉलर्सचा चेक देऊन पत्नीसाठी काही भेटवस्तू आणायला सांगितलं. माझे कपडे, माझी हॅट, ही भेट ही आता जवळजवळ अखेरचीच चैन होती. हॉटेलच्या खोलीत न्यूयॉर्क टाईम्सचे दोन अंक पडले होते. क्लिफर्ड ओडेरसने आपल्या साक्षीत चक्क साक्षीदारांची नावं जाहीर करून टाकली होती. महिन्यापूर्वी एलिया कझाननं हेच केलं होतं आणि त्यानं एक न्यूयॉर्क टाईम्समध्ये जाहिरातही दिली होती. दबावाखाली माणसं कशी वागतील हे सांगता येत नाही. मी झोपायचा प्रयत्न केला, परंतु डोळ्याला डोळा लागला नाही. वाचायचा प्रयत्न केला. दोनदा गरम पाण्यानं स्नान केलं. दोनदा फोन वाजला तरी घेतला नाही. कारण हॅमेटचा फोन असणार. मी फोनवर काहीही भासवायचा प्रयत्न केला तरी तो तर्क, अनुमानं बांधणार. मी बराच वेळ विचार करत बसले. मग आत्मपरीक्षण पुरे असं मला वाटलं व डोकं थोडं शांत झालं.

सकाळी मी न्याहारी केली. टॅक्सी ड्रायव्हर आलाच होता. त्यानं मला जोच्या ऑफिसवर पोहोचवलं.

मी गेले तेव्हा रौहू फोनवर बोलत होता. त्यानं फोनवर हात ठेवून मला सांगितलं की, तो असिस्टंट ॲटर्नी जनरल थुर्मन अर्नोल्डशी बोलतोय. त्याचा नेहमीचा हसरा चेहरा गंभीर वाटत होता. मी दुसऱ्या खोलीत जाऊन पेपर वाचीत बसले. काही क्षणांनी रौहू आला. तो म्हणाला, 'अर्नोल्डनं मला फोन केला होता. आपण पाठवलेलं पत्र वाचून तो म्हणाला, मी हेलमनला सरळ तुरुंगात पाठवणार. सुनावणी सुरू होण्यापूर्वी आपलं मत बदललेलं आहे, हे आपण सांगितले पाहिजे, असं तो म्हणतो. त्याचे नेमके शब्द असे आहेत की, 'तू आणि फोर्टास या बाईला हुतात्मा करू पाहतात.'

मी उठले आणि हॉलमध्ये येरझाऱ्या घालू लागले. रौहूनं मला अस्वस्थ केलं होतं. मला राग आला होता. एवढा वेळ कोबूत ठेवलेलं मन उफाळून येणार असं वाटत होतं. हे सारं रौहूला सांगावं, असं वाटलं, पण मी त्यांच्या खोलीत शिरले तेव्हा तोच इतका त्रासलेला दिसला की, मी हे काही सांगितलं नाही.

मी त्याला म्हटलं, 'तू अर्नोल्डला फोन कर व त्याचे आभार मान. आता काही नवं, वेगळं मी काही करू शकणार नाही असं त्याला स्पष्टपणे सांग आणि तू माझी काळजी करायचं सोडून दे.'

रौहू त्याचा असिस्टंट डॅनियल पॉलिट व मी एका टॅक्सीनं निघालो. कसली शरम न वाटता निर्भयपणे तेथून बाहेर पडायचं इतकंच मी मनोमन ठरवलं. जोनं माझा खांदा थोपटीत सांगितलं, 'तुला फारच असह्य झालं तर मला सांग. मी कमिटीला सांगेन की, तुला टॉयलेटला जायचंय. एकदाच तुला ही संधी मिळेल. तेव्हा चेहरा नीट स्वच्छ कर. एखादी सिगरेट ओढ. तुला विश्रांतीची गरज वाटली नाही तर घड्याळावर नजर ठेव. साडेबाराच्या सुमाराला ते जेवणाची सुटी घेतात हे लक्षात ठेव. त्यामुळं एक–दीड तासाची तुलाही सुटी मिळेल. आणि हे बघ, तिथं विनोद करू नकोस !'

'विनोद करू नकोस ? मी कशाला करीन विनोद ?'

'प्रत्येकजण असा प्रयत्न करतो. कमिटीनं आपला अपमान केला असं वाटलं की, जो तो विनोद करायच्या फंदात पडतो. त्यामुळं

स्थिती अडचणीची होते. तेव्हा तू तसं करू नकोस.'

आम्ही पोचलो तेव्हा कमिटीचं दालन जवळजवळ रिकामं होतं. मागच्या बाजूला काही छोटया चेहऱ्याच्या प्रौढ स्त्रिया बसलेल्या होत्या. त्या तेथल्याच कायमच्या रहिवाशी असाव्यात असं वाटत होतं. एकमेकींशी त्या बोलत होत्या. कारकून येत होते नि जात होते. त्यांनी काही कागदपत्रे ठेवली नि ते गायब झाले. मी जोला म्हटलं, 'आपण फार आधी आलो नाही ?' त्यावर तो म्हणाला, 'नाही, तुला या दालनाची सवय व्हायला हवी.'

त्यावेळी एकही वार्ताहर आलेला नव्हता. कमिटीनं माझ्या सुनावणीचा बोलबाला केला नव्हता. जो म्हणाला, 'याचा अर्थ कमिटी आपल्याला घाबरते आहे. हे चांगलं की वाईट, हे मला ठाऊक नाही. पण आपल्याला इथं वार्ताहर हवे आहेत. आता त्यांना कळवायचं कसं ?'

परंतु त्याची गरज पडली नाही. अचानक भराभर वार्ताहर आत घुसले व त्यांच्यासाठी राखून ठेवलेल्या जागांवर जाऊन बसले, कमिटीचे सदस्य व्यासपीठावर येऊन बसले. वूड हातोडा आपटून शांतता प्रस्थापित करत होते. एक म्हातारी सारखी खोकत होती.

सुरुवातीचे प्रश्न नेहमीचे होते. माझं नाव काय, जन्म कुठे झाला, माझा व्यवसाय काय, माझ्या नाटकांची नावं काय असे प्रश्न विचारून झाले. मी हॉलिवूडमध्ये काम करत होते हे त्यांना जाणून घ्यायचं होतं. कुठल्या स्टुडिओत मी काम केलं, माझे संबंध कोणाकोणाशी होते, कोठल्या साली मी तेथे होते ? विशेषतः १९३७ सालाबद्दल परत परत विचारू लागले.

मार्टिन बर्कले नावाच्या लेखकाला मी भेटले आहे का ? असं विचारण्यात आलं. ( मी बर्कलेला कधीही भेटलेले नाही. पेट्रोगोल्डविन मेयरच्या प्रमुख कार्यालयात एकदा १६–१७ जण जेवायला आले असता मी त्यावेळी हजर होते व तेथे बर्कले होता असं हॅमेटनं नंतर मला सांगितलं. ) मी या प्रश्नाचं उत्तर देण्यास नकार देते असं सांगितलं. श्रीयुत टॅव्हनर यांनी मला परत विचारलं की, १९३७ साली उन्हाळचात तुम्ही परदेशी गेला होता का ? मी उत्तर दिलं, होय. युरोपला जाण्यापूर्वी अनेक आठवडे मी न्यूयॉर्कला राहिले होते तेही सांगून टाकलं. मग टॅव्हनर यांनी बर्कलेची साक्ष वाचून दाखवली. ही साक्ष मोठी गंमतीशीर आहे. त्यातला काही मासला असा–

श्री. टॅव्हनर : कम्युनिस्ट पक्षाची हॉलिवूड शाखा कुठे आणि केव्हा स्थापना झाली हे सांगाल काय ?

श्री. बर्कले : विचित्र योगायोग असा की, या शाखेची स्थापना माझ्या घरी झाली. १९३७ साली जूनच्या मध्याला ही बैठक माझ्या घरी घेण्यात आली. माझ्याकडं मोठा हॉल होता आणि मोटारीच्या पार्किंगची प्रशस्त सोय होती म्हणून माझ्या घराची निवड करण्यात आली......ही बैठक चांगली मोठी झाली. बडी बडी मंडळी हजर होती. जेरोमे व इतरांची नावं मी पूर्वीच सांगितली आहेत. तेव्हा आता त्याची पुनरुक्ती करत नाही. त्यांच्याखेरीज हॅरी कार्लिस्ले हा हजर होता. त्याची देशाबाहेर हकालपट्टी केली जात असून त्याबद्दल मी कृतज्ञ आहे. तो ब्रिटिश नागरिक आहे. मार्क्सिस्ट धडे द्यायला तो इथं आला होता. या बैठकीला डोनाल्ड ऑगडेन स्टीवार्ट, लेखिका डोरोथी पार्कर, तिचा नवरा ॲलेन कॅम्पबेल, आपल्या कारवायाबद्दल तुरुंगवास भोगत असलेला माझा जुना मित्र डॅशियल हॅमेट ( खरं तर चेहऱ्यावर ओळख दाखवण्यापलीकडे बर्कलेशी डॅशचा परिचय नव्हता ) आणि नाटककर्ती लिलियन हेलमन......ही मंडळी होती.

ही मूर्खपणाने भरलेली जबानी वाचून झाल्यावर टॅव्हनरनं मला विचारलं, हे खरं आहे का ? मी म्हटलं, मी कमिटीला पाठवलेल्या पत्राचा, मी दिलेल्या ऑफरचा तुम्ही विचार करावा–

श्री. टॅव्हनर : याचा अर्थ कम्युनिस्ट पक्षाच्या कारवायांत ज्यांनी भाग घेतला, त्यांच्याविषयीच्या प्रश्नांना तुम्ही उत्तरे देणार नाही असाच ना ?

मी असं म्हटलेलं नाही, हे त्यांच्या लक्षात आणून दिलं.

मी व कमिटी यांच्यात झालेला पत्रव्यवहार रेकॉर्डमध्ये नोंदवावा असं श्री. वूड यांनी सुचवलं. श्री. टॅव्हनर यांनी तसं केलं तेव्हा लागलीच रौहनं माझ्या पत्राच्या मुद्रांकित प्रती वार्ताहरांना दिल्या. मला याचं कोडं पडलं. त्यांच्याकडे माझ्या पत्राच्या नकला आहेत हे मला ठाऊक नव्हतं. रौहला मात्र आनंद झालेला दिसला. श्री. टॅव्हनर मात्र अस्वस्थ झालेले दिसले. श्री. वूड यांनी त्यांना दोन्हीही पत्रे मोठ्यानं वाचून दाखवण्यास सांगितली. त्यांनी त्याप्रमाणे ती वाचून दाखवली.

त्यामुळं त्या दालनात कुजबुज सुरू झाली विशेषतः वार्ताहर काहीतरी बोलत होते. मग मला टॅव्हनर यांनी विचारलं, बर्कले म्हणतात त्या बैठकीला मी हजर होते की नाही ? आयुष्यातली सर्वांत कठीण गोष्ट मी त्यावेळी केली म्हणजे त्यांचा हा प्रश्न, हा अपमान मी गिळला. मला वाटत होतं की, आपण ओरडून सांगावं की, 'मला बर्कले कोण हे ठाऊक नाही. तुम्ही जर थोडा जरी तपास केला असता तर बर्कले म्हणतात त्या बैठकीला मी हजर राहूच शकले नसते हे समजलं असतं.' परंतु मी तसं काही सांगितलं नाही. मी म्हटलं, ' मी या प्रश्नाचं उत्तर नाकारलंच पाहिजे.' माझ्या म्हणण्यातील 'नाकारलंच' या शब्दानं वूड चिडले. हा शब्द पुन्हा पुन्हा एकला की ते पुन्हा पुन्हा चिडत. ते मला म्हणाले, 'तुम्ही प्रश्नाचं उत्तर नाकारू शकता. प्रश्न विचारला आहे, तुम्ही तो नाकारता का ?'

वूड यांनी मला असं विचारणं, त्यांच्या शब्दातली चीड यामुळं मी नर्व्हस होते. खाज सुटली असावी असा रीतीनं मी हात हलवू लागले. एखाद्या शब्दानं ते चिडत असतील तर मग लौकरच ते आपला अपमान होतोय् असं समजतील. तेव्हा मी ताठ बसले. डाव्या हातानं माझा उजवा हात घट्ट पकडून ठेवला. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. माझा चेहरा घामानं डबडबला. मला काहीतरी होणार असं वाटू लागलं आपला ताबा सुटणार की काय अशी भीती मला वाटू लागली. जोनं मला टॉयलेटला जाण्याचं

**आयुष्यातली सर्वांत कठीण गोष्ट मी त्यावेळी केली. मी अपमान गिळला.**

सुचवायला सांगितलं होतं. ते मला आठवलं. परंतु सुनावणी सुरू होऊन अवघी सोळाच मिनिटं झाली होती, तेव्हा मी ठरवलं, अजून काहीवेळ दम धरावा.

प्रश्न विचारले जात होते. मी कम्युनिस्ट पक्षाची सभासद होते का? असले तर कोणत्या वर्षी मी सभासदत्व रद्द केलं? मार्टिन बर्कले ठाऊक आहे असे सांगितल्यानं कोणाला त्रास होणार आहे? मी सतत नकार देत होते.

प्रश्नांचा हा भडिमार सुरू असताना, माझ्या गतकालाविषयी खोदून खोदून विचारलं जात असताना एकदम अघटित घडलं. कोणीतरी अज्ञात व्यक्तीनं त्यावेळी जे उद्गार काढले त्याचा माझ्या पुढील जीवनावर फार प्रभाव पडला. पत्रकारांच्या विभागातून एक मोठा आवाज आला. इतरांपेक्षा तीन ते चार पटीनं हा आवाज मोठा होता. (तोवर वार्ताहरांनी मी कमिटीला पाठवलेलं पत्र वाचलं होतं व त्याविषयी ते चर्चा करत होते.) मोठ्या आवाजातील माणसाला लहान आवाजानं प्रत्युत्तर दिलं गेलं आणि मग कोणाचा तरी खणखणीत स्पष्ट आवाज आला. तो म्हणाला, 'नशीब, एवढं करायची हिंमत असलेलं कोणीतरी पाहायला मिळालं!'

आयुष्यातला अमुक हा सर्वोच्च सुखाचा क्षण आहे, असं आपण म्हणणं शहाणपणाचं नसतं. कारण काही गोष्टींचा आपल्याला विसर पडलेला असतो. परंतु मला असं अजूनही वाटतं की, त्या अज्ञात आवाजानं मला वाचवण्याच्या कामी साहाय्य केलं.

आपला हातोडा आपटीत वूड म्हणाले, 'पुन्हा असं घडलं तर, मला वार्ताहरांना येथून बाहेर काढावं लागेल.'

'काढाच तुम्ही.' त्याच अज्ञात इसमानं जबाब दिला.

वूड कोणाशी तरी पुटपुटले. मग कोणीतरी वार्ताहरांच्या बाजूला जाऊन आलं. परंतु हे प्रकरण एवढ्यावरच थांबलं. त्या दिवशी तेथे कोण बोललं त्या व्यक्तीचं नाव मला अजून ठाऊक नाही. परंतु नंतर कित्येक महिने रोज मला वाटायचं की, त्या माणसाला भेटावं नि म्हणावं की, "मला वूडना असं सांगायचं होतं-या देशात कम्युनिस्टांनी धुडगूस घातलेला नाही, हे तुम्हाला ठाऊक आहे. तुम्ही भित्र्या माणसांना खोटारडे बनवण्याचा घाणेरडा उद्योग केला आहे. तुम्ही मला पत्र लिहायला लावलंत, त्यात मी तुमची सत्ता मान्य केली आहे. खरं तर तुमच्या कमिटीरूममध्ये जाऊन, माझा नाव-पत्ता देऊन, मी बाहेर पडायला हवं होतं!'

श्री. वूड सांगत होते, 'श्री. वॉल्टर यांना साक्षीदाराला यापुढं काहीही प्रश्न विचारण्याची इच्छा नाही. यापुढं साक्षीदारानं कमिटीपुढे हजर राहू नये, असं सांगायला काही आक्षेप आहे का?'

श्री. टॅव्हनर म्हणाले, 'नाही.'

माझी सुनावणी संपली होती. एक तास सात मिनिटं ही सुनावणी चालली. ती संपल्याचं माझ्या लक्षात लगेच आलं नाही. जो माझ्या कानात आनंदानं कुजबुजला— उठ, ताबडतोब उठ. येथून तात्काळ

पॉलिट तुला घेऊन जाईल. कोठल्याही कारणासाठी थांबू नकोस. धावू नकोस, पण वेगानं चाल. जवळ कोणी आलं, प्रश्न विचारू लागलं तरी तू चालतच राहा. लहानपणी वर्गात उशीरा आले की, मी जशी धावायची तशी मी धावत बाहेर पडले. डॅनियल पॉलिटनं नंतर लिहिलेल्या पत्रात लिहिलंय की, आम्ही एका रेस्टॉरंटमध्ये स्कॉच पीत जोची वाट पाहात बसलो, पण तो आलाच नाही. पॉलिटच्या खिशात अवघा दीड डॉलर होता. बिल कसं द्यायचं याची विवंचना त्याला पडली होती. परंतु परराष्ट्रखात्यातला माझा एक मित्र तिथं आला नि त्यानं बिल दिलं. परंतु पॉलिटचा (तो सध्या नॉर्थ कॅरोलिना विद्यापीठात कायद्याचा नामवंत प्राध्यापक आहे.) काहीतरी घोटाळा झाला असावा. पुढे केव्हा तरी हे घडलं होतं. त्या दिवशी नव्हे. माझ्या डायरीत जी नोंद आहे, त्यानुसार जो रौह आम्हाला नंतर येऊन भेटला. त्यानं माझं चुंबन घेतलं, पॉलिटच्या खांद्यावर अनेकदा थोपटलं, सँडविचेसची ऑर्डर दिली नि तो मला म्हणाला, 'शेवटी आपण करून दाखवलंच!'

कमिटीनं माझं पत्र वाचून दाखवण्यात कायदेशीर चूक केली की नाही, कोण जाणे! परंतु त्यांची स्थिती केविलवाणी झाली. त्यांना इतरांची नावे हवी होती. मी त्याला नकार दिला. त्यांना 'पाचव्या घटनादुरुस्तीचा कम्युनिस्ट' म्हणून मला बदनाम करायचं होतं. पण मी स्वतःबद्दल सारं सांगायला तयार आहे. त्यासाठी या दुरुस्तीचा आधार घेणार नाही, असं पत्रात म्हटलं होतं. तेव्हा त्यांना तेही शक्य झालं नाही. ते मला परत बोलावू शकले असते, परंतु त्यासाठी त्यांना दुसरं कारण हुडकावं लागलं असतं. तेव्हा ते काही मला तुरुंगवासात पाठवू शकले नाहीत.

मग आम्ही जोच्या ऑफिसात गेलो. कोणीतरी न्यूयॉर्क टाइम्सच्या आर्थर क्रॉकशी बोललं. त्यानं माझ्या ठाम भूमिकेचं कौतुक केलं व टाइम्समधील वृत्तान्त मला अनुकूल राहील, असं सांगितलं. सर्वच वार्ताहरांनी चांगलं सहकार्य दिलं. पाच दिवसांनंतर 'पोस्ट'मध्ये मरे केम्प्टननं 'पोर्ट्रेट ऑफ अ लेडी' नावाचा लेख लिहिला, तो वाचून मी सुखावले.

आता आयुष्य बदललं होतं. अनेक लोकांनी मला फोन केला नाही. पण दुसरे काही लोक होते, त्यात काही मित्र होते, अर्धपरिचित लोक होते, त्यांनी मला पत्रं पाठवली, जेवायला बोलावलं. मला भेटण्याचे काय परिणाम होतील याची त्यांपैकी काहींना जाणीव असावी. नंतर मला जे जे अनुभवावं लागलं त्यामुळं उदारमतवादावरचा माझा विश्वासच उडाला. सत्य बोलणं याचा अर्थ देशघातकी आहात असं समजलं जाऊ लागलं. बदमाषांच्या काळात हे असंच व्हायचं.

१९५२ साल आम्हाला आणखी शिक्षा करणार होतं. जीवन झपाट्यानं बदलून गेलं. बरीच वर्षे पुरेल इतका पैसा पूर्वी होता आणि आता पैसेच नव्हते. माझ्यावर समन्स बजावलं तेव्हाच मला याची कल्पना आली. शेत विकून टाकावं लागलं. मला चित्रपटासाठी लिहिता येणार नाही, हेही उघड होतं आणि नाटकाचं क्षेत्र तर अनिश्चितच होतं. नाटकं लिहायला मला वेळही लागतो. एक नाटक लिहायचं तर दोन वर्षं जातात. हॅमेटचं रेडिओ, टी. व्ही., पुस्तकं यांचं उत्पन्न केव्हाच बंद झालं होतं. शेताचे तुकडे करून मला पैसा मिळवता आला असता. परंतु हॅमेट म्हणाला, 'आपण कशाला तुकडे करायचे? आपण आहे तसंच विकू या शेत. इतरांना त्याचं काय करायचं ते करू दे.' मी त्याच्याशी सहमत झाले. माझ्या आयुष्याचा एक काळ संपला होता आणि त्यापासून मी जितकी दूर जाईन तितकी मी बदललेलं जीवन सुरू करू शकेन, असं मला

वाटत होतं. मी वेगानं सारं विसरायचा प्रयत्न करत होते. पण तरीही शेत विकावं लागणं, ही माझ्या जीवनातली सर्वांत दुःखद गोष्ट होती. हॅमेटला तर सर्वांत जास्त दुःख झालं. पण शेत विकण्यापूर्वी पाच दिवस आधी एक अवर्णनीय घटना घडली. मला शेताच्या एका बाजूला हरणं पाळायची होती. ती कल्पना प्रत्यक्षात आली नाही. पण त्या दिवशी कुठून कोणास ठाऊक, वीस हरणांचा कळप आमच्या शेतात, फळांच्या झाडांतून चालत चालत आला. श्वास रोखून मी ते अविश्वसनीय दृश्य पाहत राहिले.

आम्ही दोघांनी एकाचवेळी या घराचा, शेताचा निरोप घ्यायचा म्हणजे दुःख अनावर झालं असतं. तेव्हा हॅमेट दुसऱ्या दिवशी सकाळी निघून गेला व नंतर जूनमधील एका सोमवारी मीही निरोप घेतला. तो सोमवार काही सुखाचा नव्हता. फर्निचरवाले फर्निचर हलवत होते. माझ्या गायी, बदके, कोंबडया ज्यांनी खरिदल्या होत्या त्यांनी त्या न्यायला सुरूवात केली होती. शेतीची अवजारे, बोटी, मांस कापण्याची सुरी शेकडो वस्तू विकाव्या लागल्या होत्या. मी मनाशी म्हटलं आता पुन्हा या वस्तू मी कधी घेऊ शकणार नाही. पण मग मी असंही म्हटलं की, या वस्तू आपण घेऊ शकलो हेच आपलं किती मोठं भाग्य आहे. आणि हीच भावना अजून माझ्या मनात रेंगाळते आहे. भ्रष्टाचारी आणि अन्यायी माणसांमुळे माझी हक्काची जागा मला विकावी लागत आहे याची मला चीड आली. पण तेवढयापुरतीच मी शेतावर काम करत राहिले असते तर लौकर म्हातारी झाले असते. जुन्या सहकाऱ्यांना अजूनही मी नाताळच्यावेळी भेटी पाठवते. तेही मला भेटी पाठवतात. परंतु आम्ही एकमेकांना भेटायचं टाळतो. कारण गेलेल्या चांगल्या काळाच्या आठवणी सुरू करतील अशी भीती वाटते. ❑

कमिटीपुढं माझ्या झालेल्या सुनावणीनंतर व मी शेत विकून टाकल्यानंतरच्या एक वर्षाच्या काळातील माझ्या आठवणी थोडया आहेत. माझ्या डायरीतही अधूनअधून नोंदी आहेत. न्यूयॉर्क आवडेनासे झाल्याने हॅमेट काटोनाहला गेला व मित्राकडून एक छोटं घर त्यानं भाडयानं घेतलं. हे घर हॅमेटनं आणखी छोटं केलं ते पूर्वीची प्लेझेन्टव्हिला येथील बरीचशी उपकरणं, पुस्तकं यामुळं. ही उपकरणं घरभर विखुरलेली आणि पुस्तकांचे खुर्च्यांवर, जमिनीवर ढीगच्या ढीग, त्यामुळे घरात सापासारखं वावरावं लागे.

पैसा भराभर संपत होता. मला पूर्वी वर्षाला १ लाख २० हजार डॉलर्स मिळत पण हॉलिवूडनं माझ्या सुनावणीनंतर काळ्या यादीत माझं नाव गेलं. माझं उत्पन्न ५०, २० व १० वर आलं. त्यांपैकीही बराचसा पैसा इंटर्नल रेव्हेन्यू खातच न्यायचं. खर्चायला पैसा नसणं यामुळे माझ्यात काही अपेक्षेइतका फरक पडला नाही. मध्यमवर्गीय सुरक्षिततेवर माझा विश्वास अजूनही आहे. पण रोज जेवायसाठी इतकेच पैसे, कपडयासाठी, इतर वस्तूंसाठी इतकेच पैसे असं मोजत बसणं मला कंटाळवाणं वाटे. हॅमेट दरमहा तिजोरीतून तुटपुंजी रक्कम घेऊन त्यात भागवायचा. घरभाडे आणि जेवण याखेरीज तो कशावरही खर्च करायचा नाही. त्यानं नवा सूट घेतला नाही की, टाय खरीदला नाही. पुढे १९६० साली 'टॉईज इन द अॅटिक' हे माझं नाटक खूप यशस्वी झालं, पैशाच्या दृष्टीनं वाईट काळ संपला. त्यावेळी मी हॅमेटला नवा सूट आणला. नंतर एका वर्षानं हॅमेट मरण पावला पण निदान ते वर्ष सुरक्षिततेत त्यानं घालवलं.

चित्रपटनिर्माता अलेक्झांडर कोर्डानं मला चित्रपटकथा लिहायचं काम १९५३ साली दिलं. माझ्या सुनावणीपूर्वी मला त्याच्या एकपंचमाश मोबदल्यात मी काम करायचं कबूल केलं. मला पैशाची गरज होती आणि त्यावर वाद घालण्यास वेळ नव्हता. (पुढे कोर्डनं मला फसवलं. त्यानं कबूल केलं त्याच्या एकतृतीयांश पैसेच माझ्या हातावर ठेवले.)

युरोपला जाऊन कोर्डाशी सल्लामसलत करून मला पटकथा लिहायची होती, त्यासाठी पासपोर्टची गरज होती. 'हाऊस कमिटी ऑन अन-अमेरिकन अॅक्टिव्हिटीज' पुढे ज्यांनी सरकारविरोधी जबानी दिली, त्यांना पासपोर्ट नाकारण्यात आले होते. पासपोर्ट विभागाच्या प्रमुख श्रीमती शिपले यांना मी भेटावं असं रौहनं मला सुचवलं. माझ्यासारख्यांच्या बाबत सरकारचं धोरण काय हे मला ठाऊक असल्यानं माझी ही भेट काही कामाची नाही, असं मला वाटत होतं. तर मला पासपोर्ट मिळेल असं रौहचं मत होतं. 'कशावरून!' असं विचारलं तेव्हा तो म्हणाला, 'तू शिपलेला भेटून आल्यावर सांगेन.'

मी शिपलेला भेटायला गेले. तिनं माझी फाईल मागावून घेतली, त्यात चार्ली चॅपलिनचे तीन मोठे फोटो होते. मी चॅप्लिनला दोन-तीनदा भेटले होते इतकेच. परंतु त्याकरिता त्याचे फोटो माझ्या फायलीत कशाला हे मला उमजेना. शिपलेनं चॅप्लिनबद्दल मला काही विचारलं नाही. अमुक एका संघटनेशी कधी संबंध होता काय असं सांगून तिनं संघटनांची नावं वाचायला सुरुवात केली, 'रेड चॅनल्स' नावाच्या पुस्तकातील संघटनांची ती सारी नावं होती. मी अमुक एकाशी माझा संबंध आहे, अमुक संघटनेशी नाही, हे सांगण्याच्या फंदात पडले नाही.

अनुकूल साक्षीदारांनी कमिटीपुढे जे सांगितलं ते सत्य आहे का? मला संशय येतो की, त्यातले बरेच खोटं बोलत असावेत, त्यांना शिक्षा केली जाईल असं शिपले यांनी सांगितलं.

तुम्ही युरोपला जाता तेव्हा राजकारणातील व्यक्तींना तुम्ही भेटता काय? असे तिने विचारले असता मी म्हणाले, 'त्या क्षेत्रातील माझे फारसे लोक ओळखीचे नाहीत. स्पेनमध्ये लढलेले काहीजण व लुई अटॅगॉन व त्याची पत्नी एल्सा ट्रिओलेट ही मंडळी मला ठाऊक आहेत.'

'मला तसं पत्र लिहून द्या आणि त्यात तुम्ही कोणत्याही राजकीय कार्यात भाग घेणार नाही असं नमूद करा.' शिपलेनं सांगितलं.

मी थोडा वेळ विचार केला. हा मला सापळयात पकडायचा तर प्रयत्न नाही ना? अशी शंका चाटून गेली. मी म्हटलं, मी फॉसिझम, नाझी विरोधी होते. तेवढे सोडून मी कधीही युरोपियन राजकीय चळवळीत भाग घेतलेला नाही. ते मी तुम्हाला लिहून देते. परंतु जुन्या मित्रांना मी भेटणारच नाही असं नाही मी सांगू शकणार.'

ती उठली नि म्हणाली, 'थॅंक यू. तुम्हाला मर्यादित पासपोर्ट

दिला जाईल. या आठवड्याभरात तो पाठवला जाईल. सिनेमाच्या कामासाठी तुम्हाला अधिक काळ युरोपात राहावं लागलं तर पासपोर्टच्या मुदतवाढीसाठी तुम्हाला पुन्हा इथं अर्ज करावा लागेल.'

एवढं म्हणून शिपले निघून गेली. दुसऱ्या एका सेक्रेटरीनं दुसरा एक दरवाजा उघडला. मी त्या दारातून बाहेर पडले. बाहेर रोहू वाट पाहत होता. त्यानं विचारलं, 'पासपोर्ट मिळाला?'

'हो.'

'सरकारविरोधी जबानी देऊन पासपोर्ट मिळणारी तू एकटीच आहेस.'

'तुला एवढी खात्री कशी वाटत होती की, मला पासपोर्ट मिळणार म्हणून?'

'कारण सत्तास्थानी असलेल्या एका प्यूरिटन बाईनं दुसऱ्या अडचणीत असलेल्या प्यूरिटन बाईला ओळखलं म्हणून!'

तेव्हा श्रीमती शिपले यांनी दिलेला मर्यादित पासपोर्ट घेऊन मी रोमला आले. कोर्डाचा चित्रपट मॅक्स ओफूलस दिग्दर्शित करणार होता व पटकथा रोम इथं मुक्काम ठोकून लिहायची असं मी ठरवलं होतं. कारण रोम हे इतर ठिकाणांपेक्षा राहवयला स्वत ठिकाज होतं. एका हॉटेलात मी छोटी जागा घेतली होती. रोममध्ये माझे काही मित्र होते, परंतु तो मित्रांना भेटण्याचा काळ नव्हता. पैसे वाचवण्याचा काळ होता. आज तरीही आठवड्याला पाच डॉलर अशी उधळपट्टी मी करत होते. सोमवारी मी बाजारात जायची आणि पाच डॉलर खर्चून टाकायची. वाटेल ते खरेदी करायची; त्यामुळं बरं वाटायचं. त्यामुळे रोममध्ये त्या वर्षी मिळणारे सुंदर जोडे, कपडे व पिशव्या खरेदी करण्याचा मोह मला होत नसे.

यापूर्वी नव्हते इतकी एकाकी मी होते. परंतु जीवन तसं सुखद होतं. या शहरातील अनेक गुप्त वैभवशाली गोष्टी मी पाहिल्या. कारण मी स्वस्त हॉटेलांच्या अथवा दुकानांच्या शोधात असे, त्यामुळं अनेक छोटी छोटी सुंदर चर्चेस, इमारती मला पाहायला मिळाल्या. कधीमधी मी मित्रांनाही भेटे.. काही अमेरिकन्सनांचीही भेट घेई. एखादे वेळेस मला अलेक्झांडर कोर्डा त्याच्या बोटीवर बोलावून घेई. मी जी पटकथा लिहीत होते त्याचं वाचन होई. दिग्दर्शक ओफूलस व कोर्डा हे माझ्या लिखाणावर खूष होते.

अशा काही रोजच्या धारदार आठवणी माझ्यापाशी आहेत, पण खरं नाटच घडलं ते जुलैत. त्यावेळी अमेरिकेच्या राजदूत श्रीमती ल्यूस होत्या. जुलैतल्या एके दिवशी मी 'रोम डेली अमेरिकन'चा अंक वाचीत होते. सिनेटर मॅकार्थीनं माझ्यावर समन्स काढलंय अशी बातमी त्यात होती. (त्यानं समन्स काढलं नव्हतं. परंतु वर्तमानपत्रात आलेल्या बातमीचा अर्थ मी असा काढला की, मी न्यूयॉर्कमध्ये नाही हे कळल्यावर इथं रोममध्ये माझ्यावर समन्स बजावलं जाईल.) माझ्या मर्यादित पासपोर्टची मुदत आता अवघी दहाच दिवस उरली होती. श्रीमती शिपले पासपोर्टची मुदत वाढवून देईल म्हणून मी निश्चित होते. पण आता मॅकार्थीच्या या बातमीनंतर आता मला मुदतवाढ मिळणं अशक्य होते. तसंच कोर्डाही आता मला कामावर ठेवण्याची शक्यता नव्हती.

मी तार कचेरीच्या दिशेनं निघाले. मॅकार्थीला तार करून रोममधील आपला पत्ता कळवावा असं वाटलं. पण काही कप कॉफीचे पोटात रिचवल्यावर यात काही अर्थ नाही, हे मला जाणवलं. कारण मॅकार्थीला मी रोममध्ये आहे व मला कोठे गाठायचं हे नक्कीच ठाऊक असणार. परंतु हे सुचायला एक तास लागला. तेव्हा मी ठरवलं की, याबाबतीत स्वतःवर अवलंबून राहायचं नाही. एकोल ग्राझिदेई या माझ्या ओळखीच्या वकिलाला मी फोन केला. वर्तमानपत्रातील बातमी खरी आहे की नाही याबद्दल खात्री नसली तरी एक गोष्ट मात्र नक्की की, रोममधील अमेरिकन वकिलानं माझ्या पासपोर्टची मुदत वाढवून देणार नाही, असं त्यानं सांगितलं. रोममध्ये मी राहाणं सुरक्षित नाही, कारण इटालियन सरकार बऱ्याच वेळा श्रीमती ल्यूस (अमे. राजदूत) यांच्याकडून ऑर्डर्स घेत असते. तेव्हा समन्स घेणं टाळणं अथवा मुदत संपल्यावर पासपोर्टावर राहिला, यापेक्षाही क्षुल्लक आरोपाखाली इटालियन सरकार माझा छळ करू शकेल, असंही त्यानं सांगितलं. मी म्हटलं, 'मग मी सरळ न्यूयॉर्कलाच जाते.' त्याच्यामते ते तर मूर्खपणाचं होतं. मी लंडनला जावं. तेथलं सरकार वॉशिंग्टनकडून ऑर्डर्स घेत नाही. तेव्हा तेथे जाऊन पासपोर्टची मुदत वाढवून घेण्याचा प्रयत्न करावा, असं ग्राझिदेईनं सांगितलं. मला ही कल्पना पसंत पडली. मला लंडनहून हॅमेटला फोनही करता आला असता. फोनवरील संभाषण चोरून ऐकलं जाण्याचा धोका तिथं नव्हता. ग्राझिदेईचा जावई माझं दुपारचं लंडनच तिकिट काढून ठेवणार होता. मी माझ्या हॉटेलातील खोलीवर जायचं, पर्स किंवा एखाद्या पिशवीत मावेल एवढंच सामान घेऊन नेहमीसारखं बाहेर पडायचं. तेथून एक्सलसिअर हॉटेलपर्यंत टॅक्सीनं जायचं. दहा मिनिटं तिथल्या बारमध्ये घालवायची आणि मग दुसरी टॅक्सी पकडून विमानतळावर जायचं. तेथे मला ग्राझिदेईचा जावई भेटेल अशी योजना ठरली.

ग्राझिदेईनं सांगितल्याप्रमाणंच मी सारं केलं. त्या दुपारच्या वेळी


# पॅपिलॉन पॅपिलॉन

लेखक : हेन्री शॅरीयर
अनुवाद : रवींद्र गुर्जर

किंमत : पंचवीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

विमानतळ सुना होता. फक्त ग्राझिदेईचा जावई तिकिटांसह माझी वाट पाहत होता. मी विमानतळावर मासिक वाचत बसले. त्या वेळी लाऊडस्पीकरवर माझं नाव जाहीर करण्यात आलं. मला कोणाचा तरी फोन आला होता म्हणे. पण मी जागची हलले नाही. परंतु पुन्हा माझं नाव जाहीर केलं गेलं. ज्या तरुणीनं माझं तिकीट तपासलं होतं तीच माझं नाव लाऊडस्पीकरवरून जाहीर करत होती. तिच्या जागेवरून ती मला पाहत होती. तेव्हा फोन न घेणं मला शक्य नव्हतं. मी फोन घेतला. एका कॉन्टेसाच्या सेक्रेटरीचा फोन होता. मी तिला काही वेळा भेटले होते. परंतु त्या सेक्रेटरीला मी इथं असल्याचं कसं कळलं असावं, याचा संभ्रम मला पडला. फोनवरचा आवाज जरा जादा इंग्लिश उच्चार असलेला वाटला. कॉन्टेसा रोमला या आठवड्याअखेर परतणार होती व तिच्या घरी पार्टी होती. त्याला उपस्थित राहण्याचं निमंत्रण देण्यासाठी हा फोन सेक्रेटरीनं केला होता. मी होकार दिला व एका अमेरिकन मित्राला भेटायला विमानतळावर आले आहे, असं त्या सेक्रेटरीला सांगितलं. नंतर मी लगेच ग्राझिदेईला फोन केला. सेक्रेटरीनं मला फोन केला नसणार. कोणी तरी माझा पाठलाग करत असावं; परंतु मध्येच चुकामूक झाली असणार. तेव्हा मी विमानतळावर आहे किंवा नाही, याची शहानिशा करण्यासाठी हा फोन करण्यात आला असावा, असं ग्राझिदेईचं म्हणणं पडलं.

परंतु आता मला कोणी रोखू शकणार नव्हतं. विमानाची वेळ झाली होती. मात्र मोठ्या नर्व्हस अवस्थेत मी लंडनपर्यंत प्रवास केला. मी नेहमीप्रमाणं क्लॅरिज हॉटेलात उतरले.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी अमेरिकन वकिलातीत पासपोर्टची मुदत वाढवायला गेले. मला काऊन्सलला भेटायला हवं असं सांगण्यात आलं. मला दुपारी परत यायला सांगण्यात आलं. त्यावेळी काऊन्सल भेटले. पण त्यांनी पासपोर्टच्या मुदतवाढीबद्दल वॉशिंग्टनला विचारावं लागेल असं सांगितलं. तिसऱ्या दिवशी मला वकिलातीत पुन्हा बोलावण्यात आलं. पण काऊन्सल लगेच भेटेना. मला वाटलं, त्याला सांगावं, 'खड्डयात जा!' पण मी वाट पाहिली. अखेर काऊन्सल भेटले व त्यांनी श्रीमती शिपले यांनी माझ्या पासपोर्टची मुदत तीन महिन्यानं वाढवण्यात आल्याचं सांगितलं.

मी हॅमेटला फोन केला. ग्राझिदेईला फोन करून ही आनंदाची बातमी दिली. मी रोमला परतले. जाताना विमानतळावर आलेल्या कॉन्टेसाच्या सेक्रेटरीच्या फोनचं कोडं मला पडलं होतं. तेव्हा मी रोमला येताच कॉन्टेसाच्या सेक्रेटरीला फोन केला. तिचे उच्चार इंग्रजी वळणाचे नव्हते. कॉन्टेसा गेले काही आठवडे रोमबाहेर गेल्या आहेत व एक महिन्याने त्या परततील, असं तिनं सांगितलं.

मग मी हॅमेटला फोन केला. माझ्यावर समन्स बजावल्याचं कसलंही वृत्त न्यूयॉर्कच्या वर्तमानपत्रांत नाही, असं त्यांनी सांगितलं. मी कॉन्टेसाच्या फोनबद्दल त्याला सांगितलं. हॉटेलातील कारकून, वेटर्स, नोकर यांना पाच डॉलर्स, दहा डॉलर्स दे व तुझा कोणी पाठलाग केला, कोणी हॉटेलात तुझी चौकशी करत होतं का, याची माहिती काढ असंही हॅमेटनं सुचवलं.

दुसऱ्या दिवशी मी त्यानुसार हॉटेल-नोकरांना पैसे दिले, पण कोणी माहिती सांगेना. पण दोन दिवसांनंतर एक हमाल मला एका दुकानदाराकडे घेऊन गेला. त्याने माझ्याकडे आणखी पैशाची मागणी केली. मी त्याला वीस डॉलर्स दिले. एक माणूस माझी चौकशी करत होता. आपण कसले तरी अधिकारी आहोत, असं त्यानं सांगितल्याचं मला दुकानदार म्हणाला. दुसऱ्या दिवशी आणखी दहा डॉलर्स घेतल्यावर त्या माणसाचं नाव 'डिक' असल्याचं त्यानं मला सांगितलं.

मग मी रोम सोडून जायचं ठरवलं. माझ्यावर समन्स काढण्यात आलं नाही. मॅकार्थीकडून मला कधी काही कळवलं गेलं नाही. सी. आय. ए. रोममध्ये माझ्यावर पाळत ठेवून होती. त्यांचा काय उद्देश होता हे समजलं नाही. पण एका हितसंबंधियानं (डिकनं) रोममधील वृत्तपत्रांत माझ्यावर समन्स काढल्याची बातमी हेतुतः दिली होती.

त्या वर्षी दुसरं काही विशेष घडलं नाही. मी पटकथा लिहीत असताना ती कोर्डाला आवडली होती, परंतु संपूर्ण लिहून झाल्यावर मात्र ती त्याला आवडली नाही. त्याने मोबदला देण्यास नकार दिला.

मी न्यूयॉर्कला आले. सारे पैसे संपले होते. बनावट नाव धारण करून मी एका डिपार्टमेंटल-स्टोअरमध्ये अर्धवेळ नोकरी धरली. हॅमेटला काळजी वाटू नये म्हणून मी त्याच्यापासून ही गोष्ट लपवून ठेवली. त्यानंतर सहा महिन्यांनी माझी एक लाडकी मावशी वारली. तिनं मरताना माझ्यासाठी भरपूर पैसे ठेवले.

मी व हॅमेटनं एक घर भाड्यानं घेतलं. मॅकार्थीचा अस्त झाला होता. सर्व अमेरिका त्याला व त्याच्या टोळीला वैतागली होती. पण मॅकार्थीचा एकेकाळी हस्तक असलेल्या रिचर्ड निक्सनलाच अमेरिकनांनी अध्यक्षपदी निवडून दिलं. भूतकाळ, आपल्या चुका यांची आठवण ठेवणं अमेरिकेत निकोप मानलं जात नाही. निक्सननं एवढी मोठी भानगड केली तरी, आता वर्षानंतर आपण विसरलोय.

नंतर मला काही विशेष त्रास झाला नाही. मी पुन्हा नाटकं लिहू लागले व १९५८ नंतर पुन्हा चित्रपटांची कामे मला दिली जाऊ लागली. परंतु मला ही कामे नको होती. त्यातील चवच निघून गेली होती.

त्या वेळी मला जो शॉक बसला त्यातून मी पुरती सावरलेले नाही. माझा विचारवंतांवर विश्वास होता, पण त्याला तडा गेला. तेव्हा मी या धक्क्यातून सावरले असे म्हणत असले तरी, ते नेहमीच्या परिचित अर्थानं. माणूस धक्क्यातून सावरू शकतो, यावर माझा विश्वास नाही. आपला भूतकाळ, त्यातील हर्ष-खेद, मूर्खपणा, झालेला ताप, शिक्षा हे सारं तसंच असतं आणि ते तसंच असलं पाहिजे.

आयुष्यातल्या त्या असुखकारक भागाविषयीचं हे लेखन संपवताना मी माझ्या मनाला असं बजावते की, तो काळ तेव्हा होता आणि आता हा काळ आहे. आणि तेव्हा आणि आताच्या काळामधील वर्षे ही आता एकरूप झालेली आहेत.

## स मा प्त

चित्रपट । शिरीष सहस्रबुद्धे

# नाव मोठं लक्षण खोटं

## चित्रपटाचं नावही तेच आणि लक्षणही तेच.

'जिंदगी' चा मराठी अवतार म्हणता येईल असा हा एक सप्तरंगी, भव्य वगैरे मराठी चित्रपट. जिंदगीचा मराठी अवतार हे अशा अर्थानं म्हटलं की, जिंदगी-बाबत केलेली बरीच टीकाटिप्पणी या चित्रालाही लागू होते. जिंदगीप्रमाणेच याचंही नाव जुनाट धर्तीचं, अनाकर्षक आणि बेंगरूळ आहे; शिवाय चित्रपटाचं सार – essence – वाजवीपेक्षा जास्त उघड करून सांगणारं आहे. दुसरं असं की, जिंदगीप्रमाणेच यातही रुटीन चीजा पुष्कळ आहेत आणि मुख्यतः उचलेगिरीचं प्रमाणही लक्षणीय आहे. विशेषतः 'बारुद', 'अदालत' यासारखे अलीकडचे काही चित्रपट पाहणाऱ्याला या सूडकथेत क्वचित तोचतोपणा जाणवू शकेल.

या सूडकथेचा तोंडवळा असा : दिनानाथ-सर्जेराव हे दोघे स्मगलिंगमधले भागिदार. पुढे यथावकाश दीनानाथ (अरुण सरनाईक) सर्जेरावला (डॉ. श्रीराम लागू) फसवून तुरुंगात पाठवतो, आणि आपण उच्चभ्रू – सज्जन श्रीमंत बनतो. तुरुंगातून सुटून आलेल्या सर्जेरावला तो ओळखण्याचंच नाकारतो. त्याच्या कुटुंबाचं पालन करायचं आश्वासन देऊनही संपूर्ण दुर्लक्ष केलेलं असतं. दुखावलेला सर्जेराव सूड घ्यायच्या निश्चयानं कामाला लागतो. त्यात त्याला मुलीचं – उषा चव्हाण – सहकार्य मिळतं. कारण दीनानाथ व त्याचा हस्तक दादा मांडके (निळू फुले) यांनी तिच्यावरही अन्याय केलेला असतो. ही सूडकरी दुक्कल दीनानाथकडून पैसाच लुबाडून थांबत नाही, तर त्याचा एकुलता एक लाडका उनाड मुलगा – बाळ धुरी – यालाही आपल्या बोटावर नाचवते. पराभूत दीनानाथला शेवटी मुलाच्या प्राणासाठी गुडघे टेकावे लागतात, सर्जेराव मुलीसाठी दुसरा तुरुंगवास पत्करतो, आणि दोघे मित्र व्याही होऊन जातात, वगैरे.वगैरे.

कथेमध्ये विशेष नावीन्य नसलेला हा चित्रपट उत्कृष्ट निर्मितिमूल्ये आणि अनुभवी कलाकारांच्या 'टीम' ची चौफेर कर्तबगारी यामुळेच काही एक पातळी गाठू शकला आहे. एक तर चित्रपट रंगीत आहे, दुसरं, तो तंत्रदृष्ट्या निर्दोष आहे. ध्वनिमुद्रण व छायालेखन अनुक्रमे सुस्पष्ट व आल्हाददायक. सेटिंग्ज थाटाची (उदा. दीनानाथचा बंगला), तशी बाह्यचित्रणस्थळंही आकर्षक. (उदा. द्वंद्वगीतांच्या चित्रीकरणाची पार्श्वभूमी.) दत्ता गोर्ले यांच्या कॅमेऱ्याचाही खास उल्लेख केला पाहिजे. खास करून निसर्गाच्या चित्रणात, मराठी चित्रपटात जवळजवळ न आढळणारे काही दृष्टिकोन – angles – त्यांनी आवर्जून लावले आहेत. अनिल – अरुण या ताज्या दमाच्या संगीतकारद्वयाची संगीतरचना चित्राची गरज उत्तम भागविणारी आहे. 'नको रे नंदलाला' हे गीत विशेष उल्लेखनीय. 'शोधू कुठे कशी तुला प्रिया' व इतर गाणीही लोकप्रिय होण्यासारखी आहेत. दिग्दर्शक मुरलीधर कापडी यांचा हातही चित्रावरून सफाईनं व नेटकेपणानं फिरल्याचं जाणवतं. विशेषतः चित्राच्या अगदी प्रारंभीच भारतीय व पाश्चात्य नृत्याची जुगलबंदी टाकून (आणि त्यात भारतीय नृत्यगीत सरस ठरल्याचं दाखवून) त्यांनी भलाथोरला प्रेक्षकवर्ग अलगद खिशात टाकला आहे. त्यांच्या या व्यावसायिक चातुर्याची दाद द्यायला हवी.

'नाव मोठं लक्षण खोटं' शहरी व ग्रामीण अशा दोन्ही प्रेक्षकक्षेत्रांत बऱ्यापैकी व्यावहारिक यश मिळवीत असल्याचे सांगितलं जातं. तथापि त्याचं कारण वरच्यापैकी एखादं नसून चित्रपटाची 'मल्टिस्टारकास्ट' हे आहे. अरुण सरनाईक, निळू फुले, बाळ धुरी, उषा चव्हाण, धुमाळ आणि डॉ. श्रीराम लागू एवढी नावं निरनिराळ्या प्रकारचा प्रेक्षकवर्ग खेचायला पुरेशी समर्थ आहेत. अर्थात धुरी चव्हाण जोडी वगळता इतर सर्वांनी अपेक्षा पूर्ण केल्या आहेत. विशेषकरून सरनाईक – लागू यांनी. धुरी अवघडल्यासारखे वावरतात, ते खटकतं. तर उषा चव्हाण यांना काही सुबक 'फॉर्म' गवसणार नसल्यास त्यांनी पडदाभर हिरॉईनच्या भूमिकेत प्रेक्षकांचे डोळे दिपवण्याचा उद्योग बंद करावा. □

मध्यममार्गी

(आणि मध्यमवर्गीयही)

# मुक्ती

निर्मिति– दिग्दर्शक राजतिलक यांचं पहिलं चित्र छत्तीस घंटे. मल्टिस्टारकास्टच्या लाटेच्या सुरुवातीला आलेलं हे पंचातारांकित चित्र उघडउघड परकीय चित्रपटावर बेतलेले होते आणि तसं ठीक होतं, पण बाजारात मात्र त्यानं फारसा तग धरला नाही. राजतिलक हे हिंदी चित्रसृष्टीतल्या एका दादा प्रोड्युसरचे बी. आर. चोप्रांचे 'पाव्हणे'. आणि ते बी. आर्. फिल्म्स्च्या कॅपमध्ये वाढलेले आहेत की काय कुणास ठाऊक, बहुधा नसावेत, पण छत्तीस घंटेवर बी. आर्. कॅपमधल्या संस्काराच्या खुणा अंधुक का होईना पण दिसत होत्या.

'मुक्ती' या आपल्या दुसऱ्या चित्रपटात मात्र राजतिलक यांनी आपला चेहरामोहरा ओळखू येणार नाही इतका बदललाय्. म्हणजे असं की, 'मुक्ती'मध्ये आता छत्तीस घंटेच्या किंवा बी. आर्. कॅपच्याही खाणाखुणा दिसत नाहीत. तो आपली एक उघडउघड भावपूर्ण हळवी वगैरे शोकात्मिका (sentimental tragedy) आहे सीमा (विद्या सिन्हा) ची. चित्रपट सुरू होतो तेव्हा सीमा आणि कैलाश (शशीकपूर) यांचं लग्न होऊन सहा वर्षं उलटलेली आणि त्यांना एक (हिंदी सिनेमात असावी लागते तितकी) अगाऊ मुलगीही झालेली असते. हा एक रम्य धक्का. मग खास फिल्मी स्टाईलने कैलाशभगवानांवर एका खुनाचं बालट येऊन त्यांना तडक फाशीची शिक्षा. ती अंमलात यायच्याआधी दुःख सहन न झालेल्या सीमादेवी मुलीला घेऊन श्रीनगरहून थेट मुंबईला येऊन थडकतात. नव्या जीवनक्रमात साथ देऊ इच्छिणाऱ्या रतन (संजीवकुमार) चा तिनं स्वीकार केल्यानंतर एक तपानं कैलाशबाबू घुमजाव करून माघारी हजर होतात, कारण ते फासाच्या फळीवर अगदी उभे

असतानाच म्हणे त्यांची फाशी रद्द होऊन जन्मठेप झाल्याचा हुकूम येतो. (शशीकपूरची कटकट मिटल्याच्या कल्पनेत रमलेल्या माझ्या शेजारच्या संजीवचाहत्या प्रेक्षकानं "बच्, बच गया स्साला!" अशी एक प्रामाणिक हळहळ इथं व्यक्त केल्याचं आठवतंय्.) मग तेही मुंबईत हजर. सीमा रतनची पत्नी असली तरी, कैलाशला विसरू शकलेली नसतेच. भारतीय संस्कृतिविहीत प्रेक्षकांचीही धन्य आहे. मयत पतीचा ध्यास घेतलेली स्त्री त्यांना पातिव्रत्याचा आदर्श म्हणून चालते. मग ती चालू पतीशी व मुख्यत: वर्तमान जीवनाशी एकनिष्ठ नसेना का! एकंदरीतच आपल्याला भूतकाळाचा जिव्हाळा जास्त. असो. शेवटी सनातन त्रिकोण प्रस्थापित होऊन मत्सराग्नी भडकतो आणि प्रथेप्रमाणे त्यात उपनायक रतनजींची आहुती पडते. साहजिकच कैलाशला शिक्षेतून, सीमाला तळ्यात की मळ्यातल्या समस्येतून आणि रतनला थेट आयुष्यातूनच मुक्ती मिळते. शेवटी मग त्यागवीर रतनवीरांच्या समाधीवर जिवंतांनी 'संगम' स्टाईलनं फुलंबिलं वाहून सामुदायिक श्रद्धांजली वाहण्याचा कार्यक्रम.

कथेचा हा बाडबिस्तरा असा ऐसपैस असल्यानं मूळ कथावस्तू + हिंदी चित्रपटाला अपरिहार्य असणारा तपशील, एवढं सगळं तासात कोंबताना राजतिलकना बराच आटापिटा करावा लागला आहे. अर्थात चित्रपटाची लांबी एकोणीस रिळांपर्यंत ताणण्याऐवजी तापलेले प्रसंग कमी करून आणि चित्राची गती वाढवून त्यांना चित्रपट अधिक इंटरेस्टिंग करता आला असता. सीमाची कन्यका आणि तिचा प्रियकर (बिंदिया गोस्वामी आणि विक्रम) यांचं प्रकरण असंच वाजवीपेक्षा जास्त ताणलंय्. देवेन वर्मांची भूमिका तर कमालीची अधांतरी आणि आगापीछा नसलेली, baseless झाली आहे. एखादा दुसरा थातुरमातुर विनोद करण्यापलिकडे तिचा वापर झालेला दिसत नाही, मग ती अनावश्यक का ठरवली गेली नाही? तेव्हा शेवटी राजतिलक यांना नक्की कशाचं श्रेय द्यायचं हा प्रश्नच पडावा अशी स्थिती आहे. चित्रपटाचं छायाचित्रण आणि पार्श्वभूमी अत्यंत नेत्रसुखद आहे हे खरं, पण त्याचं श्रेय सत्यजित रे सारख्या प्रतिभावंताचे प्रदीर्घकाळचे सहकारी बन्सी चंद्रगुप्त यांच्या कलादिग्दर्शनाला आणि आजचे तरुण, तंत्रकुशल आणि आघाडीचे छायाचित्रकार के. के. महाजन यांच्या निर्दोष छायालेखनाला द्यावं लागेल. विशेषत: दोन–तीन गीतांचं टेकिंग फार छान जमून आलंय्. चित्रपटात इतरही बारीकसारीक चुका नाहीत असं नाही. एक तर विद्या सिन्हाच्या मेकअपमध्ये रंग जरा जास्तच झाले आहेत. चेहऱ्यातला काही दोष झाकण्यासाठी हा रंगेलपणा करण्यात आला असावा असं मानलं तरी 'रजनीगंधा'तलं तिचं साधेपणातलं सौंदर्य वगैरे आठवून भाविक व भावुक मंडळी हळहळताना आढळली. चित्रपटात पात्रांच्या वयाची आणि त्यानुसार बदलणाऱ्या रंगभूषेची सलगता, continuity तर साफ ठोकरून देण्यात आली आहे. त्यामुळे पात्रांच्या चेहऱ्यावरचं म्हातारपण आणि डोक्यावरची पांढरी सरडयाच्या रंगापेक्षा आश्चर्यकारक गतीनं बदलत जाते. बाकी कथानकातल्या कौटुंबिक चुकांचा पाढा न वाचलेलाच बरा.

संजीवकुमार, विद्या सिन्हा आणि शशीकपूर या तिघा मातब्बर अभिनेत्यांनी आपल्यावरची जबाबदारी यथोचित पार पाडली आहे. मुक्तीच्या सकृद्दर्शनी यशात त्यांच्याच वाटा अधिक मानायला हरकत नाही. विशेषत: संजीव–कुमारची व्यक्तिरेखा —फारशी तर्कनिष्ठ नसली, logic ला पटणारी नसली तरी—दुहेरी बांधणीची आणि खूपच इंटरेस्टिंग आहे. खूप चांगल्याबरोबर सहज मानवी वाईटपणाचा थोडासा भाग प्रामाणिकपणे मिसळून बनवलेली ही कॅरॅक्टर हिंदी पिक्चरमधल्या त्यागमूर्तींच्या आंधळ्या रांगेत बसणारी नसली तरी (कदाचित त्यामुळेच) माणसातली वाटते. तिला अशा प्रकारे सजीव करण्यात संजीवची कर्तबगारी बरीच हे उघडच आहे. विशेष म्हणजे कोणतीही भूमिका जिवाला लावून न घेता चटावर उरकणाऱ्या शशीनं यावेळी, संजीवबरोबर सामना असूनही, आपली भूमिका बरीच सीरियसली घेतल्याचं जाणवतं. मात्र समजदारीनं अभिनय करायचा त्याचा प्रयत्न बहुधा दिग्दर्शकमहाशयांनी त्याला वाजवीपेक्षा जास्त रडायला लावून हाणून पाडला आहे. विशेषत: चित्राच्या उत्तरार्धात गाडी संयमी वेदनाचित्रणाचा रस्ता सोडून अति नाटयाच्या खड्डयाकडे निघाल्याची शंका आल्यावाचून राहत नाही. अशीच जादा रडारड विद्या सिन्हालाही करायला लावली आहे. एक तर तिला असं–इतकं रडताना पाहायची सवय आपल्या प्रेक्षकाला अजून झालेली नाही, आणि दुसरं, बहुधा तिलाही (पडद्यावर) इतकं फुटून रडायची सवय झालेली नसावी. त्यामुळे सदरहू व्यवहार उभयपक्षी त्रासदायक ठरतो. एरवी मात्र तिनं तिच्या यशलौकिकाला इमानदारीनं भूमिका वठवली आहे. बिंदिया गोस्वामीला शक्य तिथे हेमामालिनीसारखी झळकवायचा दिग्दर्शक–छायाचित्रकारादी कंपूचा यक्षप्रयत्नही फुकट ताप देणारा आहे.

'मुक्ती'ला मी मध्यमवर्गीय चित्रपट का म्हणतो ते उघडच आहे. ही कथा–व्यथा बहुतांशी मध्यमवर्गाची आहे. सुख–आनंद आणि मूल्यनिष्ठा यांच्या कात्रीत सापडून करावी लागणारी तडजोडही त्याची थीम खास मध्यमवर्गीय वळणाची आहे. अर्थात मध्यमवर्गात या पात्रांना घालताना मध्यमवर्गाची व्याख्या वरच्या दिशेला बरीच ताणावी लागते हेही खरंच, पण तिकडे दुर्लक्ष करता येईल. मुक्तीला मध्यममार्गी चित्रपट म्हटलं ते अशासाठी की, अस्सल कलात्मक चित्रपट आणि 'पक्के धंदे-वाईक' सिनेमे यातला मध्यममार्ग शोधायचा एक प्रयत्न केला गेला आहे. एरवी या चित्रपटात दोन–पाच फाइट्स् घुसडणं अशक्य नव्हतं. पण तो मोह आवरला गेला आहे. राजतिलक यांच्या चुकांसकट त्यांचं भलं अशासाठी चिंतलं पाहिजे की तद्दन गल्लाभरू चित्रांच्या नादानं प्रजावळीचं राज्य चालू असताना त्यांनी एक व्यावसायिक असूनही बऱ्यापैकी clean म्हणता येईल असं चित्र दिलं आहे! आफ्टर ऑल, निव्वळ, विशुद्ध कलात्मक चित्रं काढणं प्रत्येकालाच शक्यही नाही, आणि ते तितकं अपरिहार्यही नाही.

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

**२६।३।७७ ते १।४।७७**

**लोकशाही काँग्रेसचे महत्त्व जाणवणार!**

लोकशाही काँग्रेसची स्थापना कर्क चंद्रावर झाली आहे. कर्क राशीत शनी आहे. या काँग्रेसच्या स्थापनेच्या वेळी तो वक्री होता. मंगळ हा सत्तेचा ग्रह व रवी हा राजकारणाचा ग्रह शनीसमोर आहेत. या प्रतियोगामुळेच लोकशाही काँग्रेसला 'बरी आणि वाईट' अशी दोन्ही प्रकारची प्रसिद्धी मिळू शकली. आता रवी बदलला असून तो अनकूल झाला आहे. शनी मार्गी झाला-आहे. त्यामुळे भारताच्या राजकीय जीवनाला कलाटणी देणारी कामगिरी या पक्षाकडून घडणार असून महत्त्व देखील वाढणार आहे. कामगिरी महत्त्वाची घडणार असली तरी त्याचे स्वरूप मदतीचेच राहील. जगजीवनराम व बहुगुणा हे जनता पक्षाला खूपच उपकारक ठरू शकतील. जगजीवनराम यांचे महत्व वाढेल. भारतात नव्हे तर जागतिक क्षेत्रात त्यांचे व्यक्तिमत्त्व उंचावेल.

**मेष : पैसा अपुरा पडेल**

तिसरा चंद्र असताना या आठवड्याची सुरुवात होत आहे ही उपकारक आहे. अकरावा मंगळ तुमच्या आशाआकांक्षा पालटणार आहे. स्थावराचा प्रश्न सुटेल. व्यापार व शेती यातील अनेक लाभ दृष्टिपथात येतील. व्यापारातील मंदी व उद्योगातील अडचणी कमी होतील. नवे धाडसी प्रयत्न करावयास हरकत नाही. पण मिळालेला पैसा हाती ठेवणे फार महत्त्वाचे आहे. कारण रवी आणि शुक्र, तसेच ३० मार्चपर्यंत प्रतिकूल म्हणजे बारावा आलेला बुध तुमच्या हाती पैसा टिकू देणार नाही. अचानक खर्च उद्भवेल. मोठे व्यापारी सौदे करताना फार काळजी घ्या. नोकरीत चुका होऊ देऊ नका वरिष्ठांची मर्जी राहील. परंतु गैरसमज राहील. प्रवास सुखाचा होईल. रेसमध्ये व लॉटरीत पैसे मिळू शकतील. वैवाहिक जीवन थोडे फार असमाधानी राहिले तरी काळजी नको. बेकारांचा प्रश्न सुटेल. शुभ दिनांक २६, ३१.

**महिलांना :** स्वतंत्र धंदा करायला मदत मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** शिक्षणात खूपच प्रगती होईल.

**वृषभ : सुखकारक प्रत्यय**

या आठवड्यात सुखकारक घटनांचे वलय तुमच्याभोवती निर्माण होणार आहे. बाराव्या केतूची तुम्ही आता मुळीच काळजी करू नका. मन आनंदी ठेवा आणि येणाऱ्या संधीचा लाभ उठवा. राशीत गुरू आहे, ही तुमच्या बाबतीत एक असामान्य घटना होय. ज्या एखाद्या संधीची तुम्ही वाट पाहत होता, ती हात जोडून तुमच्यासमोर येईल. फार दिवस डोकेदुखीचा ठरलेला एखादा प्रश्न समाधानकारक सुटेल. धंद्यातील अडचणींवर सहज मात करू शकाल. पैशाची काळजी करण्याचे मुळीच कारण नाही. नोकरीची परिस्थिती समाधानकारक राहील. वरिष्ठांची मर्जी राहील. प्रमोशन बढती असं काही तरी घडेल. नोकरीत ज्यांच्यावर अन्याय झाला असेल ते जिंकतील. आर्थिक परिस्थिती बरीच सुधारेल. आरोग्य उत्तम राहील. वाहन खरेदीची इच्छा पुरी होईल. शुभ दिनांक २८, ३१.

**महिलांना :** कलाक्षेत्रात प्रवेश मिळेल. संसारात लाभ.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षेत लाभ होईल.

**मिथुन : अपेक्षित लाभ होईल.**

मिथुन राशीची साडेसाती आता अगदी अखेरच्या टप्प्यात आहे. साडेसातीची भीती आता बाळगण्याचे कारण नाही. बारावा गुरू लेखनास थोडाफार प्रतिकूल ठरला तरी पण इतर महत्त्वाचे ग्रह अनकूल असल्यामुळे अपेक्षा-साफल्याच्या दृष्टीने हा आठवडा अनुकूलच जाईल. नोकरी-धंद्याच्या दृष्टीने जी आश्वासने मिळाली असतील किंवा आजवर लांबणीवर पडली असतील ती यावेळी मार्गी लागतील. विशेषत: आठवड्याच्या अखेरस अनपेक्षित असा आनंद मिळू शकेल. दूरचे मित्र भेटतील. धंद्याचे साधन बदलण्याच्या कामात सहकार्य मिळेल. नातेवाइकांचे सहकार्य लाभेल. नोकरीची परिस्थिती समाधानकारक राहील. आर्थिक स्थिती जरी एकदम सुधारली नाही तरी वणवण कमी होईल. नवीन बेत अगदीच विफल ठरणार नाहीत. मागील कामाचा फायदा मिळेल. मन उत्साही राहील. शुभ दिनांक २७, २९.

**महिलांना :** संसारात अडचणी नाहीत. सुखाचे पर्व सुरू होईल.

**विद्यार्थ्यांना :** मन उत्साही व प्रसन्न राहील.

**कर्क : पैसा मिळेल.**

गेल्याच आठवड्यात गुरू अकरावा झाला आहे तो तुमचे स्थित्यंतर घडवणार आहे. अनेक महत्त्वाच्या घटना यावेळी घडून येतील. नोकरीत बस्तान बसेल. केलेल्या कामाचे चीज होईल. गेल्या काही दिवसांत तुम्ही जे श्रम केले त्याचे फळ यावेळी पदरात पडणार आहे. लॉटरीत नशीब उजळून निघण्याची शक्यता आहे. व्यापारात नवे वायदे अवश्य करा. मंदीचा काळ संपून प्रगतीचे नवे पर्व सुरू होईल. आजवर ज्या अपेक्षा बाळगल्या होत्या त्या दृष्टिपथात येतील. बेकारांना आता वणवण करावी लागणार नाही. तात्पुरती नोकरी मिळेल. स्वरूप तात्पुरते असले तरी ती चांगली असेल. धंद्यात लक्ष घालायला वेळ मिळेल. दुय्यम धंद्यात प्रगतीच्या दिशेने वाटचाल सुरू होईल. स्थावराचे काम पुरे होईल. वारसाहक्काने मिळायचे ते सहजपणे मिळेल. शुभ दिनांक २८, ३१

**महिलांना :** संसारात सुख व आनंद मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** कलाक्षेत्रात प्रसिद्धी मिळेल.

**सिंह : अनुकूलता आहे**

बाराव्या शनीचा धाक आता तुम्ही मुळीच मानू नका. वृषभ राशीत गेलेला व तुम्हाला आलेला दहावा गुरू हीच तुमची फार मोठी संपत्ती आहे. आता अमूक होणे नाही असे यापुढे होणार नाही. गुरू म्हणजे प्रतिष्ठा, गुरू म्हणजे स्थैर्य व गुरू म्हणजे मानसिक सामर्थ्य होय. यावेळी तुम्ही 'हिरो' ठरणार आहात. नोकरीधंद्याची परिस्थिती सुधारणार आहे. तुमचे स्थान उंचावणार आहे. नवे विक्रम करू शकाल. ज्यांच्या नोकऱ्या कायम झाल्या नसतील त्यांच्या नोकऱ्या कायम होतील. बेकारांना नोकऱ्या मिळतील. धंद्यात नवीन गुंतवणूक होईल. मंदी व अडचण दूर होऊन प्रगतीचा मार्ग खुला होईल. शुभदिनांक-२९, ३१

**महिलांना :** सार्वजनिक जीवनात स्वत:चे स्थान उभवू शकाल.

**विद्यार्थ्यांना :** यशाचा विक्रम होईल.

**कन्या : लाभदायक**

गुरू हा तुम्हाला फारसा उपकारक ठरत नाही. तरीपण नुकताच गुरू भाग्यस्थानी आला आहे. तो भाग्यकारक असल्यामुळे तुमच्यावर त्याची कृपा राहणार आहे. हा गुरू म्हणजे आध्यात्मिक शक्ती वाढणे. उपासना फलदायी ठरणे. आत्मसामर्थ्य वाढवून स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाला प्रतिष्ठा प्राप्त करून देणे होय. तुम्ही तुमच्या इच्छित देवताची निष्ठापूर्वक उपासना करा. त्यामुळे **तुमची प्रतिष्ठा उंचावून सुख व स्वास्थ्य**

प्राप्त होईल. यावेळी नोकरीतील पेचप्रसंग दूर होऊन मनासारखे घडेल. दुय्यम धंदा प्रगतीचा नवा मार्ग दाखवील. सार्वजनिक उद्योगात प्रसिद्धी मिळेल. लोकप्रियता निर्माण होईल. अधिक ताण कमी होऊन चार पैसे मनासारखे खर्च करू शकाल. शुभ दिनांक २६, २९

**महिलांना** : विवाहेच्छु कुमारिकांचे विवाह ठरतील.

**विद्यार्थ्यांना** : अभ्यासातील अडचणी दूर होतील.

## तूळ : विदेशी प्रवास

सध्या रवीची कृपा तुमच्यावर आहेच. आता मंगळाची देखील झाली आहे. तुमच्या जीवनात भाग्यचक्राचे अनुकूल फेरे आता सुरू झाले आहेत. त्याचे योग्य फळ तुमच्या पदरात पडणार आहे. नुकताच गुरू आठवा झाला आहे. सर्वसामान्य दृष्टीने या गुरूचा तुम्हाला उपयोग नसला तरी, एक उच्च अशी तुमची महत्त्वाकांक्षा सफल झाली तर आश्चर्य मानू नका. तुम्ही कोणत्याही स्थानावर असा विदेशी प्रवासाची मोठी संधी तुम्हाला मिळणार आहे. राजकारणात तुमचे स्थान उंचावणार आहे. तुम्ही आज कुणीही असा तुम्ही आहात त्यापेक्षा प्रतिष्ठेच्या दृष्टीने मोठे होणार आहात. नोकरीची परिस्थिती फारच समाधानकारक राहील. वरिष्ठांच्या मर्जीचा प्रत्यय येईल. बेकारी संपून चार पैसे हाती मिळू लागतील. शुभ दिनांक-२९, ३१

**महिलांना** : हक्काच्या घरात राहण्याची संधी मिळेल.

**विद्यार्थ्यांना** : वाहनाची गैरसोय दूर होईल.

## वृश्चिक : वैवाहिक सुख

राशिस्वामी मंगळ रवीच्या सहवासात गेला आहे. मनाची स्थिती आंदोलनात्मकच राहणार आहे. तुम्ही स्वभावाने फारसे भावविवश नाहीत, पण मन केव्हा प्रक्षुब्ध तर केव्हा थोडेफार निराश असे राहील. मात्र गुरूची कृपा असल्यामुळे भयतेचे नियंत्रण जाईल. प्रामुख्याने तुमच्यापैकी ज्यांची लग्ने आजवर ठरत नव्हती अगर लांबणीवर पडत होती त्यांना हा आठवडा अनुकूल आहे. लग्ने ठरतील व पार पडतील. विवाहित लोकांच्या जीवनातदेखील एक आगळा आनंद यावेळी निर्माण होईल. इतर बाबतीत हा काळ विलक्षण खळबळजनक ठरणार आहे. बरेच दिवस डोकेदुखीचा झालेला एखादा स्थावराचा प्रश्न मार्गी लागेल. ज्यांना जागा नसेल त्यांना ती मिळेल. नोकरीत वर्चस्व राहील. प्रमोशन वा बढती मिळेल. आर्थिक बाजू सुधारेल. शुभ दिनांक २७ – ३१.

**महिलांना** : वैवाहिक सुखात वाढ होईल. मनोरथ पुरे होतील.

**विद्यार्थ्यांना** : वृद्ध स्त्रीची माया मिळेल.

## धनु : नवे क्षेत्र लाभेल

राशिस्वामी गुरू आता सहावा झाला आहे. नोकरीच्या दृष्टीने हा गुरू तसा वाईट नाही. बदल दर्शवितो. स्थित्यंतराची शक्यता निर्माण होते. आहे त्या कामात बदल होईल किंवा सध्याची नोकरीदेखील बदलू शकेल. मात्र त्यांचे स्वरूप उपकारक ठरेल. धंद्यात ज्यांना लक्ष घालावयाचे असेल त्यांना खूपच अनुकूलता आहे. बेकारांनी धंद्यातच जास्त मन घालावे. जम बसेल. यश मिळेल. नोकरी अथवा धंदा या दृष्टीने ज्यांना महत्त्वाच्या गाठीभेटी घ्यायच्या असतील त्यांना यश निश्चित मिळेल. राजकारणात मोठे स्थान मिळून महत्त्व वाढेल. प्रवास सुखकारक होईल. तब्येतीच्या बाबतीत जुने दुखणे डोके वर काढण्याची शक्यता आहे पण त्याचा दैनंदिन जीवनात परिणाम होणार नाही. पैसा पुरेसा मिळणार आहे. महत्त्वाची कामे होतील. प्रवासाचा बेत तडीस जाईल. उपासना व्रतवैकल्ये पार पडतील. शुभ दिनांक २७ – २८.

**महिलांना** : डोके व डोळे यांना थोडाफार त्रास होईल.

**विद्यार्थ्यांना** : धनलाभ ही यावेळी महत्त्वाची घटना आहे.

## मकर : अडचणीतून मार्ग

मकर राशीच्या लोकांना गेले काही दिवस अनेक प्रकारच्या त्रासातून जावे लागले आहे. अनेक ग्रह प्रतिकूल होते. आता त्यात सुधारणा होत आहे. गुरू पाचवा झाला आहे. तो तुमच्या विचाराचे व भावनेचे नियंत्रण करणार आहे. तुम्ही चांगला विचार करा. विरोधकांबद्दल आपुलकी बाळगा व सामाजिक क्षेत्रात काम करा. त्यामुळे तुमचे काम सुकर होईल. नोकरीत तुमच्याबद्दल अविश्वासाचे वातावरण राहणार आहे. वरिष्ठांच्या मनात संशय निर्माण होणार आहे. पण प्रेमाची वागणुक व सहानुभूती यामुळे तुम्ही तुमचे स्थान पुन्हा उंचाऊ शकाल. शैक्षणिक बाजू सुधारेल. नवे शिक्षण घ्यावयाचे असेल तर त्याला काल अनुकूल आहे आर्थिक बाजू भक्कम होईल. लॉटरी वा रेसमुळे पैसे मिळू शकतील. प्रवास लांबणीवर पडेल. जुने मित्र भेटतील. शुभ दिनांक २९-१

**महिलांना** : मोकळ्या स्वभावाने कोणतेही यश मिळवू शकाल.

**विद्यार्थ्यांना** : परीक्षेच्यादृष्टीने खूपच अनुकूल आहे.

## कुंभ : नोकरीत चांगले

बाराव्या मंगळाच्या जाचातून तुम्ही आता मुक्त झाला आहात. मनाचा कोंडमारा आता संपला आहे. तुम्ही जे मनात आणाल ते यशस्वी करण्याचे तंत्र तुम्हाला साध्य होईल. नुकतीच निवडणूक पार पडली आहे. राजकारणात एक यशस्वी व्यक्ती म्हणून तुमचा गौरव होणार आहे. व्यक्तिमत्त्व व प्रतिष्ठा उंचावणार आहे. विरोधक मित्र बनतील. तुमच्या सार्वजनिक जीवनात चांगल्या घटना घडतील. अनेक दिवस उराशी बाळगलेली स्वप्ने साकार होऊ लागतील. तुमचा स्वतंत्र धंदा असेल तर, धंद्याचा जम बसेल. तुम्ही जर स्वतंत्र धंदा करणार असाल तर अनुकूलता आहे.व्यापार, इंजिनिअरिंग उद्योग, तेल धंदा यशस्वी होईल. होजियरीचा व्यवसाय अडचणीच्या कैचीतून बाहेर पडेल. नोकरीची स्थिती सुधारेल. नोकरीत प्रमोशन वा बढती मिळून वातावरण बदलेल. बदलीचा प्रश्न सुटेल. ज्यांच्या नोकऱ्या अस्थिर असतील त्यांच्या नोकऱ्या कायम होतील. शुभ दिनांक २६–२८.

**महिलांना** : मन प्रसन्न राहील. माहेरची माणसे भेटतील.


**विद्यार्थ्यांना** : श्रमाचे योग्य फळ पदरात पडेल.

## मीन : सावध राहा

रवी तुम्हाला अनुकूल आहे. त्याचबरोबर मंगळ प्रतिकूल झाला आहे. मानापमानाचे प्रसंग येतील. मनाची प्रक्षुब्धता वाढेल. नको असलेले काम काढावे लागेल. तुम्ही नोकरीत असाल तर, वरिष्ठांकडून होणारा अन्याय मुकाटयाने सहन केल्याखेरीज गत्यंतर नाही. पण त्यामुळे निराश होण्याचे आपल्याला कारण नाही. राशीस्वामी गुरू तिसरा झाला आहे, ही फार मोठी जमेची बाजू आहे. सहन करण्याची ताकद वाढेल. कौशल्य पणाला लागेल. नोकरीत अनुकूल बदल होऊ शकेल. कारण शनी अतिशय अनुकूल आहे. यश आणि प्रगतीचा तो उपकर्ता आहे. अधिक समृद्धीची चाहूल लागू शकेल. रेसमध्ये नशीब उघडू शकेल. लॉटरीत नशीब फुलारेल. लेखक म्हणून मोठा आनंद मिळेल. ग्रंथप्रकाशन होऊ शकेल. तुम्ही पहिली प्रसिद्धी मिळवू शकाल. गायक, वादक लोकप्रिय होतील. नाटकाचे प्रयोग या राशीच्या लोकांना लाभदायक ठरतील. निराशेच्या आहारी न जाता काम करा. शुभ दिनांक ३०–३१.

**महिलांना** : विवाहेच्छू कुमारिकांचा प्रश्न मार्गी लागेल.

**विद्यार्थ्यांना** : अपुरे शिक्षण पुरे होईल. यश मिळेल. □



दिल्लीत आज अनेक
राजकीय निरीक्षक ठाण
मांडून बसलेले आहेत.
माणूस प्रतिनिधीही यापैकी एक.
तरीही काहीतरी वेगळे
निरखणारा, टिपणारा.

□

पुढील अंकापासून
या प्रतिनिधीकडून
आलेली खास वार्तापत्रे